म.ग्रं.सं. ठाणे
विषय : भू.प्रवास
सं. क्र. ८६१



REFBK-0027263

वसंत वसंत लिमये

ग्रंथघर उपक्रमातील पुस्तक

# धुंद-स्वच्छंद

वसंत वसंत लिमये

REFBK-0027263

ग्रंथाली

ग्रथघर उपक्रम १९९४ पुस्तक क्रमाक १

धुंद-स्वच्छंद

पहिली आवृत्ती - जानेवारी १९९४

© वसत वसत लिमये

फ्लॅट न ८, सुमगल पार्क,

स. न ११६, पौड रस्ता,

पुणे ४११०३८

प्रकाशक

सुदेश हिंगलासपूरकर

सयोजक, ग्रथघर उपक्रम

ग्रथाली, इंडियन एज्यु सोसायटीची

म फुले कन्याशाळा,

बाबरेकर मार्ग, ऑफ गोखले रोड (उ),

दादर, मुबई-४०० ०२८

मुद्रक

मोहन खैरे

जयमल्हार प्रिंटिंग प्रेस

२१७, आशिष इडस्ट्रियल इस्टेट,

दादर, मुबई-४०० ०२८

मुखपृष्ठ / माडणी

नदकुमार पाटील

आतील चित्रे

मृणाल आमडेकर

ग्रथघर

माझ्या घरी

माझी पुस्तके

मूल्य ४० रु

प्रिय आई-बाबांना
सप्रेम सादर

# मनोगत

खूप काळापूर्वीची गोष्ट आहे ऋषीमुनींचे आश्रम हे निसर्गाच्या कुशीत वसलेले असत निसर्गाच्या अगाखाद्यावर खेळताना विविध कला-शास्त्र शिकता येत असत प्राप्त होणार ज्ञान, हे विद्या आणि प्रत्यक्ष अनुभव याचा सुदर मिलाफ असे

औद्योगिक क्रातीनतर माणसाची उत्पादनक्षमता वाढली खरी, पण सुबत्तेबरोबर येणाऱ्या इतर रोगाच भान आम्हाला राहिल नाही. पाश्चिमात्य देश काही प्रमाणात या धक्क्यातून सावरले आहेत, आणि पुनश्च, कोंदणात का होईना, निसर्ग राखून-जपून ठेवण्याचे त्याचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत आपल्याकडे मात्र दुर्दैवान अवकळाच आहे

स्वातत्र्य मिळाल्याच्या आनदात, पाश्चिमात्याच अनुकरण म्हणजे प्रगती अस समीकरण आपण स्वीकारल उद्योगधदे-शहर झपाट्यान वाढली, खेड्यापाड्यातून शहराकडे रीघ लागली गावाकडली कारागिरी, छोटे उद्योगधदे हळुहळू लयाला गेले या साऱ्या स्थित्यतरात कुठेतरी आपल्या जीवनवस्त्राची वीण, धागा, पोत, सारच बदलल आहे.

आज टीव्ही आहे, वॉशिगमशिन आहे, फ्रीज आहे, पण आपण निसर्गापासून फार दूर लोखड सिमेंट याच्या जगलात, खुराड्यात वस्ती करतो प्रदूषणाच्या रोगट ढगात, एकविसाव्या शतकाच्या घेरी आणणाऱ्या वेगाच्या भोवऱ्यात आज आपण भेलकाडत जगतो आहोत याचबरोबर विकासाच्या भस्मासुरान निसर्गाचे, जगल-डोंगर-नद्या याचे अघोरी लचके तोडले आहेत या जटायूच्या जखमा मलमपट्टीपलीकडल्या आहेत हे सारच भयानक आहे

निसर्गापासून दूर गेल्यान आज आपल्या नकळत आपल आयुष्य एकागी झालय कालिदासापासून बालकवींपर्यतच्या किंवा महानोराच्या काव्यातील मनोहारी निसर्गाच्या रूपाबद्दल वाचल्यावर आज खरोखर आश्चर्य वाटत की, लिहिलेल हे सार खर आहे? मग हा समृद्ध, विविध रूपानी नटलेला निसर्ग आहे तरी कुठे? की ही सारीच वर्णन, परीकथेतील केवळ कल्पनेच्या भराऱ्या आहेत? पण नाही, आज अग चोरून कानाकोपऱ्यात का होईना, पण निसर्ग विविध ठिकाणी दडलेला आहे त्याला शोधायला रसिकता हवी, थोडे कष्ट करायची तयारी हवी

ओलसर ढगाच्या उशीवर डोक टेकलेली सह्याद्रीची काळीशार शिखर, सहस्त्र तुषाराच्या आतषबाजीसह फेसाळणारे जलप्रपात, कोजागिरीच्या दुधाळ चादण्यात न्हालेले

डोंगर, अनतात विलीन होत जाणाऱ्या सह्याद्रीच्या रांगाना कवेत घेणार इंद्रधनुष्य, अशा विविध रंगीत चित्राचा कॅलिडोस्कोप, 'सह्याद्री' अस म्हणताच माझ्या नजरेसमोर तरळू लागतो

एरवी, भूगोलाच्या पुस्तकात आणि नतर क्वचित खडाळ्याच्या घाटात या सह्याद्रीची तोंडदेखली ओळख होते आणि बहुतेकाच्या आयुष्यात खूप दूर गेलेल्या जवळच्या नातेवाईकागत सह्याद्रीच अस्तित्व शिल्लक राहत सुदैवान, कॉलेजच्या दिवसात मी डोंगरी आडवाटेला चुकून गेलो, आणि मग नकळत त्याच न मळलेल्या वाटावर रुळलो गेल्या बावीस वर्षांत याच डोंगरी वाटानी मला भरपूर दिल या भटकतीमुळे मिळालेला अपार आनद, जमेल तसा मी वाटलाही कधी मित्रमडळींना बळेच हाईकला नेल, तर कधी लहान मुलाची शिबिर आयोजित केली वाटल्यान आनद द्विगुणित होतो म्हणे! पण मला मात्र सह्याद्रीच्या रूपान न सपणारा एक खजिना गवसला

सह्याद्री पर्वतशृखलेची उत्पत्ती, सह्याद्रीची भौगोलिक रचना व महत्त्व, रुळलेल्या व्यापारी वाटा, या खडकाच्या देशात 'श्री'चे राज्य स्थापणाऱ्या शिवरायाचा तेजस्वी इतिहास, याच सह्याद्रीच्या माथ्यावर उभारलेली दुर्दम्य दुर्गशिल्प, आणि या सर्व गोष्टींशिवाय या रागड्या पर्वतराजीच विविध ऋतूतील मनोहारी रूप, हे सारच गिरीप्रेमींना पूर्वापार साद घालत आल आहे विशेषत , दुसऱ्या महायुद्धानतर उद्देखून दुर्गभ्रमणास किंवा गिरीभ्रमणास जाण लोकप्रिय होऊ लागल या सुरुवातीच्या काळातील भटकतीची रसाळ वर्णन गोनीदा, प महादेवशास्त्री जोशी वगैरे लेखकाच्या पुस्तकात आढळतात १९६० नतर गिरीभ्रमणाबरोबरच प्रस्तरारोहण, गिर्यारोहण (हिमालयातील) हेही महाराष्ट्रात लोकप्रिय होऊ लागल याच सुमारास विविध गिरीप्रेमी मडळ अस्तित्वात आली

गेल्या वीस-पचवीस वर्षांत 'डोंगरा'नी खूप जणाना वेड लावल आहे एवढच कशाला, 'मावळत्या लालसर सूर्यप्रकाशात, करकरीत कोरी किटली शेकोटीवर टागलेली आणि बाजूला, अशक्य असणाऱ्या इस्त्रीच्या करकरीत कपड्यांतील तरुण-तरुणी राकट दिसण्याच्या प्रयत्नात', अस दृश्य आजच्या 'मॉडर्न' जमान्यात 'किंगसाईज लाइफ'ची ग्वाही देत

शालेय जीवनात शिवचरित्रान भारावून गेलो होतो, तर कॉलेजदिवसात हायकिंगच वेड लागल त्याच काळात माझी घसट, ग्रूपमधील माझ्यापेक्षा पाच-सहा वर्षांनी मोठ्या असलेल्या मडळींशी होती साहजिकच, त्याचे पूर्वानुभव, हा माझ्यासाठी एक महान खजिना ठरला शिकारीच्या कथा, आकाशस्थ तारे-झाडा-फुलाची माहिती अशा असख्य गोष्टींची गोडी या मडळींमुळे लागली आय आय टी मधील सहा वर्ष हा माझ्या दृष्टीन पर्वणीचा काळ! समवयस्क, समविचारी मडळी सोबत असल्यान, गिरीभ्रमणाचा छद मुक्तपणे, मनस्वीपणे जोपासता आला त्यातून माझ आणि डोंगरवाटाच एक अतूट नात निर्माण झाल, वाढल, आणि जित्याची खोड झाल

डोंगराचा नाद लागल्यावर, सुरुवातीच्या काळात, आपण कशापासून पळून तर जात नाही ना ? असा प्रश्न डोक्यात पिंगा घालत असे 'सुखाचा जीव उगीच कशाला दुःखात घालायचा ?' किंवा 'नसती बाझोटी साहस !' अशा प्रतिक्रियानी आणखी गोंधळ उडत असे पण मग 'गिरीभ्रमणात एक निखळ, निर्मळ आनद मिळतो. आणि या आनदासाठी गिरीभ्रमण' हे तर्कशास्त्र पुसटपणे स्पष्ट होत गेल हा काळ द्वद्वाचा मध्यमवर्गीय सस्काराना स्वत च्या आनदासाठी काहीही करण हे कुठेतरी अमान्य असाव 'तेन त्यक्तेन भुजीथ हा 'सुविचार' नकळत डोक्यात कोरलेला, त्यामुळे त्यागातच खर सुख असत, आनद असतो, अस त्यागभावनेच उदात्तीकरण डोक्यात घट्ट बसलेल परतु प्रत्यय वेगळा होता डोंगरातील भटकती ही केवळ आनददायी नव्हती तर त्यात कुठेतरी माझ्या अस्मितेला असलेल आव्हान मला जाणवू लागल होत सह्याद्रीच्या ऋतुचक्रान तर वेडच लावल होत कडाक्याच्या थडीत, मऊशार धुक्याच्या दुलईत एक आगळीच उब गवसली होती, रखरखीत उन्हाळ्यात सोनसळी गवतातून वाट काढत, कुठल्याशा किल्ल्यावरील दगडी टाक्यातल्या थडगार अमृततुल्य पाण्याच्या गोडीची चटक लागली होती पावसाळा हा तर सह्याद्रीचा ऋतुराजा चिब भिजून, हिरव्यागार नैसर्गिक लॉनवर पहुडण आणि इद्रधनूशी हितगुज करण हा नवा छद मिळाला होता

राजगडाच्या माथ्यावरून सूर्यास्ताच्या वेळेस जाणवणार सह्याद्रीच अमर्याद सौंदर्य, कोकणकड्याच्या उभ्या कातळात आढळणार उग्रभीषण सौंदर्य, डोंगरी आडवाटेवर खुदकन असणाऱ्या छोटुशा सोनकीच्या पिवळ्याधमक फुलाच सौंदर्य या सौंदर्याचा आस्वाद घ्यायला शिकवण्यासाठी कुणा मास्तराची गरज नव्हती एक निसर्गसुलभ, स्वाभाविक रसिकता सहजपणे खुलली होती, आणि निसर्ग तर त्याच भाडार अनत करानी उधळायला तयार होता. याच निखळ आनदान डोक्यातली पळपुटेपणाची, स्वत ची लाज वाटण्याची जळमट कधीच झटकून टाकली भटकतीबरोबर प्रस्तरारोहणाची आवड निर्माण झाली सुरुवातीच प्रशिक्षण, सराव यानतर डोंगराच्या अवघड वाटा, उभे कडे खुणावू लागले या चढायामध्ये एक जबरदस्त आव्हान होत सह्याद्रीच्या दुर्दम्य, दुर्गम रूपाशी एक वेगळी जवळीक निर्माण झाली या साहसी चढायात एक विशेष उन्माद होता काही वेळा हारही पत्करावी लागली क्वचित खरचटण्याइतपत धडपडलोही पण खरा आनद जिद्दीन-चिकाटीन प्रयत्न करण्यात असतो हा सूर गवसल्यावर, या साऱ्याच बिकट वाटा अपरपार सुखाच्या-वहिवाटीच्या झाल्या

'हे अस का ?' या प्रश्नाच्या टोकावर पोचल्यावर सभोवार पहाताना प्रकर्षान लक्षात येणारी गोष्ट म्हणजे, गेल्या दोन दशकात गिरीभ्रमणाची-प्रस्तरारोहणाची वाढती लोकप्रियता परतु ज्या वेगान लोकप्रियता वाढली, त्याच्या अनुषगान येणारी प्रगल्भता, गिरीभ्रमणातील धोक्याची जाणीव आणि रसिकता याची मात्र अजून वानवा आहे

पाश्चात्य देशात गिरीभ्रमण, प्रस्तरारोहण, व गिर्यारोहण या सर्वांकडे एक कला,

एक शास्त्र म्हणून पाहिल जात या साहसी क्रीडाप्रकाराच्या लोकप्रियतेबरोबरच लोकाच या विषयातील सामान्यज्ञान खूप वरच्या दर्जाच आहे

वरील सर्वच छदामध्ये थोडाफार धोका हा अभिप्रेत आहे आपला देश, विशेषत पश्चिम महाराष्ट्र, हा समशीतोष्ण प्रदेश आहे. पावसाळ्यातील मुसळधार पाऊस सोडल्यास, या हवामानात तस भीषण अस काही नाही यामुळेच सह्याद्री काहीसा फसवा आहे विविध ऋतूत योग्य ते कपडे व साधनसामुग्री जवळ असण हे आवश्यक असत योग्य पायतण, डोक्यावरील टोपी, सोबत पुरेस पाणी, पुरेसा शिधा, आणि भ्रमणाच्या मार्गातील अडचणींना अनुसरून चढाईची योग्य साधनसामुग्री, हे सार गिरीभ्रमणास निघताना सोबत असण ही एक प्राथमिक गरज आहे गिरीभ्रमणासाठी सह्याद्रीच्या विविध भागाचे चागले, तपशीलवार नकाशे असण हे अत्यावश्यक परतु दुर्दैवान या सदर्भात आपण भिकारी आहोत गेल्या पाच-दहा वर्षांत प्रकाशित झालेल्या काही मार्गदर्शक पुस्तकात जुजबी नकाशे उपलब्ध आहेत दुष्काळी परिस्थितीत हेही नसे थोडके। नकाशाच्या अभावी स्थानिक माहितगार किंवा स्थानिक मार्गदर्शक हा बहुमोलाचा वाटेत पिण्याच पाणी कुठे मिळेल याबद्दल अगोदर माहिती करून घेण आवश्यक, विशेषत उन्हाळ्यात उष्माघात होण्याची शक्यता असते गिरीभ्रमणात वेळोवेळी भरपूर पाणी पिण, यासारखा प्रतिबधक उपाय नाही पावसाळ्यात फुगलेल्या नद्या, ओढे यापासून सावध असाव या व्यतिरिक्त भटकतीत भेटणारी काही 'डेंजर' मडळी म्हणजे, साप, विचू, मधमाशा। याच्यापासूनही जपून रहाव।

ही यादी तशी अमर्याद आहे कदाचित स्वानुभवान पोळलेलो आहे म्हणून आणि इतराच्या अनुभवातून डोळसपणे शिकलो असेन म्हणून, पण गिरीभ्रमणातील धोके, असा विषय निघताच किती सागू-काय काय सागू अस होत गिरीभ्रमणात धोके असतात, ते माहीत असण आणि त्याबद्दल सुजाणपणे काळजी घेण, प्रथमोपचाराचे धडे यासारखे प्रतिबधक मार्ग माहिती असण हे मुख्यत आवश्यक आहे आणि यामुळे धोके सामान्यत सहजपणे टाळता येतात

सभोवार पाहताना लक्षात येत की, आज आपण निसर्ग नावाच्या आप्तेष्टापासून इतके अलिप्त झालो आहोत की निसर्गाला मुद्दाम भेटायला जातानाही आपण पोरकटपणे, मूर्खपणान वागतो मुबईजवळील चिचोटी धबधब्याखालील प्रवाहातील सहजपणे पाय फाडणाऱ्या बियरच्या बाटल्याच्या काचा किंवा कर्नाळ्याच्या पक्षी-अभयारण्यातील कर्णकटू डिस्को सगीतान भेदरलेली पाखर वरील गोष्टींची सहज ग्वाही देतील आणि म्हणूनच निसर्गाचे गेल्या दोन शतकात आपणच तोडलेले लचकेही आपल्या ध्यानात येत नाहीत पूर्वी आमच्या आय आय टी - पवईसमोर, फिरायला जायचा एक मस्त डोगर होता आज त्याच जागी डोंगर फोडून, पोखरून टोलेजग इमारती उभ्या आहेत मुब्रा-पनवेल रस्त्यावरील डोंगररागेचे दगडाच्या खाणींनी ओरबाडलेले उतार पाहिले की

मन खिन्न होत आणि हे सार ढळढळीतपणे आपल्या नजरेसमोर घडल आहे शहरापासून दूर चला अविचारानं, प्रगतीच्या नावाखाली आणि पोटभरू लालसेन असख्य जगलाची वासलात लावली आहे या भळभळीत जखमाच्या कहाण्याही आमच्यापर्यंत पोचत नाहीत

कुठेतरी निसर्गाच सतुलन बिघडलय ऐकायचेच असतील तर प्रलयाचे अग्रदूत भोंगे, कर्णकर्कशपणे ऐकू येतील हा निसर्ग, ही पृथ्वी यावर मानव नावाच्या प्राण्यान निर्घृणपणे अत्याचार केले आहेत आणि आज आपण सभावितपणे नाही, पण मूर्खपणान, झापड लावल्यागत या सगळ्याकडे डोळेझाक करीत आहोत निसर्ग ही पुढे येणाऱ्या अनत पिढ्याची आपल्याकडे असलेली ठेव आहे तिच्यावरच व्याज देण्याची आपली दानत नसली तरी मुद्दल तरी राखून ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न व्हायला हवा निसर्गात जाताना, निसर्गावर प्रेम करायला शिकल पाहिजे नाहीतर मग, बावळटपणे टाकलेल्या पेटत्या काडीन किंवा सिगरेटच्या जळत्या थोटकानी लागलेले वणवे मी पाहिले आहेत! दोन पायाच्या काही गाढवानी किल्ल्यावरून सहज गमत म्हणून ढकलून दिलेल्या दगडानी राजमाची गावातल्या बाईचा तुटलेला पाय मी पाहिलेला आहे!

सुख हे ओरबाडूनच मिळत ही नादान प्रवृत्ती आपल्यात कुठून आली कुणास ठाऊक ? पण निसर्गाकडून मिळणारा आनद, निसर्गाला धक्काही न लावता सहज मिळू शकतो हे आपण अनुभवल पाहिजे, अगी बाणवल पाहिजे, आणि मगच आपण स्वत:ला सजीवातील सर्वात सुबुद्ध प्राणी म्हणवून घेऊ शकू! आज निसर्गाच सवर्धन दूरच राहिल, पण आहे त्याच डोळ्यात तेल घालून सरक्षण करण्याची वेळ आली आहे आपणच आपले वैरी आहोत आणि ही वैऱ्याची रात्र आपणच जागे झालो तर सरणार आहे सभोवार पाहताना नजरेला ओरबाडतात, ढासळत जाणारे इतिहासाचे भग्न अवशेष! जगात इतरत्र न सापडणार सह्याद्रीच एक वैशिष्ट्य आहे आणि ते म्हणजे सह्याद्रीत भ्रमणासाठी सात-आठ दिवस गेल, तर त्यापैकी बहुतेक रात्री शिखरमाथ्यावर राहता येत आणि याच कारण म्हणजे तीनशे मैल लाबीच्या सह्याद्रीच्या पर्वतशृखलेत विविध डोंगरमाथ्यावर असलेले सुमारे तीनशे किल्ले यातील बहुतेक किल्ल्यावर निवारा आणि पिण्याच्या पाण्याची सोय आहे, साहजिकच ट्रेकला निघाल्यावर डोंगरमाथ्यावर, किल्ल्यावर राहण्यासारखा आनद नाही! गिरीभ्रमणाचा आनद, दुर्गभ्रमणामुळे द्विगुणित होतो आपल्याला अजूनही लक्षात असलेला, गेल्या सुमारे चारशे वर्षांचा इतिहास आणि शिवरायाच्या रोमहर्षक कर्तृत्वाच्या खुणा आजही या किल्ल्यावर पहायला मिळतात

पण या आनदाबरोबरच, बोचणारा एक सल आहे डोंगरमाथ्यावर असलेल्या, पुसट होत जाणाऱ्या खुणा आपल्या दैदीप्यमान इतिहासाची आठवण करून देतात कल्पनाशक्तीला थोडा ताण दिला तर, याच खुणाच्या जागी कोणे एके काळी काय अफाट वैभव आणि सौदर्य उभ असेल हे लक्षात येत परतु दुर्दैवान प्रत्यक्षात काहीच नाही आहे शिवकालानतर झालेल्या लढाया, आम्हीच मडळींनी 'खजिने, गुप्तधन'

याच्या लोभापायी नंतर केलेलं 'उत्खनन', आणि गेल्या दीड दशकातील आमची अफाट उदासीनता, यामुळे आज या ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणी बोडकी जोती आणि ढासळत जाणाऱ्या भिंतींखेरीज काहीच शिल्लक नाही आणि हे पाहिलं की विलक्षण दु.ख होतं इतिहासाकडे झालेलं हे दुर्लक्ष कमी म्हणून की काय आज या स्थळांना भेट देणारे काही निर्बुद्ध विकृत महाभाग या जागा 'दिव्या + अनीश' अशा दर्जाच्या 'शिलालेखा'नी 'सजवून' ठेवतात

स्वत च्याच इतिहासाबद्दल इतके हलगर्जी लोक, बहुधा या पृथ्वीतलावर फक्त आपणच असू आज अचानक जाग आल्यागत आपण धर्म, इतिहास याचे बुरखे घेऊन आपापसात क्षुद्र स्वार्थासाठी झगडतो आहोत पण प्रत्यक्षात आपल्याला इतिहासाची कितपत चाड आहे ?

पाश्चिमात्य देशात याच ऐतिहासिक अवशेषाची अपार काळजी घेतली गेली असती शक्य तिथे हुबेहूब जुन्यासारखं बांधकाम करून जीर्णोद्धार केला गेला असता याच किल्ल्याचा मोठ्या अभिमानानं खास पर्यटनस्थळ म्हणून विकास केला असता आपल्याकडील चांगली संग्रहालयं 'साहेबानी'च बांधली आहेत, एवढंच कशाला, आपल्याला काही चाड असती तर पुण्यातील 'राजा केळकर' संग्रहालयाच्या केळकरानी अपार कष्टानं, व्यासंगानं जमा केलेलं संग्रहालय, आपल्या पश्चात कुणाकडे सोपवावं अशी भ्रांत त्याना पडली नसती !

हे सारंच चित्र विरोधाभासी आहे एकीकडे आपण धर्म, इतिहास याच्या नावे कंठशोष करतो आहोत आपले नेते नुसत्या इतिहासाच्या आठवणीनीही सद्गदित होताना दिसतात आणि दुसरीकडे किल्ल्याची दुर्दशा पहावत नाही इतिहास जतन करणं, हे सुसंस्कृत मानवाचं लक्षण आहे पण आज आपल्या संस्कारातच एक उणेपण आहे एम टीव्हीवरील अनाकलनीय, अतर्क्य, नग्न ओंगळता किंवा स्टार टीव्हीचं 'चुंबकी'य आकर्षण हे आज आमच्या संस्काराचं बाळकडू आहे इतिहासाबद्दल तुम्ही काही तळमळीनं सागू लागलात तर 'Desı नो ?' अशी फॅशनेबल, इंटरनॅशनल हेटाळणी होते

ही विदारक परिस्थिती सत्य आहे, पण त्याबरोबरच काही ठिकाणी हळूहळू जाग येते आहे काही गिरीभ्रमण करणारी मंडळी उत्साहानं गडावरील टाकी, आधुनिक शिलालेख साफ करताना दिसतात पण हे सारे कौतुकास्पद प्रयत्न खूप तोकडे आहेत या संदर्भात फक्त सरकारला शिव्या देण्यात अर्थ नाही आपल्यालाच खडबडून जाग आली नाही तर काही खरं नाही !

सभोवार पाहताना आज एक मात्र निश्चित जाणवतं की या शहरी बजबजपुरीपासून दूर, निवात ठिकाणी जाण्याची ओढ झपाट्यानं वाढते आहे फार्महाऊस किंवा वीक एण्ड रिट्रिटसारखे पाच-दहा वर्षांपूर्वी अगम्य असलेले शब्द, आज सर्रास ऐकू येऊ लागले आहेत मुंबईहून बाहेर जाणाऱ्या शनिवार-रात्रीच्या गाड्यातली बरीचशी गर्दी

डोंगरवाटा जवळ करायला निघालेली दिसते शनिवारी किंवा बुधवारी रात्री राजगडावरील देऊळ किंवा विसापूर किल्यावरील गुहा, नाणेघाटची गुहा इथे चक्क गर्दी असते. चार-पाच ग्रूपदेखील समजसपणे एकत्र नांदताना दिसतात 'कुणाच्या अध्यात ना मध्यात आम्ही फक्त निसर्गाचे' असा बाणा आज आढळतो हे सारच आल्हाददायक आहे प्रस्तरारोहण, निसर्गशिक्षण अशी शिबिर खूप सख्येन लोकप्रिय झाली आहेत प्रशिक्षणाच्या सोयी वाढल्या आहेत आणि तरीही तुटपुज्या आहेत हिमालयातील गिर्यारोहणाचे अभ्यासक्रम तीन-तीन वर्ष आधी आरक्षित करावे लागतात पर्यावरण सदर्भातील जनमत खूपस सुजाण होत आहे हे सारेच आशादायक कवडसे आज हवेहवेसे वाटतात

गिरीभ्रमण, प्रस्तरारोहण ही एक कला आहे इतर अनेक कलाच्या व्यासगातून कलाकाराना मिळणारा आनद मी प्रत्यक्ष अनुभवला नसला तरी त्याची तुलना मी माझ्या आनदाशी सहज करू शकतो आणि गमतीचा भाग म्हणजे या तुलनेत अधिक-उण नसत याच कलेमुळे मला असख्य माणस मोकळेपणान, निस्सगपणे भेटली, आपलीशी झाली याच कलेमुळे माझी सघभावना, नेतृत्वगुण या गोष्टींशी ओळख झाली, आणि विविध अनुभवातून पक्कीही होत गेली याच कलेतील माझ्या साथीदारानी अनेक मैफिली रगवल्या आणि सायसाखरेच्या अवीट चवीप्रमाणे अनेक सुखद स्मृती मला दिल्या सह्याद्री आणि त्याच नित्य बदलणार ऋतुचक्र यानी जणू मला रमणीय सौंदर्याची कधीही न सरणारी 'अन्नपूर्णेची थाळी'च बहाल केली अवघड वाटा, प्रस्तरारोहणाचे नवनवे मार्ग, यानी शरीर-सवेदनेतल अपार सुख आणि कल्पनाशक्तीला कधीही न सपणार जबरदस्त आव्हान दिल आहे

पौर्णिमेच्या रात्री, खाली दूरवर पसरलेला येसाजी कक तलाव, तर समोर अगावर येणारे राजगडाच्या सुवेळामाचीचे तट भल्या थडीत पहाटे उभ्या कातळावरील चढाई, हातापायाच्या स्नायूतील जाणवणारा ताण, तल्लख मेंदू आणि काळसर खरखरीत खडकाचा उबदार प्रेमळ स्पर्श, असे अनेक प्रसग आणि अनत आठवणी पण आजही एक गोष्ट लख्खपणे आठवते ती म्हणजे या सर्व वेळी मी पूर्णपणे 'जिवत' होतो, बेभान होतो शरीर, मन, बुद्धी याच एक अपूर्व तादात्म्य स्वर्गीय होत आणि मी धुद होतो आजवर खूप भटकलो आहे, आणि अजूनही खूप भटकायच आहे नवनवी आव्हान, क्षितिज आजही खुणावतात या एरवी अनाकलनीय, पण मला स्पष्ट ऐकू येणाऱ्या हाकाना ओ देण हा माझा स्वभावधर्म आहे. आणि ही धुदी, आसक्तपणे, कुठलीही लाज न बाळगता मला अनुभवायची आहे मला स्वच्छदपणे हे सार उपभोगायच आहे.

आमेन!

१४-१२-९३ - वसत वसंत लिमये

पुणे

## ऋणनिर्देश

तीन वर्षांपूर्वीची गोष्ट डॉ आनद नाडकर्णी, माझा मित्र, सहज म्हणाला, 'बाळ्या (म्हणजे मी), तू लिहीत का नाहीस?' आनदच्या प्रेमळ आग्रहामुळे आणि 'महानगर'च्या निखिल वागळेमुळे मी चक्क 'महानगर'मध्ये नियमितपणे स्तभ लिहू लागलो शाळेत लिहिलेल्या निबधापलीकडे मी फारसा कधी लेखनाच्या वाटेला गेलोच नव्हतो सुरुवातीच्या अडखळणाऱ्या प्रयत्नानतर ताल गवसला आणि लेख लिहिण ही शिक्षा न भासता, मजा येऊ लागली काही लक्षात येण्यापूर्वीच तीस लेख झालेदेखील!

या लेखनाच्या सदर्भात न कटाळता प्रामाणिक अभिप्राय देण, सूचना देण, आणि प्रस्तुत पुस्तकातील विषयानुरूप रेखाचित्र काढण अशी बहुमोल मदत माझी सहकारी, सौ मृणाल आमडेकर हिने केली 'ग्रथाली'च्या दिनकर गागल यांच्या सहकार्यान या लेखमालेस पुस्तकरूप मिळत आहे या पुस्तकाच्या जुळवाजुळवीत रेश्मा बापटचे मोलाचे साह्य आहे

या साऱ्याचाच मी मन पूर्वक ऋणी आहे

\- वसत वसत लिमये

दा. क्र. ७८९
जमा (स्थळ प्रत)



# पहिल्या हाइकची नवलाई

जुलै ८५च्या दुसऱ्या आठवड्यातला शनिवार, सकाळी साडेनऊचा सुमार, मी पुजानी इडस्ट्रियल इस्टेटच्या पहिल्या मजल्यावर, छापखान्यात टाकलेल्या कामाची वाट पाहात उभा होतो आता, पुजानी इस्टेट हे काही ठाण्यातील सौंदर्यस्थळ नाही; तर कुठल्याही बड्या शहरात, सहजपणे सापडणारी एक इडस्ट्रियल इस्टेट आहे वीस-तीस उद्योजकाचे छोटे-मोठे विविध कारखाने, यत्राचा अव्याहत चालू असणारा खडखडाट, विचित्र रसायनाचे येणारे उग्र दर्प आणि कार्यमग्न असलेल्या अथवा नसलेल्या तिथल्या कामगार मडळीचा मनावर दाब आणणारा कोलाहल मी शनिवारी सकाळी अशा ठिकाणी असण याला तस खास कारण होत

पुढील वर्षी मे महिन्यात येणाऱ्या आमच्या महत्त्वाकाक्षी 'कामेट' मोहिमेच माहितीपत्रक छापण्याच काम तिथे चालल होत. पण शिपी, धोबी, प्रेसवाले यानी दिलेली वेळ पाळली तर आपल्यालादेखील चुकल्या चुकल्यासारख वाटत त्यामुळे "हे काय साहेब, आत्ता एका तासात मारून देतो!" या मोघम आश्वासनावर मी आपला वेड्यासारखा वाट पाहात उभा होतो तोंडातही विचित्र चव होती त्यामुळे आणखी एक चहा मागवण्याचा निरुद्योगी विचार, मी तात्पुरता पुढे ढकलला कठड्याला टेकून उभे असता, समोर अस्ताव्यस्त पसरलेल्या, गजबजलेल्या इमारतींच्या जगलापलीकडे पूर्वेला सुस्तावलेल्या मुऱ्याच्या

डोंगराकडे सहज लक्ष गेल

आणि अचानक मी स्वत लाच विचारल, "खर तर मी या शहरी प्रदूषित गजबजाटाला सोडून, दूर डोंगरदऱ्यांच्या सान्निध्यात असायल हव पण ते राहिल दूरच, आणि मी गाढवासारखा या खडखडणाऱ्या कलकलाटात का स्वत ला हरवून बसलो आहे ?" हा विचार डोक्यात येताच, इतर अनेक प्रश्न अहमहमिकेन आपली डोकी वर काढू लागले; शनिवारी छानसा सिनेमा पाहायच सोडून डोंगरात तडमडायला का जायच ? गिर्यारोहण हे एक वाझोट साहस आहे या नेहमीच्या टीकेकडे सपूर्णपणे दुर्लक्ष करून, सधी मिळताच डोंगराकडे धाव का घ्यायची ? गिर्यारोहणात मृत्यूचा धोका असूनही, मनोरजनार्थ हे साहस करण कितपत योग्य आहे ? पण म्हणून आयुष्यभर घाबरटपणाच्या ढालीआड दडूनच राहायच का ? निसर्गात मिळणारा निखळ आनद सोडून, केवळ इतर लोक म्हणतात म्हणून स्वत चा कोंडमारा का करायचा ?

विचाराच्या ओघात सहज डोळ्यासमोर उभी राहिली, ती माझी पहिली हाइक ७१ सालचा डिसेंबर महिना खर तर त्यापूर्वी मला डोगर, हायकिंग अशा शब्दाचा वारादेखील लागलेला नव्हता कॉलेजच्या नोटीस बोर्डावर 'रुइया हायकिंग क्लब' अशी ठळक अक्षर वाचली आणि मी पुढली नोटीस वाचू लागलो येत्या शनिवारी चादण्यात, नेरळजवळच्या 'पेब' किल्ल्यावर म्हणे हाइक जाणार होती शनिवारी रात्री शेवटच्या कर्जत लोकलच्या, इजिनकडून दुसऱ्या डब्यात भेटायच ठरल होत मी इतर मित्रमडळींना, हे हाइक म्हणजे काय प्रकरण आहे म्हणून विचारल मिळालेली उत्तर गमतीची होती

"काहीं नाहा, उगाचच सुटीच्या दिवशी गाढवासारख तगड्या तोडत, डोंगरात भटकायला जातात काय मजा वाटते कुणास ठाऊक ?"

"आयला ! हाइकला सॉलीड मजा येते "

"तुला हाइक म्हणजे काय माहीत नाही ?" एक तुच्छ दृष्टिक्षेप

"अरे, एक बार जाके देखो ! दिल खुश हो जायेगा !" असा कुठल्या तरी हाइकवर दिल हरवलेल्या एका जाणत्याचा सल्ला

मिळालेली उत्तर काहीही असोत, पण एकदा हा प्रकार काय आहे ते पाहुयाच अशा विचारान, त्या दिवशीच सध्याकाळी घरी परवानगी विचारली आणि कोण आश्चर्य ! घरून ती सहजपणे मिळालीदेखील

हटर शूज, हॅवरसॅक अशा नवीन गोष्टींशी माझा परिचय झाला अगदीच अननुभवी असल्यान, मी आईन प्रेमान दिलेल्या खूपशा चागल्या पदार्थांचा डबादेखील बरोबर घेतला होता (पुढे अनुभवान अर्थातच मी शिकलो की, स्वत चा डबा आणण्यापेक्षा हाइकला नव्यानच आलेल्या मडळींचे, विशेषत. मुलीचे, डबे पळवण यात एक वेगळीच मजा असते ) एक अनामिक उत्सुकता, काही तरी थ्रिलिग करायला निघालो असल्यान जाणवणारी एक अस्पष्ट भीती, अशा काहीशा सदिग्ध मन स्थितीत मी कर्जत लोकलमध्ये ठाण्याला शिरलो बाकी मडळी दादरहून बसून आली होती म्हणजे, दोन दरवाजामध्ये असणाऱ्या जागेत चक्क तगड्या पसरून आडवी झाली होती पायात हटर्स, रगीबेरगी स्टॉकिंगच्या आत खोचलेल्या पँट्स,

अर्थात त्या पँटला अभिमानान लावलेली दोन-तीन ठिगळ, वर एन एन सी शर्ट आणि डोक्यावर चित्रविचित्र टोप्या, असा परिवेश! मडळी आपल्या दिव्य भसाड्या आवाजात मोठमोठ्यान गाणी म्हणत होती कुणी दरवाजावर ताल धरला होता तर एकजण दोन कड्या झाजाप्रमाणे वाजवत होता याचबरोबर हास्य-विनोदालाही ऊत आलेला होता सुरुवातीला मी थोडा दबूनच होतो पण त्या मुक्त, स्वच्छंद वातावरणात माझ्या मनावरच दडपण कधी नाहीस झाल, ते कळलच नाही

आम्ही नेरळला उतरलो रात्रीच्या थड वातावरणात, मस्त चद्रप्रकाशात गप्पा मारत - मजेत आम्ही बारा-तेरा कि मी चालून व सतराशे फूट चढून 'पेब' किल्ल्याला पोचलो वाटेत भयावह दरी, अडचणी, भीती अस जाणवत होत पण इतराच्या साथीन, त्यावर सहज मात केली. पहाटे किल्ल्यावरून दिसणारा आसमत आणि उबदार सूर्योदय अवर्णनीय होता दक्षिणेकडे माथेरान-प्रबळचा किल्ला, तर उत्तरेकडे चदेरी-म्हैसमाळ अशी पसरलेली डोंगराची राग पश्चिमेला पुसट दिसणारा माणिकगड आणि कर्नाळा हाइकचा पूर्वार्ध अपूर्व आनदात पार पडला होता एक विशेष समाधान होत पण आजही प्रकर्षान आठवतो तो परतीचा प्रवास

दुपारी आम्ही उतरायला सुरुवात केली सराईत मडळी धावत पुढे सुटली होती माझे पाय सटासट घसरत होते पाच-सहा वेळेला सणसणीत आपटलो पार्श्वभाग व्यवस्थित सडकून निघाला मी सर्वांच्या बराच मागे पडलो होतो रात्री वर चढण्याच्या उन्मादात न जाणवलेल्या गोष्टी, आता बोचत होत्या हॅवरसॅकचे पट्टे काचत होते काटेरी झुडपानी माझ्यावर चागलच प्रेम केल होत ऊन मी म्हणत होत घशाला कोरड पडली होती माझ्या वॉटरबॅगमधल पाणी कधीच सपल होत शेवटच चार-पाच कि मी अतर आता नकोस झाल होत तिथच कुठेतरी बसाव, जमल तर झोपाव, अस वाटत होत पण चालण्याशिवाय गत्यतर नव्हत मी स्वत.लाच यथेच्छ शिव्या घालत होतो हायकिंग हा आनददायी प्रकार आहे, अस म्हणणाऱ्याबद्दल आश्चर्यदेखील वाटण्यापलीकडे मी गेलो होतो, प्रचड थकलो होतो मऊ गादी आणि गाढ झोपेची चातकासारखी ओढ लागली होती मी त्या श्रात अवस्थेत घरी कसा पोचलो ते कळलच नाही मी सोमवारी चक्क दाडी मारली बिछान्यात पडल्या पडल्या स्वत.शीच घेतलेल्या काही शपथा 'हाइकच नावदेखील काढणार नाही', 'डोंगराकडे चुकूनसुद्धा फिरकणार नाही' इत्यादी!

दोन आठवड्यानी पुनश्च लागलेली राजमाची हाइकची नोटीस मी पाहून न पाहिल्यासारख केल मी माझ्या निर्णयापासून ढळणार नव्हतो शनिवारी रात्री जेवण होईपर्यंत माझा सयम कायम होता पण माझ्या नकळत मी सॅक भरायला लागलो मी हाइकला जातोय हे ऐकल्यावर आश्चर्यचकित झालेला आईचा चेहरा मला फारसा दिसला नाही झपाटल्याप्रमाणे मी स्टेशनची वाट चालू लागलो कमी मळलेल्या डोंगरी पाऊलवाटानी आणखी एकाला वेड लावल होत गिर्यारोहणाच्या डोंगरी ढेकणान आणखी एकाला कडकडून चावा घेतला होता एका नव्या मनस्वीतेची सुरुवात झाली होती

# थोडीशी दादागिरी

प रवा आमच्या अकाउटट मित्राच्या घरी गेलो होतो त्यानी औपचारिक रीत्या बायकोशी ओळख करून दिली मीही 'हँ हँ' केल, एवढ्यात तीच म्हणाली,

"मी तुला ओळखते आपण रुइयाच्या हाइकला एकदा बरोबर होतो "

माझ्या डोक्यात ती किती सालची, मी आय आय टी तून कुठल्या वर्षाला रुइयाच्या शेवटच्या हाइकला गेलो होतो, अशी चक्र खाड् खाड् आवाज करत फिरू लागली गप्पात एक नाव प्रकर्षान निघाल

तिन विचारल, "तुला नाईकची ट्रॅजेडी माहिती आहे न ?" नाईक म्हणजे फिजिक्सला आधी डेमो होता, मग लेक्चरर झाला सुमारे दहा-बारा वर्षं मोठ्या जिद्दीन, उत्साहान त्यान हाइकिंग क्लब चालू ठेवला होता. आमच लाडक नाव होत बुटल्या नाईक नावाला साजेशी उची, अगापेरान मजबूत, गोल चेहरा, काळे-कुरळेसे केस, काळे डोळे, मिशीआडून डोकावणार हसू. अचाट उत्साह होता बेट्याकडे घाईघाईत बोलण्याची स्टाइल सार काही झर्रकन डोळ्यासमोर उभ राहिल तीन-चार वर्षांपूर्वी अमेरिकेला गेला काय आणि जेमतेम महिन्याच्या आत हार्ट ॲटॅक आला काय, ऐन उमेदीत सारच सपल पण त्यावेळची मडळी आजही त्याच्या आठवणीन हळहळतात रुइया हाइकिंग होता त्याच्यासोबत हाइक्स अनेक केलेल्या आजही तो नाही यावर विश्वास बसत नाही वाटत,



शनिवारच्या शेवटच्या कर्जत लोकलला चढल, तर दरवाजात हे महाराज हसतमुखान स्वागत करतील, म्हणतील, ''आलास! बर केलस!''

७३ चा नोव्हेंबर महिना शेवटच्या कर्जत लोकलला काजुरमार्गला चढलो आम्ही तिघ होतो. इजिनकडून दुसऱ्या डब्यात उत्साहाला उधाण आल होत नवे, पहिल्यादाच येणारे असख्य चेहरे काही जुनेजाणते, राम राम करत गँगवेतून पलीकडे सरकले तोच पाठीवर बुटल्याची थाप पडली

''आलास! बर केलस!''

''आयला, आज बरीच जनता दिसतेय'' इति मी

''दादरला ९८ डोकी मोजली'' हसत बुटल्या म्हणाला आम्ही निघालो होतो बदलापूर-जवळच्या 'तावली'च्या डोंगरावर.

अबरनाथ ते बदलापूर रेल्वेमार्ग उजवीकडे एक मोठा वळसा घालतो आणि ज्या डोंगराला हा वळसा आहे तो म्हणजे तावलीचा डोंगर सह्याद्रीच्या मुख्य रागेपासून सुट्टी असलेली उत्तर-दक्षिण राग, तिच दक्षिण टोक म्हणजे माथेरान, तर उत्तरेच्या टोकाला 'तावली' बदलापुरातून निघून पाच कि.मी वर आपण या डोंगराच्या पायथ्याशी पोचतो सरळ वर चढत डोंगराच्या पूर्वेला असलेल्या खिडीत पोचतो. मग डावीकडे वळून एक हजार फुटाची दमछाक करणारी सरळ सोंड आपल्याला वेडावून दाखवते हिच्या माथ्यावर, स्वयपाकघरात फळीवर ठेवलेल्या चिनीमातीच्या लोणच्याच्या बरण्याप्रमाणे, काळे तीन सलग्न सुळके आहेत वाट याच्या पायथ्याला बिलगून पश्चिमेकडे अलगद सरकते आणि मग आपण तीनशे फूट चढून तावलीच्या माथ्यावर पोचतो

बदलापूर स्टेशनवर कलकलाट करत सगळेच उतरले तोपर्यंत नाइक्यान जुने, जाणते, भरवशाचे लोक एकत्र केले होते कुणी पुढे असायच, कुणी पिछाडी साभाळायची, मधे कुठे दोर लागल्यास काय व्यवस्था, हे सार तत्र जुळवल होत नाइक्याच्या कानाशी असख्य जण येऊन काहीबाही भुणभुण करत होते, पोरकट प्रश्न विचारत होते त्याचे हल्ले लीलया परतवत, हसतमुखान नाइक्या त्या प्रचड गोंधळात एक सुसूत्रता आणत होता लीडरचे काही गुण माझ्या डोक्यात सहज ठसले एक विस्कळित, परतु शिस्त होती नाइक्याला मी कधीच जीव खाऊन ओरडताना पाहिलेला नाही लीडरच ऐकायच हा अलिखित नियम मोडण्याच कुणाच्या डोक्यातही येण अशक्य अगदी सीनियर मडळी देखील बुटल्याला सल्ला देत परतु बुटल्याचा शब्द अखेरचा असे त्या सरमिसळ, विविध स्वभावाच्या ग्रूपमध्ये हा शिस्तीचा सस्कार आश्चर्यकारक होता, एवढ मात्र खर

आज विचार करताना हसूच येत शभर जणाच्या कळपाबरोबर हाइकला मी का जात असे? आजकाल तर ग्रूप दहा-बाराच्या पुढ गेला का भाऊगर्दी झाल्यागत वाटायला लागत कॉलेज हाइक ही सस्कृतीच वेगळी खूप खूप मुल-मुली (विशेषत मुली)! तुम्ही अनुभवी असलात तर तुम्हाला मिळणारा भाव, मुलींचे - खास पदार्थ असलेले - डबे पळवण, अशा बऱ्याच आकर्षक गोष्टी कॉलेजच्या हाइकला असत तेव्हाही आय आय टी तून मुद्दाम रुइयाच्या एखाद-दुसऱ्या हाइकला जाण्यात हा आकर्षणाचा भाग निश्चित होता पण तरीही

हाइकची अशी स्वतत्र शिस्त होती, सस्कृती होती परवाच ऐकल की रुइया का पोद्दार कॉलेजची हाइक होती, गणसख्या साडेतीनशे!


हाइक म्हणजे तरुण उत्साही वातावरण हे जरी खर असल, तरी तीनशेपन्नास म्हणजे अतीच होतय तरुण मुल-मुली एकत्र आली म्हणून कुठ बिघडल? पण म्हणून हाइकची जर पिकनिक होणार असेल किवा इतर वेळी मोकळेपणान भेटता येत नाही म्हणून हाइक हे जर निमित्त होणार असेल, तर काहीतरी विचित्र आहे

"छे! छे! हा स्वैराचार आहे!" अस तात्या-पतोजींसारख मत माझ नाही पण निसर्गात जाण, एक निखळ आनद लुटण या, हाइकच्या मूळ गाभ्यालाच कुठेतरी धक्का लागतो अस वाटत सगळ्यात महत्त्वाच म्हणजे साडेतीनशे जणाची हाइक कितपत सुरक्षित आहे? निश्चितच आयोजकाची तारांबळ उडत असणार एवढ्या मोठ्या ग्रूपबरोबर जाण्यासाठी पुरेसे अनुभवी लोक मिळत असतीलच अस नाही मग लोकप्रिय आहे म्हणून सुरक्षिततेसाठी तडजोड करावी का? नजीकच्या भूतकाळातील अपघाताची सख्या आणि कारण लक्षात घेता हा प्रश्न निश्चितच भेडसावणारा आहे

तावलीच्याच हाइकला, आम्हाला माथ्यावर पोचायलाच तीन वाजले होते बुटल्याला वाटल, आपण अबरनाथला लवकर उतरू शकू या निर्णयाला थोडा विरोध झाला पण शेवटी लीडरचा शब्द प्रमाण मानून आम्ही अबरनाथला उतरायला लागलो शभर जणाचा ग्रूप, साहजिकच छोटे-छोटे गट पडले सात वाजता सगळ्यात पुढचा ग्रूप पायथ्याशी होता तर माथ्यापासून जेमतेम पाचशे फूट खालील पठारावर शेवटचा ग्रूप होता शेवटी गोंधळ झालाच नवख्याची पार वाट लागली, त्यात लैला-मजनूच्या काही जोड्या हलेचनात खालच्या गावातून कदील आणवले, काही पलिते पेटवले अस करत मग वरात कशीबशी १२ वाजता खाली पोचली शेवटची परतीची लोकल जेमतेम मिळाली स्टेशनवर आणि प्रिन्सिपलच्या घरी पालकाचे भडावून सोडणारे असख्य फोन येऊन गेलेले अनुभवी मडळींना हजार फूट उचीच्या चढावर तीन ते चार वेळा खाली-वर कराव लागल, पायाच भरीत झाल होत त्या हाइकन तेव्हा तरी इतिहास घडवला पण नशीब एवढच की जी काही शिस्त होती, त्यामुळे सर्वजण उशिरा, परतु सुखरूप घरी पोचले माझी ती शेवटची कॉलेजीय हाइक!

आमच्या अकाउटट मित्राची बायको मला आठवत नव्हती, यात नवल काहीच नव्हत नाइकासारखे उत्साही आजही कॉलेजामधून असणार मीही त्याच कॉलेज हाइकिंग सस्कृतीतून न मळलेल्या डोंगरी वाटावर रुळलो म्हणूनच आज थोडासा हळहळतो हाइकिंग लोकप्रिय होतय यात विशेष आनद आहे पण साडेतीनशे मुल येणार असतील तर, सात स्वतत्र हाइक्स काढाव्यात किंवा सात स्वतत्र लीडर आणि पुरेशी अनुभवी मडळी असलेले सात स्वतत्र गट असावेत कदाचित, याहूनही चागले मार्ग निघू शकतील

निसर्गाच्या जवळ जाताना सवगड्याच्या सोबतीचा आनद महत्त्वाचा, पण कुठेतरी कळपाच्या चालीत निसर्गाचा सहवासच हरपू नये अस वाटत आज वीस वर्षं डोंगरात भटकत असल्यामुळे असेल, कुठेतरी कॉलेज हाइक सस्कृतीशी इमान असेल म्हणून, थोडीशी 'दादा'गिरी करून, ही खत, हळहळ माडावीशी वाटते



# राजमाचीचा रमणीय डोंगर

पहिला पाऊस पडून गेल्यावर मुबईकर हटर शूजना सह्याद्रीचे वेध लागतात मग हाइकर मडळी कॉलेजीय असोत, चाकरमानी असोत, वा स्वतत्र उद्योग असलेले अशाना शनिवारी रात्रीची शेवटची कर्जत लोकल किंवा शेवटची पुणे पॅसेजर खुणावू लागते उन्हाळ्यात माळ्यावर पडलेले हटर्स खाली येतात, चोरबाजारात घेतलेला करडा आर्मी शर्ट आणि पिट्टू बाहेर पडतात खास ठिगळ लावलेली सैलसर दणकट पॅंट आणि एखादी खास स्टायलिश फेल्ट हॅट, याची आठवण होते

मुबईत पडणारा मुसळधार किंवा पिरपिरणारा पाऊस हा नेहमीच वैताग आणतो पण तोच पाऊस, जरा बाहेर पडा आणि पहा, काय धमाल करतो! 'वसत' हा म्हणे ऋतूचा राजा पण खळाळत कोसळणाऱ्या फेसाळत्या प्रपाताच्या लेण्यानी नटलेला सह्याद्री आणि हिरवाकच शालू ल्यालेली धरती हे खर आपल्या वर्षाऋतूच अप्रतिम सौंदर्य, आणि हे अनुभवायला फार लाब जाव लागत नाही

पावसाळ्यात लोणावळा, खडाळा या भागात वर्षासहल ही कल्पना आजकाल खूप लोकप्रिय आहे तुम्ही सहज राजमाचीचा उल्लेख केलात तर खूपजण म्हणतील, "हो! आम्हीही गेलोय! काय छान स्पॉट आहे मस्त गरमागरम कणस, भजी, वा! मस्तच जागा आहे!"

ही अशी गल्लत खूपजणाची होते वरच वर्णन

मुबई-पुणे रस्त्यावरील राजमाची पॉइटच आहे, तर तिथून उत्तरेकडे दिसणारा जुळ्या बालेकिल्याचा डोंगर म्हणजे राजमाची किल्ला पावसाळ्यात आवर्जून करण्यासारखी हाइक तशी सोपी, सहज, खूप चढाव न लागणारी, पण अपूर्व आनददायी अशी ही हाइक

राजमाची किल्ल्याच्या पठारावर, माचीवर एक छोट गाव वसलेल आहे नाव उधेवाडी डोंगरात भटकणाऱ्या मुबई-पुण्याच्या उत्साही मडळींनी ७०/७१ साली या गावाच्या विकासासाठी नियमितपणे भेटी द्यायला सुरुवात केली या राजमाची ग्रामविकास योजनेत काम करणाऱ्या मडळींचा उत्साह आणि कळकळ वाखाणण्याजोगी होती मी सवड मिळाली की कधी मोठ्या ग्रूपबरोबर, कधी कुणी एखादाच सवगडी घेऊन राजमाचीला पळत असे अशाच खेपांपैकी एक अजूनही स्वच्छपणे लक्षात आहे

मी आणि वाशा घारपुरे, दुपारी साडेतीनला लोणावळ्यास पोचलो १४ ऑगस्ट ७५ दुसऱ्या दिवशीच्या स्वातत्र्यदिनाच्या कार्यक्रमासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी राजमाची गावात, उधेवाडीत पोचवून आम्हाला दुसऱ्या दिवशी लगेच परतायच होत पावसाळ्यात लोणावळ्याच रूपच बदलत एरवी विचित्र, विसगत दिसणारे बगले आणि हॉटेल याच रान हिरव्या जादूत कुठेतरी लपून जात कमीत कमी डोळ्याना त्रासदायक वाटत नाही. आम्हाला तशी घाई होती, कारण किल्ल्यात पोचण्यापूर्वी एक ओढा लागतो आणि पावसाळ्यात हे महाराज कधीही उग्र रूप धारण करू शकतात! त्यामुळे थोडाफार उजेड असेपर्यंत ओढ्यापाशी पोचण भाग होत. आम्ही झपाट्यान लोणावळा सोडल आणि तुगार्लीच्या वाटेन चालू लागलो

लोणावळा गावापासून तुगार्ली गाव दोन-अडीच कि मी वर तुगार्ली हा मानवनिर्मित तलाव, या मोसमात तुडुब भरलेला तलावाच्या डावीकडून थोड वर चढून आपण तुगार्ली गावापाशी येतो काही गावावरन आपण अनेकदा जातो, पण त्या गावाशी आपला सबध कधीच येत नाही, ते गाव ओळखीच होत नाही -अशापैकीच तुगार्ली हे गाव उन्हाच्या वेळी परतताना पाणी मिळण्याच ठिकाण, एवढच याच महत्त्व गावापासून पुढे आल्यावर आपण एका खिडीत येतो, आणि समोर राजमाचीचा डोंगर दिसतो मनरजन आणि श्रीवर्धन असे दोन बालेकिल्ले समोर पसरलेली हिरवीगर्द खोल दरी या दरीतील जगल गच्च, माणसाचा वावर नसलेल अस आहे क्वचितच अस जगल आजकाल पहायला मिळत

आपण या दरीला वळसा घालत उजवीकडच्या डोंगराच्या पायथ्यान एक मोठा, अर्ध-वर्तुळाकार फेरा मारतो राजमाची अखड आपल्या डाव्या हातास राहते आणि काही केल्या जवळ येत नाही उजवीकडील कातळावरन फेसाळणारे असख्य पाढरेशुभ्र झरे खाली, वाटेवर उतरतात घोंगावणाऱ्या वाऱ्यात जणू फडफडणाऱ्या साडीच्या अवखळ पदरागत भासतात चिब भिजून या वाटेवरन चालण्यात, फक्त पावसाळ्यात खडकामध्ये दिसणाऱ्या मुठीएवढ्या ताबूस खेकड्याची पळापळ पाहण्यात, हिरव्यागार सळसळणाऱ्या मऊ ओलसर गवतात विश्रातीसाठी टेकण्यात एक और मजा असते मध्येच एक सर येऊन गेली होती आपापसात आमच्या तुरळक गप्पा होत होत्या पण वाट जलदीन सपविण्याकडे जास्त लक्ष होत अर्धवर्तुळाकार फेऱ्याच्या शेवटी आपण एका दाट झाडीच्या पट्ट्यात पोचतो आभाळही भरलेल होत आणि आता तस अधारूनही यायला लागल होत वाट जगलातून दीडशे फूट

वर चढते ओलसर धूसर आसमत, सरमिसळलेल्या सावल्या आणि अस्पष्ट दिसणारी झाड, दगड, पुसट वाट, असे आकार मान खाली घालून चढत होतो. वातावरण निस्तब्ध होत अचानक उजवीकडच्या झाडीत काहीतरी खसफसल लक्ष गेल अस्पष्ट गुरगुर ऐकू आली आणि निमिषार्धात एक मोठा लवलवणारा पिवळसर पट्टा विजेगत डावीकडच्या व्हिटेवर येऊन पलीकडच्या अधारसावल्यात अदृश्य झाला बाशान हे सार पाहिल असाव आम्ही काहीच बोललो नाही झपझप पावल टाकत, शेवटच काही अतर बहुधा पळत, आम्ही झाडीतून बाहेर पडून मोकळ्या माळावर पोचलो वश्या जवळ येऊन पुटपुटला, "आयला, बिबळ्या होता!"

फारस बोलण्यासारख नव्हतच. इथे दोन वाटा फुटतात एक उजवीकडे वळवंडी गावात जाते, तर डावी छोटी वाट राजमाचीला आम्ही ओढ्यापाशी पोचलो फेसाळत वाहणारा 'चहा'चा प्रवाह का कुणास ठाऊक मवाळ वाटत होता तसा पूर्ण अधार व्हायचा होता पण आमचे टॉर्च कधीच बाहेर निघाले होते ओढ्यापासून तसा अर्धा तास लागतो, पण बहुधा पंधरा-वीस मिनिटातच निथळल्या अवस्थेत आम्ही लक्ष्मणच घर गाठल लक्ष्मण गावचा सरपच आम्ही तडक कपडे बदलून आत उबदार चुलीपाशी टेकलो लक्ष्मणच्या बायकोन, नीरेन फर्मास चहा दिला

"आठ-दहा फूट तरी असेल नाही ?"

"काय स्पीड होता!"

"पण फारच देखणा होता, नाही ?"

आता कुठे आम्हाला कठ फुटले होते बिबळ्याचे पुस्तकात छान छान फोटो पाहण आणि महाशय प्रत्यक्ष समोर दिसण यात जमीनअस्मानच अतर आहे वाटणारी भीती, ती पिवळसर चमकदार काती, त्या जनावराची चपळता, डौल, या साऱ्या गोष्टी निमिषार्धात घडून गेलेल्या जाणवलेल्या आहेत असे काही जिवत क्षणच तर एक धुंदी आणतात

श्रीवर्धन आणि मनरजन किल्ल्यांच्या मधील खिंडीत एक देऊळ आहे पचवीस-तीस जणाना छान निवारा आहे दोन्ही बालेकिल्ल्यावर इतिहासाची साक्ष देणाऱ्या अनेक खुणा आहेत. श्रीवर्धन हा त्यातला उचीन थोरला वरून दिसणारा आसमत अत्यत रमणीय खडाळा आणि ड्यूक्स नोज इथून पाहताना लक्षात येत की हा झोपलेल्या ड्युकचा चेहरा आहे साम्य विलक्षण मनरजनच्या पायथ्याशी वसलेल उधेवाडी गाव, छोटस पण अगत्यशील, गावाच्या पश्चिम अगाला देवराई आणि त्या पलीकडे 'उदयसागर' नावाचा सुदर जलाशय


या किल्ल्यावरून खाली उल्हास नदीच्या खोऱ्यात उतरता येत वाटेत कोंढाण्याची लेणी लागतात सहसा वाट चुकल्यावर सापडतात, म्हणून गावचा माहीतगार सोबत घेण इष्ट खाली कोकणात कादिवडे गावी कर्जतला जायला एस टी मिळते

तर असा हा राजमाचीचा डोंगर; नव्यानच व मळलेल्या वाटेवर जाणाऱ्यासाठी योग्य, तरीही रमणीय रात्रीची पॅसेंजर पकडून दुसऱ्या दिवशी सध्याकाळपर्यंत सहज परतू शकाल अशी हाइक

# बापाला विसरून चालणार नाही

इ न्सब्रुक. आल्प्सच्या कुशीत वसलेल ऑस्ट्रियातील एक टुमदार गाव जुलै ५, अखेरची सध्याकाळ. मी आणि विन्या आमच्या गरीब तबूत इन्सब्रुकमधल्या कँपसाईटवर सध्याकाळच्या जेवणाची तयारी करत होतो जेवण म्हणजे सुपरमार्केटमधून घेतलेले सॉसेजेस, ब्रेड, लोणी, आणि कॉफी असे पदार्थ युरोपात स्वस्तात भटकायच असेल तर रेस्तोराँ वगैरे पाट्याकडे बघायचसुद्धा नाही आम्ही निघालो होतो युरोपची सैर करायला, हिचहाइक करत हिचहाइक म्हणजे रस्त्याच्या कडेला उभ राहून, मला नेता का गाडीत ? अशी याचना करायचा मग कुणी बापडा किंवा बया, आपली गाडी थाबवून आपल्याला लिफ्ट देतात मग चाळीस-पन्नास कि मी पासून शभर-दीडशे कि मी पर्यंतचा प्रवास फुकट वर मस्त गप्पा अशी लॉटरी लागते अगठा दाखवून अस काही मिळण म्हणजे नवलाईच

दिएलाहून सुरुवात करून मजलदरमजल आम्ही करत इन्सब्रुकला पोचलो होतो इन्सब्रुक हे हिवाळी ऑलिंपिकमुळे प्रसिद्ध इन नावाच्या नदीकाठी वसलेल युरोपात छोट्या छोट्या गावातून देखील 'कँपसाइट' हे प्रकरण निश्चित असत एक छान गवताळ कुपण घातलेल मैदान, प्रातर्विधीची-अघोळीची सोय, एक छोट खास पेयाच दुकान तुम्ही स्वत ची गाडी घेऊन या, अथवा आमच्यासारखे गरीब पायी येतात स्वत चा तबू, स्लीपिंग बॅग अस घेऊन या किंवा पचवीस-तीस



रुपयात दोघाच्या राहण्याची सोय कुणाचा उपद्रव नाही की शहरी गजबजाट नाही परतु तरीही शहरापासून फार लाबही नाही युरेल -रेल्वेचा- पास काढून किंवा आमच्यासारख हिचहाइकिंग करत, 'कँपसाइट'वर रहात युरोपभर भटकण ही मजा काही औरच आणि तरीही तुलनेन खूपच स्वस्त

आमच जेवण आटोपल होत, कँपसाइटवर तशी गर्दी नव्हती आम्ही जेवणानतर सहज चक्कर मारायला निघालो पाईन वृक्षाच्या जगलापलीकडे इन्सब्रुकच्या दिव्याचा ताटवा दिसत होता थडगार वार सुटल होत मस्त शातता होती कँपसाइटच्या एका टोकाला एक कॅराव्हॅन उभा होता कॅराव्हॅन म्हणजे आत झोपण्याची सोय, छोटस स्वयपाकघर, अस असलेल एक छोटस घर, जे चाकावर असत आणि गाडीच्या मागे जोडून कुठेही घेऊन जाता येत याच कॅराव्हॅनसमोर एक तबू होता आणि फोल्डीग खुर्च्या टाकून तिघ बसलेले अर्थात गौरवर्णीय, आणि चेहऱ्यावरून कोणा देशचे असतील -काही पत्ता लागत नव्हता दोन बाप्ये एक उच- शिडशिडीत- शात चेहरा, थोडे हरवल्यासारखे वाटणारे निळसर डोळे, तर दुसरा मध्यम आकाराचा, टोकदार दाढी, डोक्यावर चद्र आकारून येत असलेला, चमकदार डोळे यात दुसऱ्याची बरीच धावपळ चालली होती मडळींच जेवण नुकतच आटोपत असाव तिसरी सोनेरी केसाचा पोनीटेल बाधलेली बया, खूप बडबडी असावी

आम्ही भिडस्तपणा बाजूला ठेवून ओळखी करून घेतल्या टेरी हा उच प्राणी दाढीवाले टिम आणि बॉनी ही बडबडी कॉफी प्यायला आम्हीही तिथेच विसावलो हे तिघही अमेरिकन ह्यूस्टन - टेक्सास-मधील वर्गमित्र एका गमतीशीर कारणासाठी पाच वर्ष एकत्र राहात होते (त्याच्यात अस चालत!) त्यांच नुकतच ठरल की आपल्याला मूल व्हाव, मग लग्न केलच पाहिजे असा दोघाचाही आग्रह, हट्ट या दोघाची वेडी कल्पना की लग्न करू, पण कुठे? तर व्हिएन्नामध्ये! यासाठी हे दोघ आणि 'टिम', याचा शोफर असे उडून फ्रँकफर्टला आले. कॅराव्हॅन भाड्यान घेऊन भटकत भटकत व्हिएन्ना तिथे लग्न मग पुनश्च रमतगमत फ्रँकफर्टमार्गे परत अमेरिका. आहे की नाही हनीमूनचा अचाट प्लॅन! गप्पा रगल्या या तिघानाही आपण खूप काही अचरट, वावग करतो आहोत अस अजिबात वाटत नव्हत पैशाच्या मागे झपाटलेल्या अमेरिकेला कटाळलेले हे अमेरिकन कुठेतरी सुख, आनद याचा प्रामाणिक शोध घेत बाहेर पडले होते

"'मोअर!' अधिकाचा हव्यास म्हणजे सुख हे आमच अमेरिकन समीकरण! पण युरोप वेगळा आहे इथे अजूनही रसिकता आहे जगण्याचा खरा उत्साह आहे!" बॉनी तावातावान सागत होती

औद्योगिक आधुनिकता, सुबत्ता, हरघडी-हरकामी यत्रे, या पसाऱ्यात वाढणारे हे पाश्चिमात्य लोक पण घराबाहेर पडण निसर्गात जाण ही याची ओढ विलक्षण आहे मग कारण काहीही असोत सुटीच्या दिवशी घरी बसण हा बहुधा युरोपात शिक्षापात्र गुन्हा असावा मडळी कुठे समुद्रकिनारी जातील, डोंगरात भटकायला जातील! थडी असेल तर स्कीइगला, किंवा जगलात नुसताच तंबू लावून वीकएण्डला रहायला जातील विविध साहसी खेळासाठी तर

अमाप सोयी उपलब्ध आहेत स्कीइग, सेलिग, गिर्यारोहण, प्रस्तरारोहण, कनोइग -चिचोळ्या फायबर ग्लासच्या होडीतून वेगवान नद्यातून प्रवास करण- असे अनेकविध खेळ शाळातून असणारे नेचर क्लब किंवा शालेय अभ्यासक्रमाचा भाग म्हणून मुल चार-भितीबाहेर, निसर्गात आयोजिलेल्या आठ-दहा दिवसाच्या उपक्रमात भाग घेतात तबूत राहातात, विविध साहसी खेळ प्राथमिक स्वरूपात शिकतात, निसर्गाच्या खूप जवळ पोचतात याकडे एक अत्यावश्यक सस्कार म्हणून पाहिल जात

त्या सध्याकाळचीच गोष्ट कॅंपवर पोचल्या पोचल्या जेवणाची तयारी करत असताना मी, रिकामा झालेला डबा सहज असाच तबूशेजारी टाकून दिला आणि मी माझ्या कामात गुतलो पाचच मिनिटानी, कॅंपवरच रहायला आलेला एक म्हातारबुवा, असेल ६५/७० वर्षांचा, सावकाश फिरत निघाला होता आमच्या तबूपाशी क्षणभर थाबला आणि तसाच पुढे निघाला होता चार पावल गेला नसेल, तर वाकला त्यान खाली पडलेला तो डबा [illegible]

झाल आपल्या सवयीच घाणेरड्या आहेत, गचाळ आहेत निसर्गात जाण, आनद लुटण, याबरोबरच निसर्गाचा आदर करण, निसर्ग जपण, हे या मडळींना बाळकडूच असाव, त्याच्या सस्कृतीचाच हा एक अविभाज्य भाग असावा

आपल्याकडे आजकाल, वीकएण्डला किंवा इतर मोठ्या सुट्यात बाहेर पडण हे वाढत आहे पण विचार करून पाहिला तर लक्षात येत, अस बाहेर जाण्यासाठी जागाच अपुऱ्या आहेत आहेत तिथे एकतर सोयींच्या दृष्टीन वानवा आहे किंवा सोयी नसलेल्या ठिकाणी जाण्याइतक साहस आमच्याकडे नाही जी लोकप्रिय 'निसर्गरम्य' ठिकाण आहेत त्याची आपण कळत-नकळत अफाट वेगान 'वाट' लावत आहोत

माथेरानचच उदाहरण घ्या! पधरा-सतरा वर्षांपूर्वी नेहमी जाण्यासारखी जागा होती. पण आता! तिथे वाढणारी गर्दी, नाहीशी होणारी झाड आणि या सर्वाला ग्रासून टाकणारा एक बाजारूपणा. उबगच येतो गिर्यारोहण महासघातर्फे साखळी उपोषण मुबईत झाल, 'माथेरानची झाड वाचवा' यासाठी थोडी थोडी जाग येत आहे पण खूपच थोडी. कुभकर्णान कूस बदलण्यासारख आहे आम्ही ८२ सालापर्यंत लहान मुलाच्या प्रस्तरारोहण शिबिरासाठी 'सिहगड' नियमितपणे वापरत असू. धमाल होती माणस यायची-सहली यायच्या, पण उपद्रव नसायचा खरोखरच बाहेर पडल्यासारख वाटायच, पण त्यानतर मात्र अशक्यच होत गेल पिकनिक या नावाखाली [illegible]

[illegible] स्वातन्त्र्यच हिरावून घेतल गेल गेल्या वर्षी ३१ डिसेंबरला सिहगड रस्त्यावर गिर्यारोहक मडळींच्या उत्साहामुळे पोलीस बदोबस्त होता म्हणूनच गडावरच्या फुटक्या काचाच्या ढिगाऱ्यात बहुधा कमी भर पडली!

माथेरानच्याच पश्चिमेला असलेला 'प्रबळ' किल्ला तस जुजबीच बाधकाम गडावर आहे सभाजी महाराजाच्या धावपळीच्या अकाली सपलेल्या कारकिर्दीत हा गड वसविण्याचा प्रयत्न झाला मुबई-पुणे रस्त्यावरून डोळ्यात भरणारा भला थोरला डोंगर उत्तरेच्या टोकाकडे पिरॅमिडच्या आकाराचा एका सुळका आहे याला कुलावतीणीचा महाल म्हणतात नाव

देणारे खास रसिक असावेत या किल्ल्याचा विशेष म्हणजे इग्रजाचा विचार माथेरानऐवजी हेच हिलस्टेशन करण्याचा होता पण गडावर या दृष्टीने पाण्याची कमतरता असल्यान माथेरान हे हिलस्टेशन झाल. प्रबळ किल्ल्यावर गच्च झाडी आहे दिवसाउजेडीही वाटेवर सूर्यप्रकाश पोचत नाही सहज हरवता येईल अस मस्त जगल, गणपती मदिराचे अवशेष, 'साधुनाना' नावाच्या शिकाऱ्याची समाधी, एक-दोन ढासळलेले बुरूज आणि बुरूज आलेल एक तळ

आज निसर्ग नैसर्गिक अवस्थेत कुठेतरी, माणसाचा वावर नसलेल्या दऱ्यात लपून बसला आहे, किंवा प्रबळसारख्या डोंगरमाथ्यावर अग चोरून बसला आहे अशा डोंगराची, रानाची विशेष काळजी घ्यायला हवी त्याच हिलस्टेशन नको व्हायला त्यावर जायला बाजारू, डाबरी, गुळगुळीत रस्ते नकोत जे नको ती माणस घेऊन येतात आणि क्षणिक फायद्यासाठी निसर्गाचा ठेवा लुटून नेतात, नष्ट करतात आपण, सरकार, काही करणारच असलो, तर अशा रम्य ठिकाणी फक्त असावी पाण्याची सोय आणि साधा-सोपा निवारा, बस्स! पायी चला, प्रेमान चला, निसर्ग त्याच भाडार तुमच्यावर लुटायला तयार आहे नाहीतर खरच आपल्या नातवडाना आपल्याला झाडाच चित्र दाखवाव लागेल आणि आपण म्हणू, 'हे पहा झाड! अशी झाड पूर्वी असायची!'


शेतकरी आपल्या 'काळ्या आई'ला कधीच विसरत नाही ऊन, पाऊस, पाणी ऋतुचक्र, हे दैवी चमत्कार नाहीत तर तो निसर्गाचा स्वभाव आहे, आणि गेल्या काही शतकातील आपल्या हावरटपणामुळे निसर्ग कोपायला लागला आहे या पृथ्वीतलावर असणाऱ्या साऱ्याच प्राणीमात्रासाठी निसर्ग हा बापासारखा आहे आणि आज आपण आपल्या बापालाच विसरलो आहोत!

# खुल जा सिम सिम

'साब, अच्छे होटेलमे ले जाऊ? सिर्फ दस रुपया।' या पालुपदासह मागे लागलेल्या चार रिक्षाचालकाचा ससेमिरा चुकवत मी लाइनीत उभ्या असलेल्या रिक्षापाशी गेलो पाठीवरची अवघड सॅक रिक्षात टाकली आणि सरळ आत बसलो

'पहाड गज पुलिस थाने के सामने चलना।' मी शक्य तेवढा खर्जातला आवाज काढून सागितल रिक्षावाला गरीब असावा, तो मुकाट निघाला हो! दिल्लीत ही खरोखर नवलाईची गोष्ट।

रिक्षा, टागे, हातगाड्या, आणि अफाट गर्दी, यातून वाट काढत रिक्षा निघाली हिला दिल्लीत स्कूटर म्हणतात जून महिनाअखेर असूनही पावसाची अजून चाहूल नव्हती आकाशात राजस्थानहून आलेल्या वाळूचे ढग अशा वेळेस वावटळ आली तर 'लू' म्हणतात रुक्ष कोरडी गरम हवा नुसती तडफड होते भरतवर्षाची राजधानी, अस भव्यदिव्य वाटण्यासारख काहीच नव्हत तसा माझा कुठल्याही शहरावर राग नाही, पण दिल्लीत, स्वस्थ-निवात कधीच वाटत नाही एकाच वेळेस अकल्पनीय गरिबी आणि बीभत्स प्रदर्शनीय श्रीमती या दिल्लीत सापडते अप्रामाणिकपणा, हाजी हाजी करण, गोड बोलण हे सारे इथे



गुण समजले जात असावेत राजधानीत तरी राजभाषा नीट वापरत असावेत अशी तुमची समजूत असेल तर ती साफ चुकीची आहे कारण समोरचीच बस निघाली होती मुखर्जीनगरला, पण त्या बोर्डावर मात्र दिमाखात लिहिलेल होत, 'मुर्खजी नगर' मी निघालो होतो महाराष्ट्र भवनात गेल्या वीस वर्षांत या विचित्र वाळवटात मला सापडलेल एक ओॲसिस दिल्लीला शिव्या देण्याच कारण मी मुबईचा आहे एवढच नाही कारण तशी मी इतर बरीच महानगर पाहिली आहेत अगदी लडन, न्यूयॉर्कदेखील, पण दिल्लीइतक परक, अस्वस्थ, घुसमटल्यासारख कुठेही वाटत नाही एक विचित्र एकटेपण येत इथे, तस पाहिल तर खूप चागल्या गोष्टी सान्या देशभरातून एकत्र आलेल्या आहेत पण कुठेतरी गणित चुकल्यासारख वाटत, या शहराला स्वत चा जीव नसल्यासारख वाटत तरीही राजकारणाची बजबजपुरी असलेल हे सत्तेच अधिष्ठान आहे

पण त्या दिवशी उष्म्यामुळे असेल, आभाळात असलेल्या वालुकामय अधारून आणणाऱ्या पटलामुळे असेल, मला प्रचड घुसमटल्यासारख होत होत, आणि तरीही हे सार सहन करण्याचा एकच मार्ग होता, की आजुबाजूच्या गुदमरवून टाकणाऱ्या आसमताचा विचार जाणीवपूर्वक टाळण माझ मन नकळत आल्हाददायक निसर्गात पाखरागत उडून गेल

समुद्र, नद्या, नाले, ओढे, डोंगर, दऱ्या, जलाशय आणि जगल, ही नेहमीच माणसाला आकर्षित करीत आली आहेत याच निसर्गात राहणारे पक्षी, प्राणी, असख्य प्रकारचे कीटक, विविध झाड, वनस्पती याच विलक्षण वैभव मानवी मनाला नेहमीच भुरळ घालत डोंगराच मला वेड लागल त्यातील साहसाची गोडी लागली, नव्हे चटक लागली पण डोंगरात भटकायला लागल्यावर काही काळानतर लक्षात आल की, डोंगराच साहस ज्या सर्व डोंगरवेड्याना भावत त्याना, त्याच ओढीन, निसर्ग आणि त्याची समृद्धता आवडतेच अस नाही मला तर माहीत आहे की, बऱ्याच वेळेस गिरिप्रेमी मडळी, आपापसात का होईना, पक्षीनिरीक्षकाना, निसर्गवेड्याना हसतात, आणि याच महत्त्वाच कारण असत की डोंगरवेड्यानी निसर्गाच्या गुळाची गोडीच कळलेली नसते

खर सागायच तर सुरुवातीला माझही असच काहीस होत पण पुढे काही सवगडी भेटले, ज्याना 'यातल' काही कळत होत ते कधी कुठे पक्षी दाखवत, तर कधी कुठे झाडाची माहिती सागत शशा गवाणकरन रात्रीच्या आकाशात सप्तर्षींच्या ताऱ्याच घड्याळ दाखवल त्यातून रात्रीच्या आकाशालाही काही अर्थ आला आणि थोडीफार नक्षत्र ठाऊक झाली या निसर्गातील चमत्कार, सौंदर्यस्थळ याची गोडी लागायला सुरुवातीस मार्गदर्शक लागतो, निरीक्षणासाठी व्यासग लागतो, चिकाटी लागते मगच निसर्ग हळुहळू त्याचा खजिना तुमच्यापाशी उघडू लागतो स्कॉटलडमध्ये आऊटडोअर एज्युकेशनचा अभ्यास करताना हाच निसर्ग, आणि त्यातले पक्षी, प्राणी, वनस्पती, याचा मुलाच्यासाठी कसा उपयोग करून घ्यायचा या सदर्भात शास्त्रोक्त ज्ञान मिळाल त्याच सुमारास 'ऑस्प्रे' नावाच्या एका पक्षावर बनवलेली फिल्म पहायचा योग आला

ऑस्प्रे हा गरुडाचा भाऊ शिकार करून जगणारा, मोठा देखणा पक्षी गरुडापेक्षा लहान, घारीपेक्षा मोठा जलाशयाच्या काठी राहणारा आणि पक्का सारस्वत, माशावर उदरनिर्वाह

करणारा ती फिल्मही अप्रतिम होती आणि त्या पक्षाच रूप, जीवनपद्धती, सारच विलक्षण होत

दोन वर्षांपूर्वीचीच गोष्ट डिसेंबर महिन्यात महाबळेश्वरला गेलो होतो सकाळी अकराची वेळ आम्ही तिघ-चौघ वेण्णा लेकवर बोटिंगला गेलो पर्यटकाची तुरळक गर्दी होती आम्ही मजेत वल्हवत तलावाच्या दुसऱ्या टोकाला गेलो सोबत पुष्क्या होता पक्षीनिरीक्षणात याला विशेष रस गिधाडाबद्दल तो माहिती सागत होता आम्ही मात्र, दोघानी वल्हवताना बोट सरळ रेषेत कशी न्यावी, याचे प्रयोग करत होतो एवढ्यात,

"ए! उजवीकडे पहा" पुष्क्याच्या आवाजात अलीबाबाचा स्वर होता. आमच फारस लक्ष नव्हतं उजवीकडे बहुधा आणिक एक गिधाड आल असाव

"अरे, जरा वल्ही थाबवा, आवाज नको!" आवाजात आग्रही आर्जव होत आम्ही सावरून बसलो आणि पुष्क्या दाखवत असलेल्या दिशेकडे निरखून पाहू लागलो पुष्क्याच्या एरवीच्या तात्या-पतोजी चेहऱ्यावर आनद लपत नव्हता "आयला, नक्की! ऑस्प्रे, थेट ऑस्प्रे आहे!"

ऑस्प्रे शब्दान जादू केली मी खाड्कन सजग झालो आणि समोरच्या आ[illegible]शात विहरणाऱ्या कबरट-पाढऱ्या रगाच्या पक्षाकडे निरखून पाहू लागलो

हिरव्यागार वनश्रीच्या कोंदणात [illegible]

हिरव पाणी आणि याच कोंदणातला निरभ्र निळ्या आकाशाचा तुकडा रगमच अधीर होता आम्ही रसिक स्तब्ध, आतुर होतो ऑस्प्रेच्या सथ गिरकीन बॅलेला सुरुवात झाली मध्येच तो एका जागी स्थिर होई दृष्टी ठरणार नाही अशा वेगान पख फडफडवत, हेलिकॉप्टरसारखा पुन्हा गिरक्या घेत सथ फेऱ्या मारू लागे पाण्याच्या पृष्ठभागाकडे येणाऱ्या माशाच पोट लखूकन चमकलेल याच्या तीक्ष्ण नजरेला अफाट उचीवरून स्पष्ट दिसत त्यावरून तो माशाच्या वजनाचा अदाज बाधतो त्याच अदाजानुसार तो सूर मारण्यासाठी विवक्षित उची गाठतो हा अदाज घेण, मासा नजरेन हेरण, ठरलेली उची गाठण्यासाठी भरारी घेण, आणि मध्येच सथ फेऱ्या मारण, अस या कसलेल्या कलाकाराच मस्त चालल होत आम्ही स्तब्धच होतो एखाद्या चुकार पक्षाच ओरडण, लाटाची लपलप या व्यतिरिक्त आसमतही स्तब्ध होता फक्त आम्हाला जणू अनत वाद्याच सगीत ऐकू येत होत बॅले रगात आला होता

या ऑस्प्रेची एक गमत आहे, जीवघेणी गमत हा शिकार करताना अचूक अदाज बाधून आपल्या लक्ष्यावर सूर मारतो, त्याच्या पायाना असलेली अणकुचीदार नख माशाच्या अगात शिरून मिटतात, एखाद्या कुलुपासारखी घट्ट! आणि मग सुरू होते, एक जीवघेणी झटापट मासा निसटून जाण्याचा आकात करत [illegible]

जिवाच्या आकातान, भिजलेल्या पखानी, उडण्याचा प्रयत्न करत असतो आणि यातली गोम अशी की, ऑस्प्रेन आता मनात आणल तरी तो माशाला जीवदान देऊ शकत नाही स्वतःच भिजलेल वजन आणि तो मासा यासकट त्याला भरारी मारायची असते सुरुवातीस पख पाण्याबाहेर काढून फडफडवत तो काहीसे वाळवतो आणि मग निकरान टेक ऑफ घेतो या परीक्षेला पुन्हा बसता येत नाही नापास झाल्यास जलसमाधी निश्चित!


अदृश्य वाद्याची लय वाढू लागली ऑस्प्रे लयीत पख फडफडवीत स्थिर झाला, समेवर किरण साधून त्यान वेधक सूर मारला बाणासारखा तो पाण्यात शिरला अदृश्य मासा अचानक पाण्यात जीवघेणा डिस्को करू लागला. आमचे श्वास कधीचे रोखले होते अलगद पख पाण्याबाहेर येऊन फडफडू लागले हलुहळू ऑस्प्रे पाण्याच्या पृष्ठभागावर तरगत निघाला आणि हळूच त्याच शरीर पाण्याबाहेर पडल तडफडणारा मासा नख्यामध्ये अडकलेला दिसला ऑस्प्रेन हवेत एक गचका खाल्ला आमच्या काळजात धस्स! पण नाही, पुनश्च सावरून मोठ्या कष्टान पण दिमाखात, दमदार पख फलकारवीत, ऑस्प्रे आकाशात एक फेरी मारून आपल्या घरट्याकडे निघाला दूर जात, एक छोटुसा ठिपका होत अदृश्य झाला अनेक क्षण कुणीच काही बोलल नाही 'वन्स मोअर' म्हणण अशक्य होत पण एक विस्मयकारक, डोळ्यांच पारण फेडणारा निसर्गाचा चमत्कार आम्ही पाहिला होता आम्ही धन्य झालो होतो

खरच, थोडे कष्ट घेतले, डोळे उघडे ठेवले तर हा निसर्गाचा अफाट खजिना आपल्यासाठीच आहे आम्हा डोंगरवेड्याना उगाच एक माज असतो पण अस काही पाहिल की लक्षात येत की, आपण एका अवर्णनीय आनदाला मुकतो. खर तर डोंगरात आपल्यासमोर स्टेज माडलेलच असत पण नृत्याच्या जगविख्यात कार्यक्रमाला जाऊन, बाहेर वडापाव खाण्याचा करटेपणा आपण करतो थोडी पुस्तक वाचली, थोडे कष्ट घेतले, थोडे आणखी डोळस झालो, रसिकता आपल्याकडे असतेच, तर हे निसर्गाच अफाट वैभव आपल्यासाठीच आहे 'खुल जा सिमसिम' म्हणायचीही गरज नाही

# आपल्यासारखे कपाळकरंटे आपणच

स काळची वेळ  जेमतेम सात वाजलेले मुळशी तलावाकाठी, डॅमच्या जवळ, टाटाच्या शेडमध्ये, डोळ्यावरची झोप उडवत, चोरट्या थडीच्या सलगीशी मारामारी करत आळसटून स्लीपिंग बॅगमध्ये पडलो होतो  'रानफूल'च्या लहान मुलाच्या शिबिराला जाण्यासाठी रात्रीच पुण्याहून निघून सकाळी मुळशीला पोचलो होतो  सकाळी निघणाऱ्या लॉंचन शिबिरावर पोचता येणार होत  आदली रात्र कशीही असली तरी उगवणारी नवी सकाळ नेहमीच प्रसन्न, उल्हसित करणारी असते, नाही ? उच झाडाचे शेंडे हलक्या झुळकीबरोबर अलगद जागे होत होते  समोरच्या जगलात कोवळ्या उन्हाचे कवडसे एकमेकाशी आट्यापाट्या खेळत होते  समोर पसरलेला शात, विस्तीर्ण जलाशय एखाद्या चित्रासारखा, सुस्तावलेला मस्त पहुडला होता  काळसर हिरव, नितळ पाणी आणि त्यावर दाटलेल सायीसारख दाट धुक, मधेच चुकार माशाच्या उडी मारण्यान जलाशयाची साखरझोप मोडणारे, उमटणारे हलके तरग  उबदार सोनेरी किरणानी धुक्याची साय वितळत चालली होती

समोरच, उजवीकडे पसरलेली अजस्र धरणाची काळी भित  जणू घोड्याची एखादी प्रचड नाल असावी ! १९२७ साली बाधलेल हे धरण  स्थापत्यशास्त्राचा, तत्रज्ञानाचा एक विस्मयकारक आविष्कार  याच धरणान स्वातत्र्यपूर्व काळात केवढा गदारोळ माजवला होता  सेनापती बापटाचा अभूतपूर्व मुळशी सत्याग्रह,



पर्यावरणासाठी झालेला हा पहिला जागरूक लढा असावा अफाट जलाशय तटवून, ही धरणाची भित आज मोठ्या निर्विकारपणे उभी आहे मला सहजच आमचा, धरणाचा शेख महमदी प्रकल्प आठवला आम्ही आय आय टी मधील काही वेडे १९७५ साली धरण बाधायला निघालो, कुठे ? तर पनवेलजवळच्या प्रबळ किल्ल्यावर

प्रबळ किल्ला मुबई-पुणे रस्त्यावर, पनवेलच्या पुढे दहा एक किलोमीटर गेल्यावर, पूर्वेला दिसतो माथेरानला समातर असलेला, माथेरानएवढाच अवाढव्य पसरलेला हा डोंगर खर तर साहेब याच डोगराच हिलस्टेशन करणार होता, पण पाण्याच्या अभावामुळे माथेरानची निवड झाली तसा अर्धवट बाधलेला हा किल्ला सभाजीच्या अस्थिर कालखडाची साक्ष देणारा। मुबईच्या एवढ्या जवळ, एवढ शाबूत असलेल गच्च जगल माथ्यावर मिरवणारा प्रबळ हा एकच डोंगर वीसेक वर्षांपूर्वी मुबईचा एक ग्रूप दरवर्षी २६ जानेवारीच्या सुमारास शिकारीसाठी एक आठवडाभर गडावर मुक्काम ठोकून असायचा त्याच्यापैकीच, पण जवळच्या गावात राहणारे, साधुनाना हे एक शिकारी पचक्रोशीत नामवत हा शिकारी माथेरानवरील लुईझा पॉईंटखालच्या जगलात जखमी वाघिणीच्या मागावर गेला पावसाळ्याचे दिवस, निसरड्या कातळावर घसरून पडता पडता, पायावर पडलेल्या, एका मोठ्या धोंड्यान साधुनानाचे दोन्ही पाय घोट्यापाशी मोडले खूप रक्तस्त्राव झाला त्याना मदत मिळाली, पण खूप उशिरा अतिरक्तस्त्रावामुळे साधुनाना दगावले

साधुनानाना प्रबळ अतिशय प्रिय, म्हणून त्याच्या मित्रानी साधुनानाची समाधी प्रबळवर बाधली पश्चिमेकडच्या एका ओढ्याच्या काठी ही छोटीशी समाधी आहे किल्ल्यावर कॅम्प करण्यासाठी सहसा हीच जागा वापरली जाते जवळच बुजत आलेल एक तळ आहे आणि शेजारीच गणेशाच एक पडक मदिर गडावरील अनेक रात्री या कॅम्पसाइटवर काढलेल्या सुरुवातीच्या खेपामध्ये गवाणकर बधूकडून शिकारीच्या सुरस कथा आणि त्यानतरच्या जेवणाची रसभरित वर्णन, असख्य रात्री जागवत ऐकलेली तेव्हापासूनच या बेवसाऊ, फारशी वर्दळ नसलेल्या किल्ल्याच एक विशेष आकर्षण वाटत असे

कॅम्पसाइटच्या शेजारचा ओढा अर्थातच जानेवारीनतर कोरडा ठणठणीत होत असे उन्हाळ्यात कधी गडावर गेल तर फक्त दोन टाक्याना पाणी असे, एक बोरीच्या टेपावर तर दुसर बुरजाच्या टेपावर पण दोन्ही पाण्यावर उन्हाळ्यात गच्च हिरवी साय असते खूप तहान लागलेली असेल तर अर्थात हेही पाणी अमृतच वाटत कॅम्पसाइटवर बारमाही पाणी असाव, अशा बाळबोध विचारातून एक वेडी कल्पना, १९७५ साली जन्माला आली - 'आपण प्रबळवर एक छोट धरण बाधुया !'

झाल ! कल्पना निघण्याचाच अवकाश ! पुढल्याच आठवड्यात मडळी ओढ्याच्या पातळ्या, आजुबाजूची जागा याचा सर्व्हे करून परतली लगेच मातीच्या बधाऱ्याच मोजमाप काढल फक्त ३६ घनमीटर दगड-माती लागणार होती म्हणजे सुमारे सात ट्रक आणि तीही कुठे, तर २६०० फुटावर, प्रबळ किल्ल्याच्या माथ्यावर आम्ही बहाद्दर, अजिबात डगमगलो नाही 'त्यात काय मोठस ? श्रमदान करुया !' आज हसू येत पण तेव्हाचा उत्साह अवर्णनीय होता

यानतर दर वीकएण्डला दहा-बारा मडळी प्रबळवर मुक्कामाला असायची. प्रथम बाध कुठे असणार, त्या ठिकाणी आखणी करण्यात आली मग ओढ्याच्याच पात्रातले दगड हलवून बाधाच्या ठिकाणी टाकायला सुरुवात झाली अशा सुमारे अठरा-वीस खेपा झाल्या काम जिकिरीच होत, कष्टाच होत जसजसा उन्हाळा जवळ येऊ लागला, तसतसा उत्साह मावळू लागला मग परीक्षाच निमित्त होऊन बाधाच काम तसच राहिल ऋतू काय आपल्यासाठी थोडेच थाबतात ? पावसाळा आला १९७६ च्या ऑगस्ट महिन्यात प्रबळवर पोचलो. तातडीन ओढ्यावर गेलो आमच्या कामावर छान पाणी फिरल होत हलवलेले दगड कधीच वाहून गेले होते ओढा मजेत खळाळत वाहत होता खरच, वाईट वाटून गेल

ही सारी धरणाची कल्पनाच शेख महमदी होती पण त्या वयात, उत्साहात कल्पना रगवण किंवा ती प्रत्यक्षात आणण, यासाठीची धडपड, यात एक अपार आनद होता धरण झाल असत, तर बाराही महिने, कधीही किल्ल्यावर वस्ती करता आली असती आजुबाजूच्या निसर्गाला धक्का न लावता, एका छोट्याशा बाधान मोठी किमया केली असती! आमच बळ कमी पडल पण म्हणून मुळात कल्पना वाईट नव्हती न रुळलेल्या डोंगरी पाऊलवाटावरल्या पावलाना त्या निसर्गातच काहीतरी उभाराव अस वाटल होत कुठेतरी पुसट जबाबदारीची जाणीव असावी, आणि अस काही करावस वाटण ही ऊर्मी महत्त्वाची अशाच गोष्टीतून प्रेरणा घेऊन राजमाची ग्रामविकास योजनेसारख मोठ काम उभ राहत, प्रत्यक्षात येत 'दुर्गमित्र'सारखे क्लब किल्ल्यावरची वळी, टाकी साफ करतात.

आज आपल्या किल्ल्याची स्थिती अतिशय वाईट आहे केवळ तीनशे वर्षापूर्वीच्या रोमहर्षक, वैभवशाली इतिहासाच्या या खुणा पुसट झाल्या आहेत, भग्नावस्थेत शिल्लक आहेत परदेशात हीच स्थळ, ऐतिहासिक स्थळ म्हणून, कोण प्रेमान जपली गेली असती! अत्यत लोकप्रिय, प्रेक्षणीय स्थळ म्हणून प्रसिद्ध झाली असती गेल्या पाच-दहा वर्षात आपल्याला जरा जाग यायला लागली आहे म्हणून रायगड, राजगड, शिवनेरीसारखी ठिकाण, साफसूफ करून जशी आहेत तशी राखून ठेवण्याचा प्रयत्न होतो आहे पण हे सारे प्रयत्न खूप कमी पडताहेत, म्हणूनच कदाचित केविलवाणे वाटतात

सह्याद्रीन आपला निसर्ग देखणा-समृद्ध केला आहे, तर शिवकालीन इतिहासान त्यावर साज चढवला आहे. हे सार जपल पाहिजे इतिहासाच स्तोम माजवू नये हे खर असल, तरी याच इतिहासात, निसर्गात आपल स्वत्व लपलेल आहे याच भानच काय, तर त्यासबधीची आपली आठवणही पुसट व्हायला लागली आहे दोनशे वर्षापूर्वीचा इतिहास नसलेली अमेरिका कदाचित कमनशिबीही असेल, पण शतकानुशतकाचा दैदीप्यमान इतिहास लाभलेले आपण, जर त्या इतिहासाच्या खुणाही नामशेष झालेल्या, स्वस्थपणे पाहणार असलो तर आपल्यासारखे कपाळकरंटे आपणच!



# ए, मस्त आहे, नाही ?

१९७३ सालचा डिसेंबर महिना आय आय टी च्या गिर्यारोहण मंडळात नुकताच रुळलो होतो तशी रुइया कॉलेजमधील काही ओळखीची मडळीही होती. खर म्हणजे या मडळींमुळेच हाइकिंगची गोडी लागलेली आम्ही निघालो होतो, अलग कुलग मडणच्या ट्रेकला. इगतपुरीहून सुरुवात करून आम्ही अलग- कुलगगड केला आणि आता निघालो होतो मडणगडावर सह्याद्रीच्या उत्तरेकडील रागेत मोठ्या दिमाखात उभे असलेले हे किल्ले पेशवाई बुडाल्यानतर 'पेंढारी' या लुटारू मडळींच आश्रयस्थान पेंढाऱ्याच्या उपद्रवाला पायबद घालण्यासाठी इंग्रजानी बऱ्याच किल्ल्याच्या वाटा, सुरुग लावून फोडून टाकलेल्या

माळशेज घाटापासून उत्तरेला जणू सह्याद्रीचा चेहरामोहराच बदलतो दगड तोच, माती तीच, पण डोंगराच्या ठेवणीतच काहीतरी विशेष उग्र, रौद्र आहे पायथ्याचे हजारभर फूट मुरमाचे, झाडीचे सोडले तर त्यावर सरळसोट उभारलेल्या काळ्या कातळाच्या अभेद्य, दुर्गम अशा भिंती त्यात दुर्लंघ्यतेची पताका मिरवणारे काही सुळके, अशा सुळक्यावर किल्ला बाधण ही कल्पनाच अतर्क्य, पण सहाव्या सातव्या शतकात बहुधा ती फॅशनेबल कल्पना असावी कुठेतरी नमुन्यादाखल, केवळ किल्ला आहे हे जाहीर करण्यासाठी, किरकोळ तटबदी असलेले हे किल्ले. या किल्ल्याचे बेलाग कडे आणि त्यावरील लुटुपुटीची

तटबंदी यामुळे या किल्ल्याची दुर्गमता अजिबात कमी होत नाही, तर आणखी प्रकर्षानं जाणवते कड्यात खोदून काढलेल्या पायऱ्या, निसरड्या वाटा, पोटात खड्डा पाडणाऱ्या भयप्रद दऱ्या, बेभानपणे सुसाटणारे वारे, हा साराच या किल्ल्याचा स्थायीभाव, निसर्गसुलभ स्वभाव

तर अशा दुर्लभ किल्ल्यांपैकी मडणगड हा एक दुर्ग हा शब्द 'दुर्गम'वरून आला असावा याच्या माथ्यापासून तीनशे फूट खालच्या पन्नास फूटाच्या पायऱ्या सुरुंगानं उडवलेल्या अर्थात प्रस्तरारोहण कराव लागत आम्ही कुलंगगड ९ वाजताच सोडला होता सुमारे एक हजार फूट खाली उतरून, एका अरुंद आडव्या वाटेनं जाव लागत वाट निसरडी मुरमाची ही वाट मध्येच सोडून वर चढायला सुरुवात करावी लागते आम्ही एकंदर सोळाजण होतो प्रसाद गवाणकर लीडर, पण आज तो मागे होता

आम्ही आडवी वाट सोडली आणि कारवीच्या रानातून पुसट वाटेवर वर चढायला लागलो आपापसात गप्पा मारण, मध्येच थांबण, पाणी ढोसण, असं मस्त चालल होत. डिसेंबर असूनही दुपारच ऊन खरपूस होत अखेर कारवीच रान संपल आणि आम्ही उभ्या चढाईवर पोचलो कुलंगगडाचा काळा बेलाग सुळका दीपस्तंभासारखा पाठीशी होता, तर पलीकडे अलंगगडाच विस्तीर्ण बोडकं पठार डोकावत होत समोर अंगावर येणारी मडणगडाची काळीकभिन्न भिंत जवळ येत होती. आम्ही दगडाच्या पायथ्याशी पोचलो गेल्या अर्ध्या तासात, वाटेच काही खरं नाही अशी, पाल चुकचुकायला लागली होती खडकापाशी पोचल्यावर लक्षात आल की, वर चढायला मळलेली अशी वाटच नाही मग मंडळी अस्ताव्यस्त त्याच चढावर विखुरली काही रॉक क्लाइंबिंग करून, काही मार्ग निघतो का ते, पाहू लागली या प्रयत्नात एका भेगेत गुड्या भागवत अडकला त्याला खालीही येता येईना, आणि वरही सरकता येईना मग आम्ही दोघं दोर काढून त्याच्या मदतीला गेलो

एव्हाना आपण साफ चुकलेलो आहोत, हे सर्वांच्याच लक्षात आल होत दुपार कधीच टळून गेलेली पोटात कावळ्यांच भजन सुरू झाल होत रखरखीत उन्हात पाण्याचा कधीच दुष्काळ पडला होता आम्ही सगळेच चातकासारखी, प्रसादची वाट पाहात होतो एवढ्यात पुढे बन्या मेहेंदळे आणि मागे प्रसाद असे अवतरले आता या बन्याबद्दल थोड सांगितल पाहिजे

बन्या तसा आय आय टी तला नाही पण माझा मित्र म्हणून ट्रेकला आलेला उंची ५ फूट २ इंच, हाडापेरानं मजबूत, गोल चेहरा, काळे डोळे, आतापर्यंतच्या कष्टानं रापलेला लालबुंद चेहरा आकारानं गोल पण जाड्या नाही, असा हा बन्या सर्व मंडळी बसलेली पाहून हताशपणे म्हणाला, "काय रे? काय झाल?"

मागून प्रसाद पुढे आला विशेष स्थितप्रज्ञ नजरेनं त्यानं समोरचा कातळ निरखला आणि थंड सुरात वदला, "आयला! डोंगर चुकलेला दिसतोय!"

बन्याचा चेहरा अवर्णनीय झाला होता बन्यानं नंतर सात्त्विक संतापानं सांगितल, "मी तर प्रसादला त्याक्षणी खालीच ढकलून देणार होतो"

तदनंतर आमची जत्रा पुन्हा एक हजार फूट उतरून आडव्या वाटेवर आली आणखी डावीकडे सरकून आम्ही वरच्या वाटेला लागलो खडकातल्या पायऱ्यापाशी पोचेपर्यंत, साडेसहा

वाजून गेलेले सकाळनतर पोटात काहीच नव्हत अधार होता, पण पौर्णिमेचा चद्रही होता, मस्त चादण होत अजूनही पन्नास फूटाच प्रस्तरारोहण करण्याचा उत्साह होता आम्ही दोर वगैरे काढून तयारीला लागलो पण अचानक अधारून येत असल्यासारख वाटल लक्ष चद्राकडे गेल तर चद्राला ग्रहण लागत होत

"अरे, आज खग्रास ग्रहण आहे!" विज्या सोमण, गुरुत्वाकर्षणाचा नियम सापडल्यागत, ओरडला

आता त्या अधारात चढण अशक्यच होत मग अर्धे वरच्या पायऱ्यावर बसले, तर अर्धे खालच्या फूटभर रुद वाटेवर, कारवीच्या रानात बसले ग्रहण तासभर टिकणार होत कुणीतरी बिस्किट वाटली थडगार, फरफरणाऱ्या वाऱ्यात गप्पा-गाणी सुरू झाली

प्रसादन "दोन दगड गडगडत पडले" अशा दादऱ्यान शास्त्रीय सगीताला सुरुवात केली मग काही चीजा आणि उदड विडबन यानी महफिल अफलातून रगली खालच्या वाटेवर शेकोटी पेटवून त्यावर दोन चहाही झाले कुणाकडे लाडू निघाले, मग तेच जेवण चद्र पुन्हा विलसू लागला आसपासच जगल आणि उभा कातळ चदेरी दुधात न्हाऊ घातल्यासारखा दिसू लागला वर पोचण्याचा उत्साह त्या बोचऱ्या थडीत कधीच गारद झाला होता मडळी जमतील तशा पथाऱ्या पसरायला लागली

मी शेकोटीच्या खालच्या बाजूस सतरजी अथरली विज्याची वाटेवर, वरच्या बाजूस काहीतरी खुडबुड चालली होती

"काय रे विज्या, पाघरूण आहे न पुरेस?" मी

"अरे, एक कडा आयडिया है!" इति विज्या

लगेच त्यान विझत आलेली शेकोटी ताब्यात घेतली निखारे अलगद वाटेवर पसरले त्यावर छानपैकी माती टाकली काय करतोस, अस विचारण्याआधीच महाराजानी त्यावर सतरजी टाकली आणि शाल घेऊन शेषशायी भगवानाप्रमाणे विज्या त्यावर पहुडला

"ओ हो हो! काय झकास एअरकडिशण्ड हे! वाऽऽ! काय छान ऊब आहे!" अशा अर्थाचे विविध चित्कार काढत विज्या आम्हाला अगाई म्हणायला लागला थडी मी म्हणत होती. माझाही डोळा लागला

अचानक जाग आली, तेव्हा मला कुणीतरी ढोसत होत घड्याळ पाहिल तर साडेतीन वाजलेले

"हु" असा एक धिक्कारयुक्त हुकार टाकून मी कूस बदलली आणि पुन्हा झोपलो


थोडाच वेळ झाला असावा, पुन्हा कुणीतरी ढोसत होत

"ए उठ ना! शेकोटी पेटव की!" विज्याच्या आवाजात काकडलेला, केविलवाणा सूर होता शिव्या घालत उठलो चद्र पश्चिमेला झुकला होता विज्या चक्क थडथडत होता लाकड त्यान आधीच जमा केली असावी मी आळस झटकून उठलो, पटकन शेकोटी केली उबदार, लाल-पिवळ्या जिभानी थडी विरघळू लागली पूर्वेला लालकिरमिजी रगाचे भालदारचोपदार दिनकराच्या स्वागतासाठी सज्ज होते जणू हे सारच नवीन असल्याप्रमाणे चादोबा पश्चिम क्षितिजावर थबकला होता डोगरमाथ्याना सोनेरी किरणानी नुकताच स्पर्श

केला होता  एक नवी पहाट होत होती  अजून पाच दिवसाचा ट्रेक शिल्लक होता  त्या मोकळ्या स्वच्छ हवेत उत्साहाच टॉनिक असावं  विज्याची थडी पळाली होती  मी एक खोल श्वास घेतला  विज्या शातता मोडत म्हणाला, ''ए, मस्त आहे नाही ?''

# मनुष्यप्राणी जन्माला आलाच नसता तर ?

चार दिवसापूर्वीची गोष्ट, आमच्या मित्राच्या घरी जोरदार आवराआवर चालू होती स्वयपाकघरातून मस्त वास येत होते. तशी तयारी आटोपतच आली होती सध्याकाळचे सात वाजून गेलेले दोन मित्र आधीच उगवले होते. इतर मडळी यायची ही वेळ झाली होती. मोठ मस्त वातावरण होत खर म्हणजे मला सांगायला लाजच वाटते आहे शाळेत गोळ्या वाटण्याइतका लहान तर मी नाहीच. पण केकवर मावणार नाहीत इतक्या मेणबत्त्याची गर्दी करण्याएवढाही मी मोठा नाही पण वयान चागला घोडा आहे त्या दिवशी माझा वाढदिवस होता, आणि तो चक्क साजरा होत होता आता तुम्ही हसाल, पण खर सांगू, एवढ्या प्रेमान वाढदिवसाच्या निमित्तान सख्खे मित्र एकत्र येण, दोन घटका आनदात हसून-खिदळून काढण, यासाठी नशीब लागत आणि मित्राच्या बाबतीत मी नशीबवान आहे. त्या दिवशी एकत्र यायला वाढदिवस हे निमित्त होतं. आणि आजकालच्या धावपळीच्या जीवनक्रमात उन्मेखून भेटायच अस ठरवल नाही, काही निमित्त साधलं नाही, तर उगाचच आपण रेसच्या घोड्यासारखे धावत राहतो आणि हाती काही लागतच



अस नाही त्या धमाल वातावरणात मला पूर्वीचा एक गमतीशीर वाढदिवस आठवला

७५ सालचा डिसेंबर महिना आय आय टी च्या गँगबरोबर आम्ही हिवाळी ट्रेकला निघालो होतो, प्रतापगड ते राजगड. प्रतापगड पाहून आम्ही केटस् पॉइटला झोपायला होतो मस्त थडी होती, ताऱ्यानी चमचमणाऱ्या आकाशाची दुलई होती, झकास गप्पाची ऊब होती, गप्पाच्या नादात कधी सुखावलो, कळलच नाही भल्या पहाटे थडीच्या चोरट्या काकडवणाऱ्या बोटानी आणि सूर्याच्या उबदार किरणानी गुदगुल्या करत जाग आणली, मला विसाव सरून एकविसाव लागत होत मी ट्रेकचा लीडर आणि माझा वाढदिवस, त्यामुळे साहजिकच चिकनचा बेत ठरला चहा, न्याहरी करून आम्ही सॅक्स भरल्या आणि मोठ्या उत्साहात, केटस् पॉइटहून खालच्या दरीत, बाळकी नदीच्या खोऱ्यात उतरणाऱ्या सोंडेवरून दुडदुडत आम्ही खाली सुटलो तासाभरात नदी पार करून आम्ही कमळगडाच्या पायथ्याच्या वैतागवाडीत पोचलो काही गावाची नाव खरच 'डेंजर' असतात आता कल्पना करा, कुठे राहता या प्रश्नाला, 'वैतागवाडीत!' अस उत्तर द्यायची पाळी आली तर? आम्ही मजेत होतो, पण वैतागवाडीचा पत्ता आम्हाला ठाऊक नव्हता

आम्ही निघालो होतो कमळगडावर वैतागवाडीतून सरळ हजार फूट चढून जगलाचा एक टप्पा लागतो त्यातून डावीकडे सरकत आपण खिडीत पोचतो मग उजवीकडच्या धारेने आपण शकराच्या मदिरात पोचतो इथून कमळगडाचा माथा जेमतेम तीनशे फूटावर आहे एकदरच किल्ला छोटासा, वाट काय सहज सापडेल, अशा तोऱ्यात बाकी मडळी पुढे निघाली. मी आणि अव्या गावात थाबलो, चिकनच्या सौद्यासाठी

"तुमच्या मागोमाग, अर्ध्या तासात पोचतो" इति मी आम्ही गावात फिरून, बरीच घासाघीस करून शेवटी दोन कोबड्या विकत घेतल्या, त्याच घरासमोरच्या ओट्यावर पाय बाधून ठेवल्या आम्ही निघणार तोच एका बयेन पाय सोडवून फडाफडाट करीत पळ काढला

"च्यायला, कोंबडी पळाली, अव्या, धरा" म्हणून मी ओरडलो आणि त्या गावकऱ्याला मी म्हटल, "जरा मदत करा"

गावकरी थडपणे उद्गारला, "मालक, आता ती तुमची आहे!" मनातल्या मनात शिव्या घालत, मी अव्याच्या मदतीला गेलो नुकत्याच नागरून ठेवलेल्या शेतात मग एक कोंबडी आणि दोन वेडे, असा अद्वितीय डिस्को सुरू झाला तब्बल वीस मिनिटाच्या धपापणाऱ्या पदलालित्यानतर कुठे बया हाती लागली! मग फारस न बोलता आम्ही चढाच्या वाटेला लागलो

एव्हाना ऊन खरपूस तापायला लागल होत, वाराही पडला होता घामाच्या धारा आणि मध्येच पाठीवरच्या बयेचा झटका आल्यागत कलकलाट मग मी कोंबडीला आणि अव्या माझ्या वाढदिवसाला, अशी यथेच्छ शिव्याची जुगलबदी एकदाचे जगलाच्या टप्प्यात सावलीला पोचलो आणि 'हुऽश्श' केल खाली बसलो धापा जरा निवल्यावर जगलातले आवाज जाणवले मडळी एकमेकाना हाका मारत होती मी जरा आश्चर्यानच कान टवकारले लक्षात आल, पुढे गेलेली मडळी, कमीत कमी चार गटात जगलभर पागली होती, वाटेचा बहुधा राडा असावा!

'हेऽ होऽऽ', मग मी आणि अव्यान बेबीच्या देठापासून बोंबलायला सुरुवात केली पुढल्या अर्ध्या तासात एकेक करीत सर्व जनता एकत्र आली दुपारचे दोन वाजून गेलेले, पोटात छान खड्डा पडलेला, आणि वाटेचा अजून पत्ता नव्हता सर्वांनी जवळच्या ओढ्याशी बसकण मारली मी खिचडीची तयारी करायला घेतली विद्या आणि अव्याला मी डावीकडच्या चढावर पिटाळल

''स्ट्रेट १५ मिनिट चालत सुटा उजवीकडे जाणारी वाट सापडली, तर एकाला तिथच बसवून दुसऱ्यान परत या!''

दहाच मिनिटात, 'जनता, रस्ता मिल गाया!!' अव्याची आरोळी आली. मग खिचडीच्या तयारीचा पसारा आवरून, आम्ही लगेच सुटलो अर्ध्या तासात शकराच्या देवळात पोचलो त्या दिवशी एक गोष्ट धड होईल तर शपथ नेमका रॉकेलचा कॅन आणि गोड्यातेलाची बाटली ग्रूपमधल्या शेवटच्या माणसाकडे त्यामुळे आम्ही पोचूनसुद्धा जेवणाची काहीच सोय करता येईना देवळातल्या साधुबाबान दया येऊन पटकन् खिचडी शिजायला टाकली मग दुपारी चार वाजता एकदाच जेवण झाल किल्ला फिरून आलो पण एकूणच, सर्व टाइमटेबल ढेपाळल होत शेवटी, वाढदिवसाची मेजवानी रात्री बाराला आटोपली फारसा लक्षात न ठेवण्यासारखा, अविस्मरणीय वाढदिवस

पहाटे पाचलाच मला हलवून कुणीतरी उठवल डोळ्यावरची झोप दूर सारत मी उठलो, तर पाढऱ्या शुभ्र दाढीत दडलेल्या असख्य सुरकुत्यातून दोन रागावलेले डोळे रोखलेले मला कळेना. साधुबाबा का रागावले? माझा हात धरून ते निघाले, देवळासमोर थाबले. माझ्या डोक्यात हळुहळू प्रकाश पडू लागला देवळासमोर खरकट सर्वत्र साडलेल कुठे हाडक पडलेली साधुबाबा तसच पुढे घेऊन गेले देवळापासून पचवीस पावलावर असलेल्या, पहिल्या झुडपामागे कुणीतरी नुकतीच 'घाण' केली होती माझी मान शरमेन खाली गेली

''बाबा, मी सार साफ करतो, माफ करा!''

बाबाजी निघून गेले मी 'भ'काराचा भूप आळवीत आमच्या मडळींना लाथा घालून उठवल माझ डोकच फिरल होत पुढल्या दहा मिनिटात आम्ही सार स्वच्छ, लखलखीत केल पुनश्च साधुबाबाची माफी मागून आम्ही चकार शब्द न बोलता कैंजळगडच्या वाटेला लागलो न बोलताच आमच्या शहरी मिजासीला सणसणीत चपराक बसली होती

'चला, निसर्गात जाऊ या' अशी पताका खाद्यावर घेऊन मोठ्या दिमाखात आम्ही ट्रेकिंग, हाइकिंगला जातो नकळत डोक्यातली भावना, हा सारा निसर्ग देवान आम्हाला आदण दिलेला आहे अशी असते तो राखायचा-जपायचा, अस आम्ही तोंडदेखल म्हणतो खर, पण ते आमच्या सस्कारात कितपत आहे? याच निसर्गाच्या कुशीत राहाणाऱ्या लोकाकडे 'पुअर पीपल' म्हणून दयाबुद्धीन, तुच्छतादर्शक पाहाण्याचा आम्हाला काय अधिकार? निसर्गात जातो म्हणून आपण काही ब्रह्मदेव नाही, किंवा आपण निसर्गावर उपकारही करत नाही तर गेल्या कित्येक हजार वर्षांत आपणच केलेल्या अपकाराची थोडीशी फेड करायला आणि आनद लुटायला आपण जातो यासाठी आपण निसर्गाचे ऋणी आहोत त्यात राहणाऱ्याबद्दल, पूर्वजानी अपार कष्टान घडविलेल्या शिल्पाबद्दल, आदर ठेवूनच असल पाहिजे परवा वाचल,

बाजीप्रभूच्या स्मारकाचे दगड कुणा कोल्हापूरच्या ट्रेकर्सच्या उपद्‌व्यापानी ढासळले अशा वेळेस स्वत चीच लाज वाटते, घृणा येते आम्ही स्वत:ला सह्याद्रीचे पुत्र, शिवरायाचे भक्त म्हणवतो, आणि अशा गोष्टी घडतातच कशा ? एक तर आम्ही बधीर, आधळे झालो आहोत किंवा इतके भेकड आहोत की, अस कुणी करत असेल तर त्याला 'ए, का रे ?' अस विचारायच धैर्यही आमच्याकडे नाही. आणि हे सार खर असेल तर आपली माणूस म्हणवून घ्यायची लायकी नाही आपला इतिहास, हा निसर्ग, ही पृथ्वी निश्चित आक्रदत असेल-म्हणत असेल, हा मनुष्यप्राणी जन्मालाच आला नसता तर किती बर झाल असतं !



# आपण हरवलो आहोत

मावळतीला काळसर-करड्या रंगाच्या ढगाची गर्दी उसळली होती. सूर्यालाही बहुधा घाई असावी सारं आकाश लालभडक करत, ढगांशी लपडाव खेळत सूर्य मावळतीकडे झेपावत होता. सथ, अथाग मातकट रंगाचं नर्मदेचं पात्र होडीखालून, अजगराच्या सुस्तावलेल्या गतीनं सरकत होतं. दोनशे ते तीनशे फूट खोल पाणी, त्यावर लपकझपक वल्ह्याच्या संगीतावर अजस्त्र संगमरवरी भिंतींमधून वाट काढणारी नाव.

'इधर प्राणने फायटींग किया था।'

'यहाँ नहायी थी फिल्मस्टार रेखा। पत्थरोंने शर्माकर गुलाबी होके देखा।'

गाईडच्या जिभेवर प्रतिभा डिस्को करत होती. सहप्रवाशांना बहुधा हे सारं फार आवडत असावं कुटुंबकबिल्यासमवेत असणाऱ्या त्या उत्तरभारतीयाच्या चेष्टामस्करीला ऊत आला होता.

संध्याकाळी साडेपाचचा सुमार; स्थळ भेडाघाट. काहीतरी बिनसलं होतं अस्वस्थ वाटत होतं, डोकं नकळत तापायला लागलं होतं. त्या साऱ्या सुसंस्कृत मंडळींना उचलून गाईडसकट फेकून द्यावं किंवा स्वत: नदीत उडी मारावी, अशी जबरदस्त उर्मी होती नर्मदेतल्या मगरींच्या सुरस 'दंतकथा' ऐकलेल्या असल्यानं मी असहायपणे बसून होतो.

निसर्गानं सभोवार एक सतत रंग बदलणारं, (जिवंत) अफलातून संगमरवरी शिल्प उभारलेलं आणि

आसपासचे सारेजण कुठल्यातरी बेगडी काल्पनिक कचकड्याच्या दुनियेत हरवलेले लोकांच्या अभिरुचीचा दर्जा ठरवणारा मी कोण? पण अशा वेळेस मात्र अभिरुचीच्या अस्तित्वाबद्दल शका येते माझे कान कधीच 'स्विच ऑफ' झाले होते पाढरे, पिवळसर, निळसर अशा असख्य रगछटाचे सगमरवरी कडे मावळत्या सूर्यकिरणात लालसर दिसत होते आकाशाचा पट्टा जणू या दोन भिंतींच्या जबड्यात अलगद सापडला होता मध्येच सायकाळच्या दर्दभऱ्या वातावरणाला साजेसा, टिटवीचा एखादा सूर उमटत होता पण बाकी सार स्वस्थ, निवात होत त्या स्वर्गीय शिल्पाचा मीही जणू एक भाग झालो होतो

"हॅलो मिस्टर, भाईसाब, बाबूजी, अब बताओ नदी कहाँसे आ रही है? दायेसे? या बायेसे?"

आम्ही अचानक एका नितळ जलाशयावर पोचलो होतो आजुबाजूला बेलाग सगमरवरी भिंतींचा तुरुग उभा आलेली दिशा सोडल्यास, समोरच्या दिशाना काही अर्थच नव्हता समोरच्या खडकाळ पसाऱ्यात नदी कुठून येत होती हे उमगतच नव्हत गमत म्हणून का होईना आम्ही हरवलो होतो!

"शो मी व्हेअर वुइ आर!"

स्कॉटिश पद्धतीने उच्चारलेले शब्द होते ॲलन फाईफ या नामाकित ब्रिटिश गिर्यारोहकाचे १९८३ चा एप्रिल महिना, माउटन लिडरशिप सर्टिफिकेट परीक्षेची एक आठवण आमची परीक्षा चालू होती दुसराच दिवस, आम्ही केनगॉर्म शिखराच्या माथ्यावरील बर्फाळ पठारावर होतो मॅप रीडिंग आणि होकायत्राचा उपयोग, याच आमच ज्ञान अतिशय निर्दयपणे तपासल जात होत. दिशाज्ञान हे गिर्यारोहणातील अत्यत महत्त्वाच अग, आणि ग्लेनमोर सेंटरमध्ये होणाऱ्या या परीक्षेतील सगळ्यात अवघड कसोटीचा हा दिवस होता पहाटेच्या बोचऱ्या थडीत माथ्याकडे चढून येताना, हळूहळू पूर्व दिशा उजळत गेली, आणि क्वचितच दिसणाऱ्या सूर्यनारायणान चक्क दर्शन दिल वेधशाळेचा अदाज चुकला होता केनगॉर्मच्या माथ्यावर ढगच काय, धुक्याचा देखील मागमूस नव्हता स्वच्छ हवेचा आम्हाला खरच फायदा होणार होता कारण अशा वेळेस दूरवरच देखील स्पष्ट दिसत, आणि दिशाशोधास सोप जात पेपर फुटल्याच्या आनदात आम्ही विविध खाणाखुणा शोधत, जवळ जवळ दिवसभर भटकून दुपारी चारपर्यंत सेंटरला परतलो आजची परीक्षा सोपी होती आणि आनद आमच्या चेहऱ्यावरून ओसडत होता ॲलन फाईफ जाताना मिस्किलपणे म्हणाला देखील, 'यू लॉट सीम टू बी लकी!' आम्हालाही हायस वाटल

त्या रात्री ११ वाजता आम्हाला उठवण्यात आल रक्तही गोठवणाऱ्या थडीत चार तास आम्ही हिमाच्छादित 'हेदर'च्या झुडपातून, वाटा तुडवत 'दिशाशोध' करत होतो आमची 'परीक्षा' ४ वाजता आटोपली केनगॉर्मचा नकाशा आजही मला लख्ख आठवतो

दिशाशोधाच तत्र हे गिर्यारोहकाला आधळ्याच्या काठीसारख असत, विशेषत· वाईट हवामानात! हिमालयात अथवा अतिशीत प्रदेशात येणार धुक, हे तुम्हाला जवळ जवळ आधळ करत अशा वेळेस त्या भागाचा अचूक-दर्जेदार नकाशा, होकायत्र आणि दिशाशोधाच तत्रच तुम्हाला तारून नेऊ शकत वर उल्लेखिलेल्या केनगॉर्म पठारावर ७१ साली भीषण

अपघात झाला होता सहाजणाचा एक चमू, एक दिवसाच्या सहलीसाठी बाहेर पडला होता सकाळी हवामान छान होत, पण पठारावर पोचतापोचता हवेची लहर फिरली. ढग दाटून आले हिमवर्षाव होऊ लागला या मडळीकडे नकाशा, होकायत्र होत, पण दुर्दैवान ते हरवल, अशा भयकर वादळात ते एक निवारा शोधत होते या पठारावर 'बॉथी' नावाचे दगडी निवारे (खोलीवजा) मुद्दाम बाधून ठेवले आहेत या मडळीना 'बॉथी' काही सापडली नाही त्या भीषण थडीत त्याचे गोठलेले देह, बॉथीपासून जेमतेम शभर फूटावर, दुसऱ्या दिवशी सापडले यामुळेच, नकाशा किंवा होकायत्र याच केवळ जुजबी ज्ञान पुरेस नसत आणि या कारणामुळेच, आमची 'दिशाशोध तत्राची' परीक्षा अवघड असली, तरी आवश्यक होती

नकाशाची आपली तोंडदेखली ओळख शाळेत होते तीसुद्धा कशी, तर परीक्षेत, 'कोळशाच्या खाणी भारतात कुठे आहेत ?' अशा अर्थाच्या काळ्या टिकल्या भारताच्या नकाशावर लावण्यापुरती तुम्हाला मुबई किंवा कर्जत परिसराचा चागला नकाशा मिळवायचाय ? कधी चुकून प्रयत्न केलात, तर कळेल की यापेक्षा गुलबकावलीच फूल मिळवण फार सोप. एकतर आपल्याकडे चागले नकाशे सहज उपलब्ध नाहीत बहुतेक नकाशे 'रिस्ट्रिक्टेड' असतात कुठले नकाशे 'रिस्ट्रिक्टेड' असावेत हे ज्या महाभागान कधीतरी स्वातत्र्यपूर्व काळात ठरवल असेल, त्याला बहुधा नकाशाचा कागद कशासाठी वापरावा हे कळत नसाव! भारताचे उत्तम नकाशे मिळतात, पण कुठे ? इग्लड, अमेरिकेत किंवा पाकिस्तान आणि चीनमध्ये

साहेबानी ४७ साली देश सोडताना आपल्यावर जे अनेक 'उपकार' केले, त्यापैकी एक म्हणजे आपल्या देशाचे सुदर, अचूक नकाशे आमच्या सुपूर्द केले अजूनही आपण १९२१ साली सर्व्हे केलेले नकाशे वापरतो एवढच कशाला, गढवालमध्ये आर्मीच्या अधिकाऱ्यानी माझ्याकडील, त्या भागाचा, परदेशी नकाशा हपापलेपणान मागून घेतला होता सर्व्हे ऑफ इंडिया बहुधा, नकाशाची सरकारी प्रेमळ खाकी दुकान चालवण्यापलीकडे काही करत नसाव

आपल्याकडे सध्या नवीन टूम आली आहे, 'टूरिझम वाढवा' पण देशातील विविध निमसरकारी टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन्सही स्थानिक नकाशाबद्दल विलक्षण उदासीन आहेत तुम्हा-आम्हाला सोडा, पण परदेशी पर्यटकाला साधी माहिती मिळण देखील कर्मकठीण काम असत

अशा परिस्थितीत गिरीभ्रमण करताना तुमच्याकडे चागला नकाशा असला तर तुमच्यासारखे भाग्यवान तुम्हीच सुदैवान महाराष्ट्रात काही गिर्यारोहण सस्थानी प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात, 'हातानी काढलेले' परतु सोप्या भ्रमणासाठी पुरेसे असे, नकाशे उपलब्ध आहेत

याउलट स्वीडन, नॉर्वे यासारख्या देशात 'ओरिएंटियरींग' (Orienteering) हा राष्ट्रीय खेळ आहे नकाशावर खुणा केलेल्या काही विवक्षित जागा, एका ठरलेल्या क्रमान शोधून काढायच्या, त्याही कमीत कमी वेळात वरील ढोबळ वर्णनावरून तसा रुक्ष वाटणारा हा खेळ 'पल्याड' अतिशय लोकप्रिय आहे आणि यात अबालवृद्ध अत्यत आवडीन भाग घेतात फारशी साधनही लागत नाहीत फक्त चागला नकाशा, होकायत्र, चपळ शरीर आणि सजग मेंदू, बस्स! एक निखळ आनद देणारा हा खेळ, पुढेमागे कदाचित ऑलिंपिकमध्येही स्थान


पटकावील.

हे सार आपल्याकडेही सहज शक्य आहे. फक्त हवेत चागले नकाशे आणि दिशाशोधाच तंत्र. मला कळलय की हा प्रकार म्हणजे स्वत:च्याच घरी डायनिंग टेबल कुठे आहे हे विचारण्यासारखा आहे एकीकडे आपण राष्ट्रीय एकात्मतेच्या वल्गना करतो, पण आपल्याला आपला आसमंत, देशच नीट माहीत नाही. 'काश्मीर ते कन्याकुमारी, भारत माझा देश आहे'-आपण घोकतो! पण खर तर, गमत म्हणून नाही, आपणच आपल्या देशात हरवलो आहोत.

# परिसर्ग - एक नवा अर्थ

बॉम्बे सेंट्रल स्टेशन सकाळचे दहा-साडेदहा वाजलेले. प्लॅटफॉर्मवर पश्चिम एक्सप्रेस लागलेली आजुबाजूला रेल्वे फलाटावर नेहमीच असणारे सर्व आवाज समोरच्याच डब्यावर एका गिर्यारोहण मोहिमेचा बॅनर लावलेला. आईवडील, मित्र, मैत्रिणी, हितचिंतक अशी धमाल गर्दी. त्यात चौदा जण विशेष उठून दिसत होते. नवे चकचकीत पाढरे शुभ्र टी शर्ट, त्यावर मोहिमेचं नाव ठळक छापलेलं हे गिर्यारोहक निघाले होते हिमालयातील शिखरावर चढाई करायला माझ्या डोक्यात सहज विचार आला, बरोबर एक महिन्यान हेच पाढरे टी शर्ट ओळखू देखील येणार नाहीत, इतके मळलेले की मूळचा रग कुठला असावा असा प्रश्न पडावा! महिन्याभरातले कष्ट, खडतर प्रवास, चढाईची जिद्द, वादळात बसून काढलेले दिवस आणि रात्री, शिखराच्या शेवटच्या टप्प्यावर थकलेल्या शरीराला खेचून नेणारी मनाची विजीगिषु वृत्ती, अशा कित्येक खुणा; वाचता येणाऱ्याला सहज त्या टी शर्टवर सापडतील.

चौदा जणाच्या चेहऱ्यावरून एक अपार उत्साह, आनद ओसडत होता गिर्यारोहणातील धोके, भीती हे नक्कीच डोक्याच्या



मागच्या कोपऱ्यात होत पण या साऱ्यावर मात करणारी जिद्द, चिकाटी सहज दिसत होती डोंगर, शिखर पृथ्वीच्या जन्मापासून आहेत तसेच आहेत, पण आहेत म्हणून चढण्याची जिद्द आहे त्यात एक आव्हान आहे आणि हे गिरीशिखराच आव्हान काही जणानाच साद घालत त्याच आव्हानाला सामोरे निघालेले, झपाटलेले चौदा जण हे सार ओळखीच असूनही मला थोडासा हेवा वाटलाच गाडी निघण्याची वेळ आली हस्तादोलन झाली, मिठ्या पडल्या 'बेस्ट लक! जपा! लढो यार!' अस पुटपुटलो बोलण्यासारख फारस नव्हतच, खूप सागण्यासारख होत पण ते न बोलताच कळल होत गाडी निघाली एकेक करत, वेग पकडणाऱ्या गाडीत ते सारेच चढले हलणारे हात एकमेकापासून दूर जात गेले, गाडी दिसेनाशी झाली

या चौदा जणाकडे नक्कीच गेल्या पाच-सहा वर्षांचा गिर्यारोहणाचा कमीत कमी अनुभव होता मित्रहो, हे सार प्रकरण सुरू कस होत, अस कुतूहल तुम्हाला नक्कीच असणार सर्वसाधारणपणे गिर्यारोहकाचा इतिहास पाहिला तर लक्षात येत, की तो/ती कुठेतरी कॉलेजात असताना चुकून एखाद्या हाइकला जातात हाइकवर 'इतर' व्यवधान लागली नाहीत आणि हाइक प्रकार आवडला, तर आणिक चार-पाच हाइकला जाण घडत मग कुठलासा रॉकक्लाइबिंग कोर्स करावासा वाटतो मुबईत गिरीविहार, क्लाइबर्स अँड एक्स्लोअरर्स, यासारखे किंवा पुण्यात बी ओ बी पी , आरोहक यासारखे क्लब हिवाळ्यात असे उपक्रम करतात आणि आजकाल हे उपक्रम लोकप्रियही आहेत महाराष्ट्र पर्यटन खाते कार्ल्याच्या रेस्टहाऊसमध्ये, असे उपक्रम गेल्या एक-दोन वर्षांपासून नियमितपणे आयोजित आहे. या अभ्यासक्रमात प्रस्तरारोहणाच्या विविध तत्राची, साधनसामुग्रीची ओळख करून दिली जाते, सराव करून घेतला जातो लक्षात ठेवण्यासारखी एक गोष्ट म्हणजे या उपक्रमावरही विविध मर्यादा असतात, त्यामुळे हा कोर्स होताच, जादूची काडी फिरून, तुमचा रॉक क्लाइबर होत नाही म्हणून तदनतर सराव, व्यासग अत्यावश्यक नाहीतर अतिउत्साहात भलतीच अवघड चढाई अगावर घेतली जाते आणि त्याच पर्यवसान वाईटही होऊ शकत आव्हान झेलण्याचा उत्साह जरूर असावा, पण इरेला पडण, ईर्षा बाळगण वगैरे गोष्टी तद्दन मूर्खपणाच्या आहेत गिर्यारोहणातून निखळ आनद मिळतो, मिळाला पाहिजे एवढ भान राहिल की पुरे.

कधीकधी शाळा-कॉलेजातून पक्षीनिरीक्षणासाठी किंवा भूगर्भशास्त्र-फील्ड ट्रीपसाठी तुम्ही बाहेर पडता डॉ सलीम अलींची बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी किंवा वर्ल्ड वाईल्ड-लाइफ फड अशा सस्थातर्फे विविध सहली, शिबिर आयोजित केली जातात या उपक्रमात केवळ बाहेर पडण, येवढच शिकवत नाहीत, तर साऱ्याच आसमताकडे रसिकतेन, शास्त्रशुद्ध पद्धतीन, डोळसपणे कस पहायच, असा दृष्टिकोन दिला जातो एकदा निसर्गाच्या वाटेला लागलेली मडळी मग डोंगराच्या आडवाटेलाही शिरतात आज काही शाळात 'निसर्ग मडळ' मोठ्या जोरात चालू आहेत

गिर्यारोहण, विशेषत. हिमालयातील, शिकण्यासाठी अनेक सोयी उपलब्ध आहेत साद देणारी हिमशिखर तुम्हाला यासाठी नेहमीच खुणावत असतात हिलरी आणि शेर्पा तेन्सिग यानी जगातील सर्वोच्च जागी, एव्हरेस्टवर, १९५३ साली पाऊल ठेवल आणि भारतात

एका नव्या युगाची सुरुवात झाली दार्जीलिंग येथील गिर्यारोहण प्रशिक्षण संस्थेच्या रूपान, पहिल्या साहसी खेळान भारतात मुळ धरली आज तर त्याचा वृक्ष झाला आहे शेर्पा तेन्सिंगला म्हणे ब्रिटनच्या राणीन 'सर'की देऊ केली होती, पण त्याऐवजी पडितजींनी शेर्पा तेन्सिंगच्या जन्मगावी भारतातील पहिली प्रशिक्षण सस्था उभारून या अचाट भारतीयाचा यथोचित गौरव केला यानतर कुलू मनाली, हिमाचल प्रदेश आणि उत्तर काशी, उत्तरप्रदेश, इथेही प्रशिक्षण-सस्था निघाल्या

१५ ते १८ वयोगटासाठी ॲडव्हेंचर कोर्स, तर त्यानतर गिर्यारोहणाचे एक महिना मुदतीचे प्राथमिक आणि प्रगत असे अभ्यासक्रम वरील सस्थात उपलब्ध आहेत बर्फावरील चढाई, दोर-खिळे, इत्यादी अत्याधुनिक चढाईची तत्र व त्याचा सराव, मोहिमाच आयोजन कस कराव, अशा विविध गोष्टींचा समावेश वरील अभ्यासक्रमात असतो हे सार शिक्षण प्रत्यक्ष अनुभवातून दिल जात आजकाल एक ते दोन वर्षापुढील पर्यंतचे अभ्यासक्रम आरक्षित केले जातात, एवढे लोकप्रिय आहेत! आणि या गरजेच्या तुलनेन प्रशिक्षणसस्था अपुऱ्या पडतात त्यामुळे दोन वर्षं आधीच प्लॅनिंग केलेल बर!

आपल्याकडे सेलिंग (शिडाच्या होडीन प्रवास), हँग ग्लायडिंग (हवाई पतगाच्या सहाय्यान हवेत विहार करण) वगैरे साहसी खेळ अभावानच आहेत. आहेत तेही दुर्लभ किंवा खर्चिक परतु आज तरी गिरीभ्रमण हा सगळ्यात स्वस्त आणि सुलभ छद आहे तो सहज जोपासता येऊ शकतो गिरीभ्रमणाचे असे विविध उपक्रम करणारे महाराष्ट्रात सुमारे ऐंशी क्लब, मडळ आहेत! तिथे नवीन येणाऱ्याच स्वागतच असत नव्यान स्थापन झालेला गिर्यारोहण महासघ, ही 'बाहेर पडण्याची' आवड वृद्धिगत व्हावी यासाठी प्रयत्नशील आहे

पाश्चिमात्य देशात साहस आणि निसर्ग याचा लहान मुलासाठी सुरेख वापर केला जातो व्यक्तित्वविकास आणि निसर्गाची ओळख, आवड यासाठी विविध साहसी उपक्रमाची सागड घालून एक जिवत अनुभव, मुलाना शालेय अभ्यासक्रमास पूरक म्हणून दिला जातो या शिक्षण पद्धतीला 'आउटडोअर एज्युकेशन' म्हणतात मुबई-पुण्याची 'रानफूल' ही सस्था ही सकल्पना आपल्याकडे रुजवण्याचा प्रयत्न गेल्या दोन वर्षांपासून करत आहे आठ ते चौदा वयोगटातील मुलासाठी एक आठवड्याचा विशेष अभ्यासक्रम देण्यासाठी अनेक शिबिराच आयोजन केल जात हे उपक्रम शास्त्रोक्त पद्धतीन वर्षभर करता यावे यासाठी कायमस्वरूपी केंद्र उभारण्याचा महत्त्वाकाक्षी सकल्प, स्वप्न या सस्थेच आहे शाळा, अभ्यासाच्या वेळात या शिक्षणाच महत्त्व जाणून, शाळा चालू असताना मुलाना अशा उपक्रमाना पाठवीत आहेत हरवत चाललेले, निकोप सस्कार पुनश्च मुळ धरू पाहत आहेत

या विषयासदर्भात लिहीत असताना 'आउटडोअर एज्युकेशन' या शब्दाशी अडखळलो जग जग पछाडल पण योग्य मराठी प्रतिशब्द मिळेना 'आउटडोअर'मध्ये दिलेल शिक्षण! चला अर्ध कोड सुटल, पण 'आउटडोअर'च काय ? खरतर आउटडोअर हा विरुद्धार्थी शब्द, पण काही शब्द त्याच्या शब्दश अर्थापलीकडे खूप काही नवा अर्थ कमावतात आज 'आउटडोअर्स' म्हणजे पर्यावरण, निसर्गातील विविध साहसी खेळ, निसर्ग-निरीक्षण माणूस हा निसर्गाबाहेरचा नसून, निसर्गातलाच आहे फक्त त्यान स्वतःच स्वत ला चार भिंतींत

कोंडून घेतलंय. तर याच चार भिंतींतून बाहेर पडणं असाही आउटडोअर्सचा अर्थ मराठी शब्द सापडेना कुणालाच न कळणारा मैलभर लांबीचा संस्कृत शब्द मला नको होता मग एक भन्नाट कल्पना सुचली. मराठीच, पण मराठी नसलेला शब्द हवा! परिसर आणि निसर्ग यावरून सुचला एक नवा शब्द 'परिसर्ग' तसं म्हटलं तर याला काहीच अर्थ नाही पण आपला वाटतो तसा तो आपलाच आहे निसर्गात असणं या निसर्गसुलभ ऊर्मीला हाक घालणारा हा शब्द. त्याचा अर्थ आपण ठरवणार आहोत, समृद्ध करणार आहोत. तोच अर्थ अनुभवणार आहोत त्यातल्या आनंदात चिंब होणार आहोत 'परिसर्गा'ला एक नवा अर्थ देणार आहोत.

# ‘अरे, कोणी जागं आहे का?’

एका शाळेच्या पालकमेळाव्यात, लहान मुलाच्या परिसर्ग शिक्षण शिबिराची माहिती सागायला मी गेलो होतो

‘आपल्या शाळेची मुल मेरिट लिस्टमध्ये आली पाहिजेत.’

‘येवढी डोनेशन देऊन आम्ही आमच्या पाल्याला या शाळेत घातल, का? तर तो मेरिटमध्ये यावा!’

‘शाळेत पुस्तकासोबत गाईडस् का नाही वापरत?’

‘गॅदरिंग-सहलीफिहली नसल्या तरी चालेल, पण मुलाकडून सभाव्य प्रश्न सोडवून घेतले पाहिजेत!’

पालक मोठ्या अहमहमिकेन स्पष्टवक्तेपणा दाखवत होते आणि शाळेच्या मडळींना बहुधा याची सवय असावी, किंवा शिक्षकही या मताशी सहमत असावेत पण माझा पार गोंधळ उडाला होता ‘शाळा हे विद्येच मदिर, मुल आणि फुल, आणि खुलणार व्यक्तिमत्त्व’ हे सारे स्वप्नवत्, खुळचट शब्द कुठेतरी डोक्यात पिंगा घालत होते जपानी रोबोट बनवणाऱ्या एखाद्या कारखान्यात प्रॉडक्शन मिटींगला बसल्यासारख वाटत होत

‘शिक्षणात दोष आहेत, पद्धत बदलली पाहिजे, जीवनमूल्याचा ऱ्हास होतो आहे’ हे सारे परिसवादाचे विषय अत्यत भेसूरपणे आणि बीभत्सपणे माझ्या डोक्यात नाच धरू लागले. खरच शिक्षण कशासाठी? आपली बुद्धी बहुधा एवढी भ्रष्ट झाली आहे की

स्वत.च्याच मुलाच हित, भविष्य हेही आपल्याला कळेनास झाल आहे. मला बसणही असह्य झाल सधी मिळताच मी सटकलो कॉरीडॉरमधून उद्विग्न अवस्थेत मी तरातरा निघालो कुठल्यातरी वर्गातून मुलाचा सामूहिक स्वर कानी आला 'येरे, येरे पावसा, तुला देतो पैसा!'

पाऊस या शब्दातच जादू आहे नेमेचि येणारा हा पावसाळा, सुखसमृद्धीच वरदान घेऊन येतो या खडकाच्या देशात जीवन फुलवत-खळाळत-कोसळत येणारा हा ऋतुराज, हे तर आपल्या ऋतुचक्राच खर वैभव चातकागत वाट पहायला लावून, उशीरा आलेल्या यावर्षीच्या वरुणराजाच नुकतच आगमन झाल होत कोकणात काही कामासाठी गेलो होतो. महाडहून दापोलीस चाललो होतो वाटेत लागणाऱ्या लाटवण घाटाच्या माथ्यावर पोचलो गेले चार-पाच दिवस पाऊस झालेला होता सभोवार नजर टाकली आणि सुखावलो

लाबलेल्या रखरखीत, शुष्क उन्हाळ्यान तापलेले डोळे, सभोवार दिसणाऱ्या हिरव्या रंगान अक्षरश: निवले आम्हीही पावसात छान गच्च भिजलो होतो, पण आम्हाला त्याच भानही नव्हत सभोवतालची जमीन अतीव सुखात निथळत होती

कोकणच्या ताबडमातीन ओहोळातील पाण्याचा फर्मास चहा केला होता. पावसाळ्यात हिरवा रगच वेड लावणारा असतो! पाऊस प्यायलेला तो मखमली हिरवा रग, नववधूच्या लाजऱ्या शालूची आठवण करून देत होता दूरवर ढगात हरवलेला सह्याद्री, एखाद्या ध्यानस्थ साधूसारखा भासत होता. आणि जणू त्याच्या पाढऱ्या शुभ्र लाब केसाप्रमाणे डोंगरमाथ्यावरून ओघळणारे असख्य छोटे-मोठे जलप्रवाह, असख्य टपटपणारे थेंब, नुकतीच न्हालेली धरती जणू उन्मन झाली होती नवनिर्मितीचे हुकार कोंभाकोंभातून ऐकू येत होते. हिरवेगार डोंगर-उतार, फेसाळत वाहणार पाणी, ढगातून झिरपत येणारा प्रकाश, समोरच्या डोंगरावर रेंगाळणारे चुकार इद्रधनुष्य, हिरव्या रगाच्या हजारो छटाचा तो अचाट आविष्कार, सारा निर्सगच जणू पागल झाला होता आणि आम्हीही धुद होतो

निसर्गाच बेभान रूप पहायला स्थळ-काळ जुळून यावे लागतात हेच खर! ७६ सालचा हिवाळा कोजागिरी पोर्णिमेची हाइक आणि आम्ही निघालो होतो इर्शाळला पनवेलच्या थोड्या पुढे, दाडफाट्याजवळचा हा डोंगर प्रबळ किल्ल्याचा शेजारी प्रबळ डोंगराच्या एक सोंडेवर, ह्या डोंगराचा काळा माथा सहज डोळ्यात भरणारा आहे दाडफाट्यावरून पाहिलात तर हा एक बसलेला, पाठमोरा सिह दिसतो पनवेलकडून किंवा चौक गावाकडून पाहिलत तर या डोंगराचे दोन विलग सुळके; खेकड्याच्या नागीगत आभाळाला गवसणी घालणारे हे इर्शाळचे दोन सुळके चमत्कार असा की या दोन सुळक्यामधील खिडीत एक नेढ आहे सुईला असत ना, तस्स! दहा-बारा माणस सहज बसू शकतील अशी ही आरपार गुहा मोठी विस्मयकारक आहे

आमचा उत्साह दाडगा होता आम्ही दहा लिटर दूध आणि दुधात घालायचा मसाला, साखर, स्टोव्ह, भाडी वगैरे अशी जय्यत तयारी करून निघालो होतो आम्ही अकराजण त्या गुहेत मुक्काम करणार होतो दूध आटवणार होतो आणि कोजागिरी पौर्णिमा होती. चक पर्वणीचा योग

दुपारीच चौकला पोचलो उशिरान जेवण करून, म्हणजे चौकमधल्याच 'हॉटेला'त मस्त

मिसळ-पाव अस हादडून, आम्ही चालायला लागलो चौक गावातून पूर्वेकडे तीनेक किलोमीटर चालून, आपण डोंगराच्या पायथ्याशी पोचतो मग इर्शाळच्या माचीवरून खाली काळसोंडेवर चढायला लागतो तासाभरात आपण माचीवर पोचतो माचीवर तस सपाट पठार आहे मध्यभागी हिरव्या गच्च झाडीतून एक पाणबुडी डोक वर काढते माचीवर उभारलेला सहाशे फूटी डोंगर आणि त्याचा माथा काळ्याकभिन्न सुळक्याचा हिरव्या झाडीच्याच कुशीत वसलेली इर्शाळवाडी चौदा-पधरा झोपड्याच पिटुकल डोंगरी गाव गावाच्या पुढ थोड येऊन आपण झाडीत शिरतो आणि शेवटच्या चढाला भिडतो मग अलगद वळसा घालून वाट खिंडीच्या खाली येऊन थाबते इथे एक थडगार, गोड पाण्याच, खडकात खोदलेल टाक आहे टाक्यापासून थोडसच पुढे, खडकात खोदलेल्या काही पायऱ्या आणि उभी चढण पार करून आपण नेढ्यात पोचतो आम्ही हुश्श करत सॅक्स जमिनीवर टाकल्या आणि तसेच इतस्तत बसलो सॅकला टेकून काही लवडले, कुणीतरी उत्साहात चहाच आधण टाकल सूर्य मावळतीला आला होता पश्चिम आकाश लालभडक करत निघालेल्या सूर्यबिंबाला बहुधा घाई झाली असावी काळ्याकरड्या सावल्याच साम्राज्य हळुहळू पसरत चालल होत खाली-दूरवर, काळ्या सापागत मुबई-पुणे हायवे सरपटत होता अस्पष्ट ऐकू येणारी ट्रकाची घरघर आणि सध्याकाळचे साक्षी हेडलाईट्स लुकलुकत पळताना दिसत होते

अशा ठिकाणी वेळेच भान सहज सुटत चहा घेऊन कधी झाला, तेही कळल नाही सारा आसमतच शात होता, निद्रिस्त होण्यासाठी, अधीर झाल्यासारखा भासत होता. पण आजचे प्रमुख पाहुणे, झळाळणारे सोनेरी पूर्णबिंब होऊन पूर्वक्षितिजावर अवतरले आणि जादू केल्यागत तोच सारा आसमत पिठुर चादण्यात न्हाऊन निघाला प्रमुख पाहुणेदेखील जणू मिस्किलपणे हसत विचारत होते 'को जागर्ति!'

थडगार वारा सुटला होता इर्शाळचे दोन सुळके गर्द काळ्या-निळ्या आकाशात ताशी व कपारी घेऊन उच जात हरवून गेले होते खालीदूरवर, चोहोबाजूस छोट्या गावाची लुकलुकणारी जाग दिसत होती डोंगराचे उतार चादण्याच्या दुधात जणू निथळत होते पलिकडे कभिन्नकाळा प्रबळचा किल्ला मोठ्या दिमाखात उभा होता खूप दूरवर खडाळ्याच्या घाटाला चमचमणारा रत्नहार घातलेला दिसत होता फरफरणाऱ्या वाऱ्यात स्टोव्हचा सूर मिसळला होता दूध आटायला सुरुवात झाली होती हळुहळू गप्पाना, गाण्याना रग येऊ लागला सार वातावरणच मत्रमुग्ध झाल्यासारख भासत होत कल्याण देशपाडेचा गळा, पहिल्या गरम दुधाच्या कपान मस्तच तापला त्यान सणसणीत आवाजात 'फड साभाळ तुऱ्याला ग आला' म्हणून सुरुवात केली आणि त्या अवर्णनीय महफिलीचा फड चागलाच रगला दुधाला कसा कोण जाणे थोडा रॉकेलचा वास लागला होता, पण कुणाच्याही लक्षात देखील आल नाही पौर्णिमेचा चद्र आकाशात चढत गेला, तसतशी आमचीही कोजागिरी रगत गेली इर्शाळसारखी अविस्मरणीय जागा, बोचरी गुलाबी थडी, इष्टमित्राच्या गप्पाची उब, आणि सभोवतालचा मतरलेला आसमत सारा प्रकारच बेभान करणारा होता

गार पहाटवाऱ्याबरोबर उजळणाऱ्या पूर्वक्षितिजान आम्हाला भानावर आणल आम्ही सॅका भरून खाली उतरायला सुरुवात केली रात्रभर जागूनही शीण कसा तो नव्हताच।

माचीवर पोचलो, अजूनही इर्शाळवाडी साखरझोपेतच होता गावाबाहेरच गुरासोबत निघालेला पोरगा भेटला सावळा, पण तरतरीत दिसणारा तो पोरगा, असेल बारा-तेरा वर्षाचा चेहऱ्यावर एक हसरा तजेला होता. जवळच्याच झाडाला टेकून, त्यान चड्डीत खोचून ठेवलेली, एक छोटीशी बासरी बाहेर काढली, आणि कुठलेसे रानवट सूर आळवू लागला त्याच्या बासरीत, त्याच्या बोटात काय गमत होती, कोणजाणे ? पण त्या पहाटवाऱ्यातले ते गोड सूर अजूनही कानात रेंगाळतात

आजही ते पोर मला स्वच्छ आठवतय खुल्या निसर्गात स्वच्छद वाढणार, शिक्षणाचा गधही नसलेल. याउलट आज शहरात वाढणारी मुल ! त्याना निसर्गाचा गधही नसतो स्पर्धात्मक 'मॉडर्न' जमान्यात, धावता धावता आपण मुलाचेही तसेच रेसचे घोडे करतो आहोत. शिक्षणाचा . उपयोग, केवळ अधिक पैसे देणारा जॉब मिळण्यासाठी आहे मेरिटमध्ये येण, हा आजचा धर्म आहे मुलाच्या मोकळ्या, स्वच्छद खुलण्याच्या वयात, आपण एक रूढी म्हणून, त्याना बळेच झापड बाधतो कुठेतरी उमलू पाहणाऱ्या त्याच्या नैसर्गिक रसिकतेच्याच गळ्याला नख लावतो आधुनिकतेच्या झपाटलेल्या वेगान आज आपल्याला एक गुगी आलीय. आणि म्हणूनच घरी, दारी, शाळेत, जमेल तिथे जाऊन-ओरडून विचारावस वाटत.

'को जागर्ति ?'

'अरे, कुणी जाग आहे का ?'

# हार्ड लक डी.टी., चलता है यार

'डी. टी· गेला!' सकाळच्या पेपरमधल्या बातमीन सुन्न केल 'एव्हरेस्ट मोहिमेचे नेते डॉ. डी टी कुलकर्णी याचे दु.खद निधन' ही ठळक अक्षर एक सटकन् कळ उमटवून गेली एरवी, इतर अपघाती मृत्यूच्या बातम्या कधी वाचल्या, तरी जाणवत नाहीत-बोचत नाहीत पण अशी बातमी मात्र लख्ख लक्षात येते त्यातून एका गिर्यारोहकाचा मृत्यू. कुणी आप्तेष्ट गेल्यागत हळहळ वाटते कारण काहीही असोत, गिर्यारोहणात धोके असतातच, त्यातून एव्हरेस्टसारख अचाट आव्हान पण म्हणून अशा बातमीचा आघात कमी होत नाही. मी डी. टी ला तसा तोंडदेखलाच ओळखत होतो गेली दोन-तीन वर्षं एव्हरेस्ट-मोहिमेची जुळवाजुळव चालू होती; वेगवेगळ्या बातम्या, प्रगती कानावर होती त्याचा उपनेता डॉ माटे येऊन काचनगगेच्या आमच्या अनुभवासदर्भात एकदा गप्पाही मारून गेला होता. याची मोहीम सुरू झाल्याच्या वार्ता, कँप-दोन लागल्याची खबर; छानच प्रगती होती! आणि अचानक ही बातमी. एक बधिरता आणणारी.

ही बधिरता ओळखीची होती १८ मे १९८८ रोजी सकाळच्या



बेड टी साठी मग पुढे केला, चहा प्यायला आग कामीचा नेपाळी चेहरा समोर स्थळ काचनगगा, बेस कँप, १८५०० फूट उची आग कामी कँप-दोनला असायला हवा, अस आश्चर्य माझ्या चेहऱ्यावर उमटता उमटताच आग कामी बोलून गेला, 'साब, सजू मर गया!' तीच सवेदना गोठवून टाकणारी बधिरता गेली दोन-तीन वर्षं वेगवेगळ्या साहसात, धडपडीत सोबत असलेला प्रिय मित्र सजय बोरोळे, पार्टनर सजू! तो सपला! सुन्न करणाऱ्या बातमीचा तसाच आघात मला अशा मृत्यूच नेहमीच आश्चर्य वाटत आलय

कुणाचहा मरण, आयुष्य सपवून टाकणारा पूर्णविराम, वाईट आणि त्याबद्दल वाईटच वाटत पण हा पूर्णविराम तर अटळ आहे, नित्य आहे ठीक आहे, अपघाती मृत्यूला काही प्रमाणात आपणही जबाबदार असतो, म्हणून कदाचित आणखी दु:ख होत पण पुढे काय? मला आज स्वच्छ कल्पना आहे, एव्हरेस्टच्या बेस कँपला डी टी च्या सहकाऱ्याची काय परिस्थिती असेल! पुन्हा शिखर सर करायचा प्रयत्न करायचा? सगळ आवरून किंवा तसच सोडून निघून यायच? सहकाऱ्याच्या दु:खाला-क्षोभाला आवर कसा घालायचा? काहीही निर्णय घेतले तरी अतिशय धिरान, जिद्दीन त्याना या प्रसगाला सामोर जाव लागणार आणि मला खात्री आहे की त्याना हे सार अवघड असूनही, निश्चित जमेल

कुणा मित्राचा, गिर्यारोहकाचा मृत्यू नेहमीच मला अतर्मुख करतो खरच डोळसपणे मृत्यूला सामोर जाताना काय वाटत असेल? गेल्या वीस वर्षात काही मोजके प्रसग येऊन गेले, जेव्हा मी मृत्यूला किंवा मृत्यून मला फार जवळून हुलकावणी दिलीय तेव्हा वाटून गेलेली थडगार-थिजवून टाकणारी भीती, जिवत असल्याचा उन्मादक आनद, हे सार स्वच्छ आठवत जीवन-मरणाच्या सीमेवरील ती 'नो मॅन्स लँड' मोठी विचित्र असते तेव्हा मग पगार, करियर, घरच्या जबाबदाऱ्या, नातेवाईक [illegible] एकट! अगदा एकट!

पण याचा अर्थ मी बेजबाबदार आहे किंवा आयुष्याबद्दल उच्छृखल आहे असा अजिबात नाही कुठल्याही साहसात असे क्षण येण अपरिहार्य आहे नाही, तशी निश्चित शक्यता असते, पण म्हणून घाबरून जायच? साहस म्हणजे असुरक्षितता नव्हे, साहस म्हणजे धोके असलेल्या एखाद्या आव्हानाला सामोर जाण तुमचा पूर्वानुभव, चिकाटी, जिद्द याच्या जोरावर त्या धोक्यावर मात करण म्हणजे साहस साहस म्हणजे बेदरकारपणे जीव धोक्यात घालण नव्हे; तर त्या अडचणींवर, धोक्यावर विजय मिळवण आणि या सर्वात एक अपार आनद आहे

[illegible] विचारला, 'काहो, तुम्ही [illegible] डोंगर का चढता?' त्या गिर्यारोहकाच सोप उत्तर होत, 'कारण ते आहेत म्हणून!' अनेका[illegible] हा प्रश्न पडतो विशेषत अपघात वगैरे अस काही झाल की हटकून विचारल जात, 'सु[illegible]चा जीव सोडून, डोगरात तडमडायला का जायच? हे वाझोट साहस का करायच?' [illegible]तेक जण या साहसातून मिळणारा आनद, हे फलित मान्यच करायला तयार नसतात. पण गिर्यारोहकासाठी, घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक श्वासाइतकाच, हृदयाच्या धडधडण्याइतका[illegible] हा आनद खरा आहे आणि मग हा आनद जर खरा असेल तर त्यासाठी स्वीकारावे ल[illegible]गणारे धोके [illegible] [illegible]शेष

समाधान देतात.

दुर्लंघ्य शिखर पादाक्रांत करण्याचा विजयोन्माद हा गुणाकार असेल तर आव्हानाला तोंड देताना येणारा मृत्यू हा भागाकार असू शकतो मग ती एक संभाव्यता म्हणून स्वीकारणं धाडसाचं होत नाही; तर तो सुजाणपणा असतो

डी टी ची बातमी आल्याच्या दुसऱ्या दिवशीच संध्याकाळी, सतोपथ शिखरावर चढाई करायला जाणाऱ्या आमच्या मित्रमंडळींच्या कंपूत बसलो होतो डी टी.ची बातमी सर्वांनीच अत्यंत गंभीरपणे स्वीकारली होती, पण कुठे अवास्तव हळहळ नव्हती. सकृतदर्शनी हे निष्ठुरपणाच वाटेल, पण मला समजत होत मंडळींच्या उत्साहाला कुठेही तडा गेला नव्हता तयाऱ्या पूर्वीच्याच नेटानं चालू होत्या जणू प्रत्येकानं मनात म्हटलं असावं, 'हार्ड लक डी टी , चलता है यार!'


अशा दुर्दैवी घटना माणसाच्या दुर्दम्य इच्छाशक्तीला कधीच पूर्णविराम देऊ शकत नाहीत, दिलाच तर हातात घेतलेल्या नव्या साहसी उपक्रमाबद्दल पुनश्च एकदा गंभीरपणे विचार करायला लावणारा स्वल्पविराम

# एक गडपुरुष

सपाटीवरची वाट सपून चढ सुरू झाला आणि आम्ही कारवीच्या रानात शिरलो पायाखालची पाऊलवाट जेमतेम चार-पाच फूटापर्यंत दिसत होती मागे वाजणारी पावल, मध्येच कुणीतरी काहीतरी बोलत होत; तेवढीच आपल्यामागे कुणी येतय याची जाणीव कारवीची पुरुषभर उच वाढलेली झुडप, एक वेगळाच कडसर वास, कारवीचा अनाहूतपणे घडणारा खरखरीत स्पर्श समोरचा डोंगर अगावर आल्यासारखा वाटत होता खरच, खालच्या सपाटीवरून डोंगराच्या पायथ्याशी पोचेपर्यंत कुठलाही डोंगर उगाच भलाथोरला वाटतो चढायला लागल्यावर पायाना चढ जाणवत राहतो पण अलगद डोंगराच थोरलेपण गायब होत एक नक्की म्हणजे, मागे वळून खाली पाहिल तर 'आपण एवढ चढून आलो ?' अस आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही

माझ्या मागून पडणाऱ्या आणि माझ्या स्वत च्या पावलाचा आवाज आपोआप एका लयीत चालला होता गाडीत बसल्यावर कशी रुळाच्या खडखडाटाची सवय होते, तसा अरे हो! सागायला विसरलोच, आम्ही निघालो होतो राजगडावर!

पुण्यातून निघे निघेपर्यंतच उशीर झाला होता चार छोटे, चार मोठे, असे आम्ही आठजण होतो. दुपार टळून गेली होती रात्रीपर्यंत गडावर पोचण्याचा बेत होता. पुण्यातून ५० कि मी अतरावर पायथ्याच वाझेघर म्हणून गाव आहे तसे गडावर येण्यासाठी अनेक मार्ग



आहेत आम्ही जाणार होतो पद्मावती माचीच्या चोर दरवाजान वाझेघरला एस.टी न पोचून चालायला सुरुवात करीपर्यंत पाच वाजून गेले होते ८६च्या ऑक्टोबर महिन्याची अखेर. तापलेल्या आसमंतावर सध्याकाळ हळूच गार फुकर घालत होती.

राजगड (४,५१४ फूट) हा तसा प्रथमदर्शनीच प्रेमात पडाव असा किल्ला शिवरायाची पहिली राजधानी मुरुबदेवाचा बोडका डोंगर, त्याला महाराजानी मोठ्या प्रेमान साज चढवला 'श्री'च्या राज्याची नुकती कुठे स्थापना होत होती तोरणा किल्ल्याच्या बुरुजात अचानक धनाचे हडे सापडले, आणि राजगडाच्या बाधकामाला पुरेस बजेट मिळाल झाल, मग कुठेच कसर झाली नाही अपार कष्ट आणि कारागिराची कला खर्ची पडली आणि हे एक दुर्गशिल्प साकार झाल किल्ले राजगड! आजही एवढा शाबूत असलेला आणि देखणा डोंगरी किल्ला महाराष्ट्रात दुसरा नाही

एखाद्या अजस्त्र विमानाच्या पखाप्रमाणे या किल्ल्याला तीन माच्या आहेत माची म्हणजे डोंगराची आडवी सोंड आणि या तिघींच्या मध्ये उपड्या वाटीसारखा एक अवाढव्य कातळ आहे त्यावर आहे बालेकिल्ला तिन्ही माच्याची नाव सुरेख पूर्वेकडील माची 'सुवेळा', सूर्योदयाच्या स्वागतासाठी उभी आहे, तर पश्चिमेकडील 'सजीवनी' माचीचा रोख आहे तोरण्याकडे. या माचीचा विशेष म्हणजे हिची दुहेरी चिलखती तटबदी. जरा पसरट, प्रशस्त अशी उत्तरेकडील 'पद्मावती' माची हिच्यावर सदर, राजवाडा, पागा, दारुगोळ्याची कोठार, अस बरच काही होत आजही त्याचे खूप अवशेष दिसतात

राजगडाचा बालेकिल्ला तर अचबित करणारा आहे बालेकिल्ल्याच प्रवेशद्वारच दोन अष्टकोनी बुरुजाच्या मध्ये आहे या ताशीव कातळावर असे बुरुज कसे बाधले असतील, हा विचारच स्तिमित करणारा आहे बालेकिल्ल्याची वाटही अवघड आहे कातळात खोदून काढलेल्या पायऱ्या आणि हाताच्या बोटांसाठी, आधारासाठी कोरलेल्या खोबणी खरच, जिजाऊसारखी माऊली या वाटेवरन कशी जात असेल?

चढाचा दुसरा टप्पा सपत आला लालसर सूर्यप्रकाश कधीच धूसर सधिप्रकाशात विरून गेला होता काळपट सावल्या आणि वाटेवरील दगड-धोंड्याचे पुसट आकार, पावल ठेचकाळू लागली होती. अचानक सपाटीवर पोचलो समोरच भिकुल्याचा वाडा वाघ्या कुत्र्यान ओरडून गोंधळ घातला त्याला चुचकारत हनुमती पुढे आला, जवळ पोचताच ओळख पटली

"काय बाळाभाऊ, आज उशीर केलात?"

तोपर्यंत मागची मडळीही पोचली होती वाड्यावर चहासाठी थाबून पुढे निघाव, असा विचार होता पण घरात पाऊल टाकताच लक्षात आल, जेवल्याशिवाय सुटका नाही! गुदमरवून टाकेल अस प्रेमळ आदरातिथ्य, अशी या वाड्याची व त्यातल्या माणसाची, एक तपाहूनही अधिक जुनी माझी ओळख, ऋणानुबध

मला आजही ते जेवण स्वच्छ आठवतय. तो वाडा म्हणजे लाबच लाब माजघरासारखा आहे त्याच्या अर्ध्या भागात गुर बाधलेली त्याचा एक विशिष्ट वास, कडब्याची चाललेली खुसफूस, कुणा गायीचा चाललेला रवथ मध्येच एखादी म्हैस उगाचच हबरते हे सारच छान चालल होत उरलेल्या अर्ध्या भागात आम्ही आठजण जेवायला बसलेलो स्वच्छ

सारवलेली चूल, छान रसरसलेली दोन माजरी म्या करत जमेल त्याच्याशी घसट करत होत्या एक कोंबडी तिची पिलावळ साभाळत, दाणे टुकत फिरत होती मध्येच हनुमती तिला 'हूऽऽड' करत होता कोपऱ्यात व्हँ! व्हँ? करत वाघ्या विसावलेला सहा छोटी मुल, वय वर्ष सात ते तान्हुल्यापर्यंत, नाना वेगवेगळे आवाज करत होती समोर ऊन ऊन शिजलेला, हातसडीच्या तादळाचा भात, वर दूध आणि साखर आजुबाजूचे अत्यत बेताल वाटणारे आवाज, पण एकत्रितपणे त्या साऱ्याच सुरेल पार्श्वसगीत होत समोर पचपक्वान्न नव्हती, पण अचाट चवदार अन्न ती अविस्मरणीय अशी मेजवानीच होती

घरात इतर कोणी? तर सत्तरीच्या, चुलीपाशी काहीबाही बोलत बसलेल्या एक आजी पोराला पाजवीत, 'तुम्ही काय आजकाल येतच नाही!' म्हणून तक्रारीचा सूर काढणारी यशोदी, आजीची मुलगी नक्षत्रासारखी देखणी (खरच, या सौंदर्याला उपमा अपुऱ्याच पडतात) आणि काबळ्यावर बसलेला, गेल्याच वर्षी पायावर तुळई पडल्यान पागळा झालेला घरचा यजमान रापून ताबूस, लाल झालेली त्वचा, (काती शब्द फारच नाजुक आहे) डोईवर बोट बोट वाढलेले पाढरे केस वाळकुडी बोट सुपारी कातरत होती चेहऱ्यावर असख्य सुरकुत्याच जाळ आणि त्यातून डोकावणारे ताबूस, लखलखीत डोळे विलक्षण धारदार आणि तेजस्वी नजर या व्यक्तीच नाव बाबू भिकुले याचे पूर्वज गडाचे किल्लेदार आयुष्यभर उन्हातान्हात, वाऱ्या-पावसात गडावर वाढलेला, गडाची काळजी घेणारा, सरत्या काळी पुरातत्त्व खात्यान हाकलल म्हणून खालच्या वाड्यावर राहणारा, नामाकित शिकारी असा हा बाबूदा गोनीदाच्या (गो नी दाडेकर) 'वाघरू' कादबरीचा नायक, पन्नास हातावरचा सुसाट पळणारा ससा टिपणारा नेमबाज भिकुलेमामा अपघातान पागळा झालेला, पण तरीही खारकेसारखा खणखणीत, १०५ वर्षांचा तरुण -बाबू भिकुले, १९९१मध्ये १५ ऑगस्टला या आयुष्यातन स्वतत्र झाला पण आजही जसाच्या तसा डोळ्यासमोर उभा राहतो, आणि त्याचबरोबर अनत आठवणी

काही माणस एखाद्या जागेशी इतकी निगडित असतात की त्याच त्या जागेशिवाय अस्तित्व त्यानाच असह्य असाव एका पावसाळ्यात गडावर पोचता पोचता वाट साफ चुकलो. धुक्यातून काबळ पाघरलेला भिकुला अवतरला, आणि वाटेला लावल पद्मावती माचीत पोचता पोचता पुन्हा हजर मग पार देवळापर्यंत आला त्याकाळी शेजारीच त्याचा वाडा असायचा बाबूदाबद्दल अशा असख्य लोकाच्या अगणित आठवणी असतील, कृतज्ञतेच्या, त्याच्या मायेच्या.

वास्तुपुरुष म्हटल की एक अनामिक भीती जाणवते पण राजगड म्हटल की बाबूदाची आठवण होतेच. तो गड आणि माणूस याना जणू वेगळा अर्थच नाही बालेकिल्ल्याला चिकटून एक विचित्र सुळका आहे खुर्चीवर बसलेला माणूस गोठला, काष्ठवत् झाला, आणि कुणी त्याची खुर्ची काढून घेतली तर जसा आकार दिसेल, तसा हा सुळका आम्ही याला 'मॅन विदाऊट चेअर' अस नाव ठेवलेल पण यापुढे तो सुळका पाहिल्यावर नेहमीच आठवेल बाबूदा या तरुणाच शरीर तर कधीच पचत्त्वात विलीन झालय, खुर्चीही गेलीय, पण या गडपुरुषाचे पाय आजही कुठेतरी गडावर अडकले आहेत, रेगाळले आहेत शिवरायाचा रोमाचकारी इतिहास, या गडाच देखणेपण, हे सार जाणवेल, पण त्याही पलीकडे राजगडावर मला नेहमीच जाणवेल ते या बाबूदाच -गडपुरुषाच- अस्तित्व

# मला दुसरी बहीण मिळाली

गणपती, दसरा, दिवाळी हे सण सर्वप्रथम आपल्या कानावर 'कर्णमधुर' संगीताच्या आतषबाजीने कोसळतात रोषणाईच्या झगमगाटाने डोळे दिपतात. पण बहुतेक वेळा हे सण साजरे झाल्यासारखेच वाटत नाहीत फास्ट लोकलमध्ये बसल्यावर, गाडी न थांबणारं स्टेशन कसं झपकन् निघून जातं, तद्वत् हे सणवार निघून जातात पुरातन काळापासून या सणवाराचं एक विशेष महत्त्व संस्कारातून आपल्या मनावर ठसलेलं आहे म्हणून आजही सण होतात, एक प्रथा म्हणून, एक रूढी म्हणून पूर्वी वार्षिक कालचक्रात या सणाची संगत समृद्धीबरोबर येणाऱ्या आनंदाशी असे. आजकाल तोच आनंद कुठेतरी उधारउसनवार आणल्यागत वाटतो

परवाच दसऱ्याला मुळशीला गेलो होतो. 'रानफूल' संस्थेच्या लहान मुलांच्या शिबिरांची सुरुवात होत होती. कँपवर पोचल्यावर साहजिकच गावात गेलो. न विसरता खिशात 'आपट्या'चं सोनं कोंबून घेऊन गेलो होतो मोटर सायकलवर खडबडीत, लालसर रस्त्यावरून, हिरव्या-पिवळसर-सोनसळी शेतांच्या मधून गावाकडे निघालो हस्ताच्या ओलसर खुणा थंडगार वाऱ्यावर जाणवत होत्या शेतावरून परत निघालेले गावकरी वाटेत भेटत होते रामराम झडत होते यंदा पीकपाणी छान होतं सारं वातावरणच निसर्गाच्या नवोन्मेषाच्या प्रसन्नतेनं उजळलेलं भासत होतं गावात पोचलो 'सोनं' लुटलं, नमस्कार-चमत्कार

झाले साधाच पण दसऱ्याच्या पूजेचा झणझणीत मटणाचा प्रसाद भाकरीबरोबर, कानामागचा घाम पुसत, हाणला गावकऱ्याच्या ताबूस, लालसर चेहऱ्यावर, घवघवीत पिकाचा, दसऱ्याच्या सणाचा आनंद ओसडून जाताना दिसत होता शहरातील डिस्को दांडियाच्या बेगडी उत्साहापेक्षा हा गावातील झगमगाट नसलेला, आजुबाजूच्याच मातीत उमललेला, सणासुदीचा आनंद पाहून खूप बरं वाटलं भाद्रपदात 'मंगलमूर्ती मोरया'नं उत्सवाची नांदीच होते पाठोपाठ येणारी नवरात्र, दसरा, कोजागिरी, दिवाळी आनंदाला उधाण आणणारे, याच मऱ्हाटी मातीतले हे सण गावागावातून, खेड्यापाड्यातून मोठ्या आपुलकीनं जतन केले जातात, साजरे केले जातात.

७६ च्या दिवाळीत आम्ही प्रतापगड ते सिंहगड अशा ट्रेकला गेलो होतो रायरेश्वर करून आम्ही दुपारचे भाटघर धरणाजवळील बसरापूर गावी पोचलो इथून नीरा नदीवरील 'येसाजी कंक' तलावावर चालणारी दुधाची लाँच सुटत असे आम्ही निघालो होतो राजगडच्या पायथ्याशी असलेल्या 'मेळे' गावाला लाँच काठाशी लागलेली तिच समोरच टोकं मातीत रुतून विसावलेलं लाँचला छप्पर होतं छपरावर दिमाखात डोकं बाहेर काढणारं धूराडं लाल-पांढरा रंगवलेला लाच, निळ्या-हिरव्या पाण्यावर मजेत डुचमळत होती विस्तीर्ण पसरलेलं जलाशयाचं पाणी, हलक्या झुळकेच्या तालावर उमटणाऱ्या असंख्य लाटा आम्ही अकराजण होतो, पटापट आत शिरून बाकाखाली सॅक्स टाकल्या आणि टपावर 'शिटा' पकडून आम्ही बसलो दोनच वाजले होते आणि लाँच सुटणार होती तीन-साडेतीनला साहजिकच टवाळ्यांना उत आला होता

लाँच साडेतीनला धक्‌धक् करत पाणी कापत निघाली आजही कंकाचा वंशजच नावाडी आहे उन्ह कलत चालली दोन्ही काठावरून हिरव्या-लालसर पाण्यात शिरणाऱ्या डोंगराच्या सोंडा, हळुहळू जांभळट-काळसर होत चालल्या हवेतला गारठा आता कपड्यांना न जुमानता अंगाला झोंबू लागला राजगडाचा काळाकभिन्न विशिष्ट आकार हळुहळू जवळ सरकू लागला मळेगाव जवळ येत चाललं दोन्ही काठावरच्या छोटुशा खेड्यातून लुकलुणाऱ्या मिणमिणत्या पणत्या जणू काजव्याप्रमाणे दिवाळीची साक्ष देत होत्या. फटाक्याचे आवाज दूरवरून चुटकीसारखे येत होते आम्ही सातच्या सुमारास मळ्यास पोचलो मिट्ट काळोख झालेला अमावास्येनंतरची द्वितीया असावी

रात्रीच किल्ल्यावर चढायचा बेत होता टॉर्चेस बाहेर पडले चंदर मळेकरच्या घरी सँडविचेस खाऊन, चहा पिऊन ताजेतवाने झालो आणि गडाच्या वाटेला लागलो रात्री अशा वाटेवर चढायला एक वेगळीच मजा येते आभाळाचं काळं निळं छत लक्ष लक्ष चांदण्यांनी उजळलेलं. तसं पाहिलं तर चांदण्याचं चांदणही पुसट वाट उजळायला पुरेसं असतं टॉर्चची गरज क्वचितच लागत होती थंडी मी म्हणत होती पण झपझप उचलल्या जाणाऱ्या पावलांबरोबर अंगात हळुहळू उब येत होती लवकरच आम्ही डोंगराच्या धारेला लागलो 'काळेसरी'च्या म्हणजेच काळेश्वरीच्या दिंडी-वाटेनं आम्ही राजगडचा माथा जवळ करत होतो ही वाट सुवेळा माचीवर गडावर पोचते शेवटची नाळ जरा अवघड आहे इथे गरज पडल्यास दोराचा वापर करावा लागतो

मध्यरात्री आम्ही गडावर पोचून पद्मावती माची गाठली  हनुमतीच्या, बाबूदाच्या नावान हाळ्या घालत आम्ही वाड्यावर पोचलो  तेव्हा राजगडावरील अखड वस्ती म्हणजे बाबू भिकुलेचा वाडा  हनुमती त्याचा जावई आणि यशोदा त्याची मुलगी  यशोदेची चार पिल्ल आणि आई, याशिवाय उदड गुर, एक कुत्र, तीन-चार माजरी आणि आठ-दहा कोंबड्या, असा सारा परिवार त्या एकाच वाड्यात नादत असे  आमचा गोंधळ ऐकून हनुमती बाहेर आला  ओळख पटल्यावर लगालगा आम्हाला सामान बाहेर ठेवायला सागून, पडवीत बसायला त्यान काबळ टाकल  'यशोदे, बाळाभाऊ आल्यात  सोबत बरीच मडळीबी हायेत! चहा टाक वाईच!' अस फर्मानही सुटल

यशोदा ही बाबूदाची एकुलती एक लेक  बाबूदाचे पूर्वज राजगडाचे किल्लेदार  हा ताठ कण्याचा म्हातारा गड राखत किल्ल्यावर वस्तीला! माझी ओळख आणि नतरचा स्नेह तीन-चार वर्षांचा  यशोदेच्या हातचा फर्मास चहा पिऊन आमचा शीण कुठल्या कुठे पळाला  धावत्या गप्पात गेल्या वर्षाचा आढावा घेऊन झाला  यशोदेच्या पोराची नाव मोठी मजेदार, ऐतिहासिक, शिवाजी, जिजाई, राम, लक्ष्मण  मोठी गोड पोर! आम्ही वस्तीला शेजारच्याच पद्मावतीच्या देवळात पथाऱ्या पसरल्या  राजगडाची महती, बाबूदाच्या शिकारीच्या कथा, यशोदेच अगत्य, अशा गप्पा मारत मारत झोप कधी लागली, कळलच नाही

दुसऱ्या दिवशी आम्ही गड फिरून १२ वाजण्याच्या सुमारास पद्मावतीच्या देवळात परतलो, आणि जेवणाच्या तयारीला लागलो. एवढ्यात शिवजा आला

"आयेन तुम्हाला बोलावलंय!"

मी उठून यशोदेन काय काम काढल अस आश्चर्य करत वाड्यात पोचलो

"काय ग यशोदे, काय काम काढल?" मी

"अहो, काम कसल! आज दिपवाळी, भाऊबीज आहे  मी तुम्हाला ओवाळणार आहे!" यशोदेन ओढवेढे न घेता स्वच्छ सागून टाकल  मीच जरा गोंधळलो  आपल्या सुसस्कृत, शहरी परीटघडीच्या मनाला अस निखळ, अनवट प्रेम देखील गोंधळात पाडत, अवघडल्यासारख होत. तो मळकट चोळी-लुगड्यातला, तजेलदार वर्णाचा, पिंग्या डोळ्याचा, ठेंगणाठुसका जीव, मोठे डोळे घेऊन मी काय म्हणतो याकडे कान लावून बसला होता. धिटाईन यशोदा बोलून गेली खरी, पण तिलाच आता चोरट्यासारख वाटत होत  हे सार क्षणभरच  मीच ओशाळून पटकन् म्हटल, "जरूर यशोदे, मला एक बहीण आहे, तू दुसरी, चल ओवाळ"

कॉलेजमधले दिवस, मी गुपचूप खिसे तपासले, दहाची नोट हाताला लागली  हायस वाटल! मी ओवाळ म्हणताच आनदान ते पिंगे डोळे हसू लागले  लगबगीन यशोदेन तबक तयार केल  ओवाळल, खीर खाऊ घातली  झाल, त्या दिवसापासून मला दुसरी बहीण मिळाली

गेली पधरा वर्षं मी अनियमितपणे, जमेल तेव्हा दिवाळीला राजगडावर भाऊबीजेसाठी जातो  जात-पात, गरीब-श्रीमती, शिक्षण, अतर हे काहीही या अडाणी, अबोध, पण अफाट प्रेमळ नात्याच्या आड आल नाही  आजही यशोदेला पातळ, पोराना कपडे, घरच्याना काही गोडधोड अस घेऊन मी जातो  खूप बर वाटत  या रागड्या सह्याद्रीच्या कुशीत अस प्रेम,

अशी माया लाभण हे मी माझं भाग्य समजतो  कसलीही अपेक्षा न ठेवता, निर्मळ माया लावणाऱ्या आणि तेसुद्धा माझ्यासारख्या भटक्या प्राण्यावर प्रेम करणाऱ्या यशोदेच मला नेहमीच नवल वाटत  या निसर्गसौंदर्यान नटलेल्या, मोकळ्या आभाळाची मायेची पाखर देणाऱ्या डोंगरी वाटावर लाभलेला हा माणुसकीचा, मायेचा ओलावा, माझ्यासारख्या शहरी जिवाला आपली मुळ कुठतरी याच मऱ्हाटी मातीत खोल गेल्याची जिवत आठवण करून देतो, एवढ मात्र खर !


# धन्य तो ए.के., धन्य ती माऊली

२

७ डिसेंबर १९९२, रविवार सध्याकाळ, पुणे ५ ४० वाजलेले दुपारच जेवण उशिरा झाल होत मस्त जेवण चागलच अगावर आल होत खर तर, चहा तयार होता पण नाठाळ डोळे आळसावून उठायला तयार नव्हते एवढ्यात मिलिद आला डोळ्यातील झोप चोळत माझ्या जेमतेम लक्षात आल की मिलिद आलाय मिलिद ताठरलेल्या चेहऱ्यान, कोरड्या सुरात म्हणून गेला - ''बाळ्या, अनिलकुमार गेला! आत्ता मुबईहून फोन होता, माहुलीला रॉक क्लाइबिंग ॲक्सीडेंट झालाय!''

सुन्न, बधीर डोक घेऊन मी उठलो यात्रिकपणे चपला पायात सरकावत म्हणालो, ''चल, ऑफिसातून फोन करुयात!''

पुढील तासाभरात मुबईला पाच-सहा फोन झाले पुष्कराज आपटे हा आमचा, दुसरा एक गिर्यारोहक मित्र, तातडीन मोटरसायकल घेऊन तयार झाला थेट शहापूरला जाव की, वाशीला अनिलच्या घरी आधी जाव, याचा एकीकडे विचार चालला होता पटकन मिलिदच्या मदतीन नकाशावर अतर पडताळली मुबईला केलेल्या शेवटच्या फोननुसार ॲक्सीडेंट आदल्या सध्याकाळी झाला होता मुबईहून वीस-एक जण



अगोदरच पुढे निघाले होते शेवटी, अनिलच्या घरी आधी जाव असा विचार पक्का झाला यात्रिकपणे टॉर्च, हेल्मेट, स्पेअर प्लग अशा गोष्टी पॅक झाल्या त्याच सुन्न अवस्थेत मी कामाची यादी आणि निरोप, पार्टनरसाठी लिहून ठेवला मी खाली उतरून येतो तर मिलिंदची आई वाटेत भेटली फोनवरच्या बोलाचालीवरून तिला एकदर प्रसगाची नीट कल्पना आली होती

"या अनिलच्या घरी कोण आहे रे?"- आई.

"मालती, चार-पाच वर्षांची मुलगी आणि आई-वडील अनिल एकुलता एकच होता।"- इति मी

"कशाला हे उद्योग करता रे?" एरवी अत्यत हसतमुख असणाऱ्या बाई सारा चेहरा उजळत, कुणाचाही खराब मूड सुधारू शकणार प्रसन्न हसू असणाऱ्या या बाई सीरियस चेहऱ्यान मला विचारत होत्या तीरागत सपकन घुसलेल्या त्या माऊलीच्या प्रश्नाचा सल लपवत मी निघालो वेग पकडणाऱ्या मोटरसायकलला 'जपून जा रे!' असे काळजीयुक्त शब्द नीट ऐकू आले होते

आम्ही निघालो पाषाणवरून मागच्या रस्त्यान देहूरोडला हायवे पकडला वडगावपर्यंत, सुमारे सव्वा तास, चकार शब्द न बोलता आम्ही चाललो होतो मध्येच गाडी स्पीड ब्रेकरवरून उडाली, सावरली, आणि आम्ही दोघही बोलून गेलो - 'च्यायला, कामेटची पेअर गेली।'

१९८६ साली कामेट, भारतातील तृतीय क्रमाकाच शिखर, उची २५,४४७ फूट हे चढण्याचा पराक्रम 'गिरीविहार'च्या मोहिमेन केला होता शिखरवीर होते कै सजय बोरोले आणि कै. अनिलकुमार सजू ८८ साली काचनजगा मोहिमेत गेला, आणि २७ डिसेंबर १९९२ रोजी मिस्कील, सुसस्कृत, शात डोक्याचा, कुशल, वाकबगार गिर्यारोहक अनिलकुमार गेला माझी ओळख ८५ च्या ऑगस्ट महिन्यातली मी नुकताच 'गिरीविहार' क्लबचा सदस्य झालो होतो 'कामेट'चे वारे वाहू लागले होते सावळा चेहरा दाढीमिशा, पण घाबरवणाऱ्या नाहीत काळे चमकदार डोळे, आणि मध्येच डोकावणारी मिस्किल झाक अनिलला पहिल्यादा भेटणाराही मनमोकळेपणान, प्रेमान दिलखुलास गप्पा मारायला लागायचा, आणि ही जादू अनिलची असायची त्याच लाडक टोपणनाव ए के । पोद्दार कॉलेजात असताना हायकिंगला सुरुवात, मग गिरीविहारचा रॉक क्लाइंबिंग कॅंप, हिमालयातील बेसिक कोर्स आणि हिमालयातील चार-पाच गिर्यारोहण मोहिमा, असा ठोस अनुभव गाठीशी असलेला, जुनाजाणता खिलाडी या साऱ्याचा गर्व जाणवणार नाही अस प्रसन्न व्यक्तिमत्व कुठल्याही मीटिंगमध्ये अप्रिय, नाठाळ मडळींना चुचकारत, त्यांच्याही लक्षात न येता विषय पुढे घेऊन जाणारा चतुर ए.के ; अशी त्याची कितीतरी रूप

असख्य नवोदित गिर्यारोहकाना मन.पूर्वक मार्गदर्शन, प्रोत्साहन देण हे त्याला सहज जमायच गिर्यारोहणासबधातल सखोल आणि अफाट वाचन, व्यासग असलेला हा प्राणी कामेट मोहिमेच्या तयाऱ्या, मारामाऱ्या, कष्ट यात कधी घट्ट मित्र झाला, हे कळलच नाही

२८ डिसेंबर, पहाटेच्या बोचऱ्या थडीत, भिवडी बायपासवरून मोटरसायकल सुसाट पळत होती पूर्व दिशा लाल होत उजळू लागली होती पश्चिमेकडे एखाद्या दिमाखदार

मुगुटासारखा करडा आकार नजरेत भरत होता हाच माहुलीचा डोंगर सह्याद्रीपासून विलग होऊन एकटा लालसर सोनेरी किरणात मोठ्या ऐटीत उभा होता याच्या आसपास अनेक सुळके आहेत, त्यापैकी करवली, नवरा, नवरी हे महत्त्वाचे. नाशिक रस्त्यावरून, आसनगावच्या जवळून हे सहज नजरेत भरतात माहुली ही कॉलेजीय दिवसातली आवडती हाइक, विशेषत पावसाळ्यातील माहुलीच्या पायथ्याचा फुसाडत वाहणारा ओढा हे खास आकर्षण तरगणाऱ्या ढगातून दिसणारे हिरवेगार उतार आणि कभिन्नकाळे, सुस्नात, बोडके, बेलाग सुळके याच्यासह आकाशाशी सलगी करणारा हा डोंगर सुदर दिसतो आज सोनेरी किरणानी झळाळणारा हा मुगुटाकारही सुदरच दिसत होता पण आज त्याच देखणेपण असह्य वाटत होत याच माहुलीन ए.के चा घास घेतला, ही भावना कुठेतरी दु खी मनाला बेभान करत होती माहुलीचा डोंगर मात्र अनादी काळापासून आजही तसाच स्थितप्रज्ञ उभा होता

मुबईच्या सह्यगिरी ट्रेकर्सची नवरा सुळक्यावर चढाई-मोहीम होती, तेरा-चौदा जणाचा चमू, त्यात सहा चागले कुशल आरोहक आणि बाकीचे मदतीला शनिवार, तारीख २६, चढाईला सुरुवात झाली 'नवरा' हा सुमारे साडेतीशे फुटाचा सुळका सध्याकाळी ५-३०चा सुमार दिनेश शेरताटे उर्फ शेरू आणि ए.के अशी जोडी शेवटच्या टप्प्यात चढाई करत होती शेरू माथ्याच्या अगदी जवळ पोचला होता ए के त्याला खालून बिले म्हणजे सुरक्षा दोर देत होता वाटेत तीन खिळे आधारासाठी ठोकलेले होते सव्वासहा झाले हिवाळ्याचे दिवस अधार लवकर पडायला लागला होता दोघात खाली परतण्याचा निर्णय झाला ए.के पहिला पधरा फुटाचा टप्पा दोराच्या सहाय्यान खाली उतरण्यास निघाला पहिल पाऊल टाकल असेल एवढ्यात ए के च्या समोरचा खिळा निखळला यापुढचा फक्त अदाज बाधता येतो सुमारे चाळीस फुटाचा दोर तिरका वर शेरूच्या दिशेन सगळ्यात वरच्या खिळ्याला बाधलेला त्याच्या आधारान ए.के लबकासारखा डावीकडे फेकला गेला असावा, आणि नतर दोरावरूनच घसरत एका चिचोळ्या घळीतून आपटत-ठेचकाळत एका छोट्या सपाटीवर येऊन आदळला असावा अजूनही तो दोरावर होता पण मणक्याना जबर दुखापत आणि कवटीला फ्रॅक्चर आणि इतर भरपूर मार लागलेला हे घडल साडेसहाच्या सुमारास, मग साडेआठपर्यंत ए के ला प्रथमोपचार मिळाले जागा अतिशय अवघड, अडचणीची द्वितीयेचा चद्र कधीच मावळलेला राजेश गाडगीळ रात्रभर ए.के च डोक माडीवर घेऊन बसलेला मणक्याच्या दुखापतीमुळे छोटीशी हालचालही ए के ला अफाट क्लेशदायक होती खरच, राजेशच्या मनोधैर्याच कौतुक वाटत ठार काळोख, अडचणीची कड्यावरील जागा, सुन्नाट वार, आणि अघोरी-बोचरी थडी -असबद्ध बोलणारा ए.के सारच भयानक वातावरण पहाटेपर्यंत ए.के जिवत होता सकाळी खाली आणताना, वाटेत त्याच प्राणोत्क्रमण झाल

अतिशय सुरक्षित चढाई करणारा, शात डोक्याचा ए के त्यान काळजी घेतलीच असणार, पण गिर्यारोहणात कितीही काळजी घेतली तरी धोक्याची जी एक सूक्ष्म शक्यता उरते तिनच वेळ साधली स्थितप्रज्ञ निसर्ग कधीच क्षमाशील नसतो एक जुनाजाणता, जिवलग गिर्यारोहक सपला

आज गिरीभ्रमण, गिर्यारोहण झपाट्यान लोकप्रिय होत आहे, अजूनही सुरक्षिततेची जाणीव,

प्रशिक्षणाच्या सोयी अपुऱ्या आहेत पण त्याचबरोबर हेही खर की ब्रिटनमध्ये १९५५ ते ७० या कालावधीत ज्याप्रमाणे गिर्यारोहणाच्या दर्ज्यात आमूलाग्र क्राती झाली, त्याप्रमाणेच महाराष्ट्रातील गिर्यारोहणही त्या अवस्थेला आहे गरज आहे सुजाण प्रशिक्षणाची आणि मग जीव हळहळतो - 'अरे, आज अनिलसारखे प्रशिक्षक हवेत!'

ए.के हा रॉकक्लायंबिंग कॅंपचा प्राण असायचा विशुद्ध तत्र, शिकवण्याची सहज हातोटी, आणि प्रशिक्षणाकडे अत्यत तळमळीन पाहाणारा हा प्राणी आज नाही यावर विश्वासच बसत नाही कॉलेजकाळात अनेक सास्कृतिक उपक्रमात हिरीरीन भाग घेणारा, गिर्यारोहणावर नितात प्रेम असलेला, एक समृद्ध, सपन्न माणूस काल हरपला

सध्याकाळचे सात वाजलेले वाशीला अनिलच्या घरी आम्ही स्मशानातून परतलो निघण्यापूर्वी आईला भेटायच होत आजारी असलेली, साठीच्या वयाची ती कृश मूर्ती या माऊलीशी काय बोलायच? मी त्याचा हात हाती घेतला

"आई " तोंडातून पुढे शब्द फुटेना

"अरे, माझी काळजी करू नका मला मालतीकडे आणि मिस्टराकडे पाहायच आहे, काळजी घ्यायची आहे" कोरड्या ओठातून अडखळत, थरथरत खबीर शब्द उमटत होते

"आणि हे पाहा, काही दिवस जाऊ देत, पण मग मात्र मालतीला पुन्हा तुमच्यात घ्या! मला माहीत आहे - गिर्यारोहण हा तिचाही छद आहे मी तिला अडवणार नाही, प्रोत्साहनच देईन."

माझे डोळे डबडबले होते एकीकडे वृद्ध नवरा, दुसरीकडे विधवा सून आणि धाकटी नात, स्वत च आजारपण, आणि तरीही ही आई ठामपणे घट्ट उभी होती आज ए.के सारखे कुशल गिर्यारोहक, प्रशिक्षक हवेत गिर्यारोहणातील धोके हे असतीलच, पण त्याच आव्हान पेलणारे गिर्यारोहक हवेत, प्रशिक्षण हव, बेलाग कडे-कपारी, उत्तुग हिमशिखर याच आव्हान माणसाच्या विजीगिषू वृत्तीला साद घालतच राहणार आणि म्हणूनच म्हणावस वाटत, 'धन्य तो ए.के., धन्य ती माऊली!'

# किनारा तुला पामराला

प्रोजेक्टरची जड बॅग सावरत मी रिक्षातून उतरलो. धावत ठाणे स्टेशनात शिरलो, पुढील एक मिनिटात पाच नबरवर व्हीटीकडे जाणारी फास्ट गाडी होती मला आधीच उशीर झालेला, मी शक्य तितक्या झपझप पायऱ्या चढू लागलो माझ्या डोळ्यासमोर, पाच नबरच्या प्लॅटफॉर्मवर गाडी येताना दिसली हाताला चागलीच रग लागली होती हात बदलत, गर्दीला चुकवत मी पुलावरून धावत सुटलो अशा धावपळीत अगावरून वाहणारी घामट गर्दी, अनाकलनीय अनाउन्समेंट्स, गाड्याचा खडखडाट, फेरीवाले-भिकारी याचा ओरडा या साऱ्या गोष्टी जाणवतच नाहीत, जणू अस्तित्वात नसल्यासारख्या मी दडदडा लोकावर आपटत, शिव्या खात पाच नबरवर उतरलो पण थोडक्यात उशीर झाला होता. गाडी सुटली होती, चुकली होती फासफूस करत मी बॅग खाली टेकली आणि त्यावरच फतकल मारली 'श्या.! च्यायला आता लेट होणार' मी स्वत वरच एवढा चिडलो होतो, की मी पुढचीही गाडी सोडली थोडा शात झाल्यावर मुकाट ठाण्याहून सुटणारी स्लो लोकल पकडली व्हीटीला पोचेपर्यंत माझी स्वत:शीच चिडचिड चाललेली खरच, छोटे छोटे पराभव देखील पचवण आपल्याला किती जड जात नाही ? आपला स्वभावच गमतीशीर असतो, किंबहुना या शहरी कोंदट वातावरणात चिडचिडा स्वभाव, हा बहुधा स्थायी भाव बनतो

डोंगरकपारीत हाच स्वभाव, हीच चिडचिड कुठे हरवते कुणास ठाऊक, पण नसते याचीच जागा जिद्द, चिकाटी घेतात खुल्या आकाशाचा, स्वच्छंद हवेचा परिणाम असेल पण साऱ्या चित्तवृत्ती उल्हसित होतात, उत्साहाचे वारे वाहू लागतात

दुपारी टळटळीत उन्हातही सुटलेला वारा गार होता जानेवारीतले दिवस खाली दूरवर भंडारदरा तलावाचं पाणी चमकत होतं पिवळसर गवताचे गालिचे वाऱ्यावर सळसळत होते समोर उत्तरेकडे रतनगडाचा काळसर खडक आणि गुहा नजरेत भरत होती १९८८ साल, कांचनगंगा मोहिमेपूर्वीचा रतनगडावरील ट्रेनिंग कँप रतनगडाच्या दक्षिणेला असलेला अनामिक सुळका सर करण्यात आम्ही गुंतलो होतो अडीचशे फूटाचा सुळका, मुख्य डोंगरापासून विलग झालेला अंतराळात झेपावण्यासाठी आतुर झालेल्या काळ्या अग्निबाणासारखा दिसत होता अर्ध्यापर्यंतचा टप्पा सर झाला होता अंगावर येणाऱ्या एका टप्प्याशी संजू लढत होता छोट्या दोराच्याच शिडीत पाय गुंतवून डोक्याच्याहीवर खिळा मारण्याची त्याची धडपड बघणाऱ्यालाही थकवत होती त्याचा सुरक्षा दोर खालच्या भेगेतील चार कड्यात अडकवलेला तोही वाऱ्यावर फरफरत होता पायथ्याशी बसलेल्या चमूच्या हलक्या आवाजात, गप्पा चाललेल्या संजय बोरोले, आमचा कांचनगंगा मोहिमेचा उपनेता, अतिशय चिवट गिर्यारोहक, संजूने तो अवघड टप्पा सर केला आता सुळक्याचा माथा सहज आवाक्यात होता संजू दोराच्या सहाय्याने दम खाण्यासाठी विसावला

मी खालून संजूच्या सगळ्या हालचाली निरखत होतो संजूकडे चढाईचं एक सहज तंत्र होतं, त्याच्या हालचालीत एक प्रवाहीपण होतं त्या मगाचच्या टप्प्याशी तो कमीत कमी अर्धा तास झगडत होता तळपणारं उन, वाऱ्याच्या अचानक बसणाऱ्या थपडा, हातापायातील ओसरत जाणारं बळ या साऱ्या प्रयत्नात खरं पाहता चिडचिड होणं, तात्पुरता होणारा पराभव अमान्य असणं, हे तसं स्वाभाविक आहे पण संजूकडे पाहताना, या साऱ्याचा अभावच नजरेत भरत होता दिसत होती एक अफाट चिकाटी खरंच, तो पाच फुटी शिडशिडीत देह एवढा वेळ अशा अडचणीच्या जागी झगडू शकतो यावर विश्वासच बसणार नाही पण हा कुठेतरी मनाचा शरीरावर असणारा विजय होता संजू त्यानंतर पुढील वीस मिनिटात माथ्यावर पोचला एखाद्या सापागत, काळ्याकभिन्न खडकावरून सरकत, अडीचशे फूटावर पोचलेल्या दोराच्या टोकावरून आरोळी आली, 'या ऽऽ हू'। एक अनामिक सुळका सर झाला होता संजू आमच्यात येऊन पोचताच, 'अग्निबाण' असं त्या सुळक्याचं बारसं झालं आम्ही दोर वगैरे आवरून, बारशाची भजी खायला रतनगडाच्या गुहेकडे तातडीने सुटलो रतनगड हा सह्याद्रीच्या पश्चिमकडेला उभा असलेला देखणा किल्ला पश्चिमकडेच्या धारेवरून प्राचीन काळापासून बैल, गाढव यावर व्यापारी माल लादून किल्ल्याच्या तटबंदीपाशी आणत असत किल्ल्यावरील मोटेसारख्या यंत्रणेने, हा माल कोठारात पोचत असे व पुढे देशावर घोटी वगैरे बाजारपेठात जात असे आता या किल्ल्याच्या पूर्वेला भंडारदरा जलाशय आहे याच सह्याद्रीच्या रांगेत महाराष्ट्रातील सर्वोच्च 'कळसूबाई' शिखर आहे

अति उंचावर प्राणवायूची किती नळकांडी लागतील, आठ टन शिधा कसा पॅक होणार,

तबू-किती कसे-कुठल्या कँपवर वापरायचे, असे काचनगगा-निगडित अनेक विषय बोलले जात होते गुहेच्या एका कोपऱ्यात चुलीवर कुणीतरी स्वयपाकाच पहात होत मोहिमेचे वीस सदस्य आणि इतरही गिरीविहारचे सदस्य, अशी सारी मडळी तशी अस्ताव्यस्त पसरली होती सकृतदर्शनी एक विस्कळीतपणा जाणवत होता परतु मोहिमेतले अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात होते त्या साऱ्या पसाऱ्यात एक शिस्त होती एका कल्पनातीत महत्त्वाकाक्षेला तिथे आकार येत होता दिवसभरात चढाईच्या तत्राचा सराव झाल्यान एक छान शीण आलेला होता पण पुढील साहसाच्या कल्पनेन सारेच झपाटल्यासारखे झाले होते पूर्वेकडे सध्याकाळची काळसर धूसरता येत चालली होती हवेतला गारठा अजून बोचरा झाला नव्हता निळसर-लालसर आकाशाचा तुकडा, गुहेच्या ओबडधोबड काळ्या रूपरेषेत बदिस्त झाला होता

रतनगडावरील ही गुहा खूपशी नाणेघाटाच्या गुहेसारखी आहे फरक एवढाच की नाणेघाटाची गुहा पश्चिमाभिमुखी आहे त्यामुळेच नाणेघाटातील सध्याकाळ अवर्णनीय सुदर असते नाणेघाटच्याच परिसरात शिवरायाचे 'अशीच आमची आई असती' हे नाट्य घडलेल एका डिसेंबरात एका मॅनेजमेंट प्रोग्रॅमच्या निमित्तान नाणेघाटात होतो गुहेमध्ये दिवसभराच्या उपक्रमाबद्दल उहापोह चाललेला भारत पेट्रोलियमचे सोळा मॅनेजर, तीन मास्तर चर्चा रगली होती मला अचानक रतनगडावरच्या त्या सध्याकाळची आठवण झाली मी कुणाच्या नकळत गुहेबाहेर पडलो दोन काळ्या दगडी भिंतींतून चालत मी घाटमाथ्यावर पोचलो अचानक माळावरील गार वारा अगाशी झोंबू लागला, नकळत मी शहारलो

पश्चिमेला सूर्य बुडायला आलेला खाली दूरवर पसरलेल्या शेताच्या तुकड्या तुकड्याच्या गोधडीवर, मध्येच कुठेतरी ओढे-नाल्याची जर चमकत होती सारा आसमत शात होता एक विचित्र स्तब्धता होती आज राहून राहून बरोबर सजू नसल्याची बोच आत कुठेतरी जाणवत होती मी हलकेच सजूच्या समाधीपाशी विसावलो काचनगगा मोहिमेत ८८ साली सजूला वीरगती मिळाली त्याच वर्षी आम्ही एक छोटीशी समाधी सजूच्या लाडक्या जागी, इथे नाणेघाटाच्या पठारावर बाधली सध्याकाळी, मी इथे एकटा असूनही, सजूची सोबत असल्याचा भास होत होता अशा वेळेसच माणूस असण किंवा नसण यातली सीमारेषा पुसट होते एक अचाट जिद्दी गिर्यारोहक, सजू शेजारीच बसला होता।

गिर्यारोहण-गिरीभ्रमणात काही जिवलग हरपले, पण अजूनही गिरीशिखर साद घालत राहतात माझी नजर समाधीवरील शिलालेखाकडे वळते कुसुमाग्रजाच्या कोलबसाच्या गर्व गीतातील ओळी जणू कुणी कानात कुजबुजत-

'अनत आमुची ध्येयासक्ती, अनत
अन् आशा
किनारा तुला पामराला '

पराभवाची भीती बाळगण, चिडचिड करण हा माणसाचा स्वभाव नाही, स्थायीभाव तर नक्कीच नाही सागराला गर्वान किनाऱ्याची आठवण करून देणारी मानवाची महत्त्वाकाक्षा अमर्याद आहे, म्हणूनच मजा आहे

# हाय कंबख्त, तुने पीही नही

'ज्या, साल्या, इन्क्रिमेंट मिळाल की पार्टी पाहिजे!'

'आयला, विकी आज फारच लवकर टाइट झाला!'

'बर झाल, बजेटच्या आधी वॉशिंग मशिन घेतल!'

'मार्केटिंगला आलेली सुलभा पाहिली का? कडक!'

कुणाच्यातरी रिकाम्या फ्लॅटमधे नुकताच धूप फिरवल्यागत गच्च कोंडलेला सिगरेटचा शिळा धूर खाली जमिनीवरील मोठ्या सतरजीवर बसण्यापासून लवडण्यापर्यंत पसरलेले विविध मानवी आकार मधे, शेव, गाठी दाणे किंवा थड झालेली तदूरी आणि अस बरच काही मध्येच घुमणार अचकट हसण पलिकडच्या खोलीत नॉनस्टॉप डिस्कोवर घुमणारा एखाद दुसरा प्राणी

वरील उद्गार आणि त्यामुळे अनेकाच्या डोळ्यासमोर सहज उभ राहणार त्यानतरच चित्र पण गमत अशी आहे की उद्गार आणि नतरच चित्र याचा त्या दिवशी काहीही सबध नव्हता

त्या दिवशी कारन पुण्याला चाललो होतो गेल्याच वर्षीच्या पावसाळ्यातली गोष्ट ऑगस्ट महिना असावा शनिवारचा दिवस, दुपारची वेळ खोपोलीपर्यंत अजिबात पाऊस नव्हता घाट चढायला लागलो आणि आभाळ मस्त कोसळू लागल वायपरचा खिच्-किच्



असा आवाज, टपावर तडतडणारे थेंब गाडीत पाणी येऊ नये म्हणून खिडक्या बद केलेल्या अधुनमधून आतून घुसकट झालेली काच पुसण आणि डोळे ताणून बाहेरच सौंदर्य निरखण्याचा प्रयत्न घुसमटल्यासारख वाटत होत घाट सपता सपता दोन वाजतात पहिल्या बोगद्याच्या शेवटी चहाची एक टपरी आहे, तिथे थाबलो चहा घेतला

सर नुकतीच ओसरली होती डावीकडच्या दरीतून ढग तरगत वर येत होते राजमाची धुक्यातच लपली होती पण अचानक ढगात एक झरोका मिळाला आणि त्यातून दिसला, प्रचड उन्मादात फेसाळत, पाढरशुभ्र अग कड्यावरून खाली खोल दरीत झोकून देणारा खड्याळ्याचा प्रपात मला राहवेना, मोह अनावर होता मी कार लोणावळ्याला पुढे पाठवून दिली, म्हटल, 'मी येतो तासाभरात!' मी पायी मजेत चालत निघालो

थोडासाच पुढे आलो असेन, तर 'सगीत' कानावर आल आल कसल, कोसळल! रस्त्याच्या कडेच्या कट्टयापाशी दहा-बारा जणाच एक टोळक होत रगसगती या शब्दाशी सुतराम सबध नसलेले रगीबेरगी कपडे, कट्टयावर कानठळ्या बसवणार सगीत, टु इन वन धर्तीच, यत्र ओकत होत. टोळक्यातले चार-पाच त्या सगीतावर जमतील तशा हालचाली करत होते (नाचत होते म्हणण कठीण आहे ) काही नुसतेच थकलेल्या मुद्रेन ढेपेसारखे बसले होते मध्येच एकाने बिअरची सपलेली बाटली सहज मजेत डावीकडे खाली दरीत भिरकावली ती खाली आपटून काचाचा खळकन् आवाज आला आनदात टाळ्या वाजवून महाराज "हुय्या!" म्हणून ओरडले काही नुसतेच आपापसात बोलत होते जवळ पोचल्यावर साहजिकच काही उद्‌गार कानावर आले लेखाच्या सुरुवातीला दिलेले! मी झपझप पावल टाकत पुढे निघालो, थाबण अशक्यच होत

मी सुन्नपणे चालतच होतो आजुबाजूला पावसाळ्यातील हिरव्या निसर्गाच अवखळ रूप मनोहारी होत वाटेत छोटे-मोठे वीस एक तरी ग्रूप्स दिसले असतील केवळ अर्ध्या तासात सारेच धुद होते त्याच्या डोळ्यात गुळगळीत गारगोटीचा भास होत होता गाणी, आरडा-ओरडा, सार चालू होत म्हटल तर मडळी मस्तीत होती, बेभान होती मध्येच एक फॅमिली ग्रूप दिसला का कुणास ठाऊक अवघडल्यासारखा वाटला रस्त्याच्या कडेला उगवलेली नाजुक जाभळी फुल बाप आपल्या चिमुकलीला दाखवत होता पण बायकोच्या तोंडावर एक बेचैनी, अस्वस्थता होती, मध्येच ती मुलावर उगाचच ओरडलीदेखील आजुबाजूनी जाणाऱ्या टोळक्याना बहुधा ते बुजले असावेत त्या बाईच्या नजरेत अस्पष्ट भितीही तरळून गेली कुणीतरी त्या प्रसन्न निसर्गात असण्याचा त्याचा हक्कच ओरबाडून घेतल्यासारख वाटत होत मला दिसत होत पण मी काहीच करू शकत नव्हतो अस्वस्थपणे मान खाली घालून मी पुढे जातच राहिलो

खरच, धुद म्हणजे काय? मला वाटत, मद्यपान कराव किंवा करू नये हा वैयक्तिक प्रश्न आहे, पण धुदी म्हणजे बधिरता नाही, मस्ती म्हणजे बेतालपणा नव्हे आपण कुठल्याही धुदीचा आस्वाद घेणच विसरलो आहोत झिंग म्हणजे गुंगी, बेभानता म्हणजे बेशुद्ध होण, एवढच आपल्याला कळत असाव मी म्हणतो, अस करण आत्महत्येसारख असलं तरी तो वैयक्तिक प्रश्न आहे! पण म्हणतात ना की, सार्वजनिक ठिकाणी घाण करू नये आणि

निसर्ग सार्वजनिक आहे! सर्वांचा आहे, आपला आहे! तिथ कुठलीही घाण करायचा आपल्याला काही एक अधिकार नाही, दुर्दैव हे की हे उमजल असत तर सिंहगडाच्या उतारावर बाटल्यांच्या फुटक्या काचाचे ढीग नसते! शिवरायाच्या किल्ल्याच पावित्र्य भंग झाल नसत! नैसर्गिक रसिकतेच्या गळ्याला नखच लावायच असेल, आत्महत्याच करायची असेल तर कुणाचा तरी रिकामा फ्लॅट ठीक आहे! त्यासाठी खंडाळ्याला जाण्याची गरज नाही!

बधिरपणे चालता चालता मला आठवली, डोंगरातली एक धुंद रात्र आषाढ महिना दोन-तीन दिवस सुटी जोडून आली होती आम्ही निघालो होतो हरिश्चंद्रगडावर हरिश्चंद्रगड हे सह्याद्रीच एक अप्रतिम निसर्गलेण माळशेज घाटाचा हा साडेचार हजार फूटावर बसलेला रखवालदार कल्याणहून सकाळची पहिली बस घेऊन घाटमाथ्यावर गावाला पोचलो, लगेचच चढायला सुरुवात केली खिंडीत पोचल्यावर डावीकडच्या उभ्या कातळावर सुरुवातीस लागणाऱ्या पायऱ्या निसरड्या असतात जपून पावल टाकावी लागतात कारण इथे पडलेल्या वाकड्या पावलाला क्षमा नाही, किल्ल्याच्या माथ्याला पोचता पोचता आमचे दोन गट पडले होते पहिला गट बराच पुढे निघून गेला आम्ही तिघच धुक्यात वाट चाचपडत मंदिराकडे निघालो

कमरेपर्यंत वाढलेल गच्च गवत, त्यातून दिसणारी पुसट वाट, कुणा उत्साही क्लबच्या मंडळींनी दगडावर रंगविलेले पांढरे पुसट बाण हलक्या वाऱ्याबरोबर पिसागत अंगावर येणार धुक पाऊस नव्हता, पण ओलसर स्पंजमधून चालल्यासारख वाटत होत कातळावरून खळाळत वाहणारे ओहोळ एका अनामिक ओढीन फेसाळत चालले होते हंटर शूजमध्ये पाणी पायाला गुदगुल्या करत होत सर्वार्थान चिंब झालो होतो हरिश्चंद्रेश्वराच मंदिर कधी आल, कळलच नाही

एका सपाट कातळात खोदून काढलेल्या लेण्याच्या मध्यभागी असलेल हेमाडपंती धाटणीच सुबक शिवमंदिर सभोवताली असलेल्या छोट्या देवड्या एक प्रसन्न पुष्करिणी आणि देवळामागे खोदलेल्या तीन खोल्या, आणि पंचवीस-तीस जण सहज बसू शकतील अशी एक मोठी गुहा हे सारच विस्मयकारक आहे

आम्ही देवळात पोचलो तर तिथे आधीचा ग्रूपही पोचला होता शिवाय पंधरा-वीस गावकरीही होते गावकऱ्यांची मोठी धामधूम चालली होती कोण, कुठले झाल्यावर कळल की मंडळी कुमशेत गावची पंचवीस कि मी पावसापाण्यात चालून 'आखाडी' एकादशीसाठी गडावर आली होती आम्हाला आमच जेवण स्वतंत्रपणे शिजवण अशक्यच होत कारण प्रसादाच जेवण्याचा गावकऱ्यांचा प्रेमळ आग्रह मग काय? सॅक्स कोपऱ्यात टाकून, कपडे बदलून, धुनीत पेटलेल्या विस्तवापाशी गावकऱ्यांसोबत विसावलो बाहेर पावसाच तांडव सुरूच होत, मोबत भणाणणारा वारा आणि आम्ही मात्र गुहेच्या उबदार निवाऱ्यात सुखावलो होतो गप्पा मस्त रंगल्या

पावसाळी कुंद हवेत दिवस मावळत नाही अचानक लक्षात आल, रात्र झालीय. पूजा आटोपली होती मस्त 'प्रसाद' झाला होता पेटीवरून कुणाची तरी बोट फिरली, ढोलक्यावर थाप पडली आणि झांजा-चिपळ्यांच्या गजरात, खणखणीत आवाजात भजन सुरू झाल

बाहेर कोसळणारे मेघमल्हाराचे सूर, मदिराच्या गाभाऱ्यातून तेवणारा दगडी समयातील उजेड, पिंडीवरील अभिषेकाची सतत धार, मधल्या शेकोटीच्या हलणाऱ्या लालपिवळ्या प्रकाशात उजळलेले चेहरे, झपाटलेल्या तालात सुवर्णाप्रमाणे लखलखणाऱ्या झाजा आणि या सर्वांच्यात झालेला 'जय हरी विठ्ठल, जय हरी विठ्ठल' असा घोष अगावर सरकन काटा आला आमच्यातल्या कल्याण देशपाडेनेही सुरेल अभग म्हणायला सुरुवात केली, आम्हीही त्यात सूर मिसळला गावकऱ्यानीही नवीन सूर काढला. साऱ्याचच देहभान हरपल होत


खरच, ती रात्र अविस्मरणीय होती गावरान असेल पण सगीत होत झिंग आणणारा ताल होता, बेभान करणारी लय होती आजुबाजूला चिंब होणारा, निथळणारा निसर्ग होता. पावसाच्या सततधारानी जणू एक पडदा धरला होता न ठरवता एकत्र असण्यातही एक मस्ती होती. सगळ कस साध-सोप होत कुठलाही आव नव्हता सारेच स्वच्छद होते! धुद होते!

तर सह्याद्रीच्या कुशीत, कडेकपाऱ्यात घोंघावणाऱ्या वाऱ्या-पावसात रगलेली अशी एक रात्र!

हाय कबख्त! तूने पीही नही! अस म्हणताना गालिबचा रोख पिण्या-न पिण्याकडे, काय पिताय याकडे नसावा, बहुधा त्याला म्हणायच असाव की, 'अरे कबख्त, पी, पण धुद हो!'

# ‘आडवाटेची सावली’

चकचकीत, रुद, दुतर्फा वाहणारा रस्ता, चकचकीत गाड्या, ट्रक याची अव्याहत वर्दळ वेळ दुपारची, पण आभाळात चुकार ढगाची गर्दी होती रस्त्याच्या दोन्ही कडेला कुपण घातलेली आखीवरेखीव डोलणारी शेत मे महिन्यातले दिवस, वसत ऋतूची नुकतीच चाहूल लागलेली पाढऱ्या शुभ्र फुलानी डवरलेली सफरचदाची झाड, दूरवर डोंगराचे उतार, सूचीपर्ण वृक्षानी नटलेले ‘नॉईस्टाट’ अशा उग्र नावाच्या पाटीखाली मी रस्त्याच्या चुकीच्या बाजूला गाड्याना अगठा दाखवत उभा होतो १९८५ साल, ऑस्ट्रीयामध्ये व्हिएन्ना शहराच्या बाहेर वीस एक कि.मी अतरावरील ‘नॉईस्टाट’ खेड्याच्या बाहेर मी, पूर्वेकडे साल्झबर्गच्या दिशेला जाण्यासाठी लिफ्ट मिळते का, अशी वाट पहात चातकासारखा उभा होता पाठीवर विंचवाचे बिऱ्हाड, म्हणजे सॅक, अगावर थडीसाठी उबदार स्वेटर, जॅकेट वगैरे मला उभ राहून दोन तास सहज झाले होते पाय आता दुखायला लागले होते युरोपात वाहन रस्त्याच्या उजवीकडून जातात, म्हणून मी आपल्या दृष्टीन चुकीच्या बाजूला उभा राहून पूर्वेकडे अगठा दर्शवित उभा होतो युरोपात लिफ्ट



मागण किंवा 'हिच हायकिंग' करण हे नवीन अजिबात नाही काहीतरी मागण्यासाठी अगठा दाखवण ही गमतीशीर पद्धत मात्र जगभर रूढ आहे कॉलेज विद्यार्थी, म्हातारी मडळी, किवा चण चण आहे म्हणून कुणीही लिफ्ट घेऊन प्रवास करत यात मागणाऱ्याला फारसा कमीपणा वाटत नाही, आणि लिफ्ट देणाऱ्यालाही फार उपकार केल्याचा गर्व नसतो

ऑस्ट्रीया हा तसा छोटुसा देश, पण यात चार भाषा प्रचलित आहेत जर्मन, फ्रेंच, लॅटिन आणि ह्याची सरमिसळ असलेली एक बोली भाषा या शिवाय मोडक तोडक इग्रजी बहुतेकाना कळत त्यामुळे सुरुवातीला युरोपात फिरण्याची एक जबरदस्त भीती होती, ती व्हिएन्नातील पाच दिवसाच्या वास्तव्यात आता दूर पळाली होती पाय आता खरच जाम दुखायला लागले होते एवढच काय, हातालाही हलवून हलवून रग लागायला लागली होती बहुधा ह्या साऱ्याची दया येऊन एक चकचकीत पाढरी मर्सिडीज कचकन् ब्रेक लावत, रस्त्याच्या कडेला थाबली माझा विश्वासच बसेना गेल्या तीन तासातले असख्य निराश क्षण आणि गळाठलेले पाय मला चटकन् धावताही येईना मी कसाबसा धडपडत, सॅक सावरत गाडीपाशी पोचलो

''साल्झबर्ग बिते ?'' माझे धाप लागलेले शब्द गाडीच्या खिडकीतून सोनेरी ब्लॉड केसातून डोकावणारे निळे डोळे पटकन् ''यो! यो!'' असा ऑस्ट्रीयन होकार देऊन गेले पुढील मिनिटात मी बावचळत तिच्या शेजारी बसून साल्झबर्गच्या दिशेने सुसाट निघालो होतो शभर एक कि मी वर असलेल्या 'सिमरिंग' या आल्प्सच्या सुरुवातीला असलेल्या गावापर्यंत ती मला घेऊन जाणार होती बयेच नाव 'ग्रेशेल', निघाली होती आई-वडिलाकडे एक भारतीय भेटल्याचा प्रामाणिक आनद होता मोडक्यातोडक्या इग्रजीत आमच्या गप्पा सुरू झाल्या रम्य निसर्ग दुतर्फा सुसाट वेगान मागे सरकत होता. गाडीतल्या स्टीरिओवर बिथोवेनची सिफनी मद आवाजात रगात आली होती. पधरा मिनिटापूर्वीचा मी आणि आत्ता मजेत गप्पा मारणारा मी, मी स्वत शीच आश्चर्य करत होतो कधी पोचणार, कसे पोचणार अशा प्रश्नाना अशा वेळेस फारसा अर्थच नसतो अतराळात स्वच्छदपणे विहरत असल्याची भावना होती, प्रवास चालू होता, छान कपनी होती, रम्य निसर्ग होता कुठलीही विवचना नव्हती, एक उन्मुक्त आनद होता

'हिच हायकिंग' ह्या प्रकारची लज्जत मात्र मी ७५ साली हिवाळ्यात प्रथम अनुभवली विद्यार्थी असल्यान खिशात फारसे पैसे नाहीत यावर कुणाचाही विश्वास बसण्यासारखी परिस्थिती होती मी निघालो होतो रत्नागिरीला सुरुवात केली अलिबागपासून सुट्टीचे दिवस होते त्यामुळे वेळेच बधन नव्हत वाटेत अमुकच ठिकाणी पोचायच असही बधन नव्हत आधी दोन दिवसात मजल-दरमजल करत मी चिपळूण गाठल होत दुपारी एकाकडे बादरायण ओळख काढून जेवलो, झोपलो दुसऱ्या दिवशी सकाळी मी बस पकडावी असा यजमानाचा आग्रह चालला होता खर तर त्याना माझ बस पकडण, ट्रक-स्कूटर अशा लिफ्ट्स मिळवण हे सार अनाकलनीच होत त्यातून मी तसा 'चागल्या घरचा मुलगा' दिसत होता हो! म्हणजे घरून पळून वगैरे आलेला नसणार, आणि त्यामुळेच 'हिच हायकिंग' प्रकरणच त्याना गोंधळात पाडणार होत त्याचा विस्मय तसाच ठेवून मी सॅक पाठीवर टाकली आणि मार्गस्थ

झालो

गावाबाहेरच्या नाक्यावर आलो. गोवा हायवे असल्यान रस्त्यावर वाहनाची रहदारी खूप असते अर्धा-पाऊण तास लिफ्टसाठी ताटकळल्यावर मी चालत दक्षिणेकडे निघालो उन्हाचा तडाखा कमी झाला होता हवेत गारवा यायला लागला होता शेतावरून परतणारे शेतकरी, गुर-ढोर, सध्याकाळच पाणी उच भरून ठेवण्यासाठी डोईवर हडे घेतलेल्या, लगबगीन पाणवठ्यावरून परतणाऱ्या बायका, उच माडातून उतरणारे सोनेरी सूर्यकिरण सध्याकाळची ही वेळ मोठी गमतीशीर असते. आपला मूड कसा आहे त्यानुसार या 'गोधुली'चा आपल्यावर परिणाम होतो मी गाण गुणगुणत मजेत होतो मूड अर्थातच मस्त होता

शहरापासून दूर, डाबरी रस्ता हा जणू सर्वांच्या जीवनाच एक सूत्र असत तालुक्याच्या गावी जायचय, कुणी आजारी आहे, कुणाच लगीन आहे, ममईला नोकरीसाठी जायच आहे, ममईहून पोरगा यायचा, साऱ्याचा सबध या रस्त्याशी ग्रामीण शात जीवनाचा पोत बदलणारा हा गुळगुळीत डाबरी पदर पण हे सार पहायला, अनुभवाला मिळत असल्यान मी मात्र या रस्त्याचा शतश ऋणी होतो

पश्चिम आकाशात लालभडक वणवा पेटवत सूर्यनारायण घरी निघाले होते मला एका स्कूटरवाल्यान लिफ्ट दिली होती त्या सध्याकाळी भाग्य खरच थोर होत पौर्णिमेचा चद्र नुकताच पूर्वेच्या डोंगरामागून वर येत होता मावळतीला काळसर होत चाललेल लालसर आकाश, मस्त गार वारा, आणि समोर काळ्या फितीगत उलगडत जाणारा काळाभोर वळणदार रस्ता मी मजेत आणखी तीस एक कि मी चा टप्पा गाठला स्कूटरवाला मुख्य रस्ता सोडून आत गावात वळणार होता मी पुनश्च एक-दो करत मार्गस्थ झालो

त्या रात्री दहाचा सुमार मी हातखब्याला ट्रकमधून खाली उतरलो रत्नागिरी तस जवळच होत पण गेल्या तीन तासात ट्रकमध्ये दाटीवाटीन बसून अग मात्र आबून गेल होत पोटात कावळेही कोकलत होते मी हातपाय ताणून आळस दिला 'आता कुणी गरमागरम जेवायला दिल तर काय मजा येईल' माझ्या भुकेल्या पोटाला सहज सुचल अशा वेळेस स्वर्गीय आनदाच्या कल्पनादेखील किती साध्या, सोप्या असतात रस्त्यालगतच्या कुपणाआड एक सरदारजी दिसला "सत् श्रीअकाल", मी आश्चर्य लपवीत पजाबी सलाम ठोकला सॅक सावरत सरदारजीपाशी पोचलो सरदारजी चक्क मराठीत बोलू लागला मी अडखळत माझ्या अचरट प्रवासाची कहाणी सागायला लागलो पण सरदार फारच प्रेमळ आधी तो मला आत घरात घेऊन गेला पाणी आणि गूळाचा खडा समोर आला मला धक्क्यावर धक्के बसत होते कारण यजमानीण बाई नऊवारी लुगड्यात होत्या

बाहेर पिठूर चादण्यात असख्य गुलाब फुललेले घराच्या पडवीत मी तर आता सुस्तावलो होतो साधच पण मस्त जेवण झाल होत सरदारजी, त्याची ब्राम्हण पत्नी आणि मी अशा गप्पा रगात आल्या होत्या सरदारजीची कहाणी विलक्षण होती फाळणीच्या सुमारास देशोधडीला लागलेला त्याचा बाप या पोरासह रत्नागिरीस येऊन स्थायिक झाला हा सरदार तसा सस्कारान अस्सल कोकणी त्याच्या प्रेमप्रकरणान रत्नागिरीत त्याकाळी चागलच वादळ उठलेल त्या कोकणी ताबड्या मातीत गुलाब फुलवण्याच वेड या बाप्यान आपल्या बायकोसह,

गावाबाहेर पडून, जोपासलेल आता तर तो गुलाब मुबईच्या बाजारात पाठवतो.

घरापासून इतक्या दूर मी एका प्रेमळ घरात सुखावलो होतो रात्र बरीच झाली होती. सरदारजीन दिलेल्या प्रेमळ दुलईत मी पहुडलो होतो कोण-कुठला सरदारजीन पण ज्या प्रेमान त्यान आदरातिथ्य केल होत, ते खरोखरच माझ्या शहरी बद दाराच्या सस्कृतीला विस्मयकारक वाटत होत आजही आडवाटेच्या गावात ही माणुसकी, आपुलकी सहज सापडते स्वार्थी, दाभिक शहरी कोलाहलाच्या तुलनेत हे निरपेक्ष प्रेम खूप सुखद वाटत डोंगरी, न मळलेल्या आडवाटावर आजही ही माणुसकीची, प्रेमाची सावली खुणावत राहते धडपडत, जिद्दीन आयुष्य जगणाऱ्या साध्या माणसाच्या सहवासाचा मोह पाडत राहते

# बरं झालं, थोडक्यात निभावलं

ल हानाच रडण, पख्याची घरघर, फोम उसवलेले बाक, कोपऱ्यातल्या टेबलावर खूप हाताळलेली चार-पाच फिल्मी मासिक, आणि काही गुळगुळीत-हमखास रशियन मासिक, औषधाचा दर्प

वर्णन दवाखान्यातल्या वेटिंग रूमच आहे हे सागण्याची गरज नाही परवाच दिवाळीनतर आमच्या डॉक्टरमित्राच्या दवाखान्यात भेटण्यासाठी गेलो होतो कपाऊडर म्हातारबुवानी हसून स्वागत केल आणि आत निरोप पाठवला

"डॉक्टरानी आत बोलावलय" अर्ध्या मिनिटात आतून बोलावण आल इतर पेशटस्च्या चेहऱ्यावरील कुतूहल, 'साला, वशिल्या घुसला!' अशी चिडचिड झेलत मी कन्सल्टिंग रूमचा दरवाजा उघडून पटकन आत शिरलो डॉकशी नमस्कार-चमत्कार झाले आत एक बाप आपल्या मुलाला घेऊन आलेला पोराचा उजवा हात भप्प सुजलेला, जाभळट-लालसर दिसत होता भाजलेल असाव

"काय हो, काय झाल?" मी अनाहूतपणे विचारून गेलो

"काही नाही, फटाक्याचे प्रताप! चिरजीव एकदा पेटवलेला भुईनळा, नीट पेटलाय की नाही पाहायला गेले भुईनळा अचानक भसकन् पेटला आणि रावसाहेबाच्या हाताचा फुटबॉल झाला!" चिताक्रात बाप त्रासून बोलत होता, पोरग मुसमुसत होत

खरच, मुल आगाशा, फटाक्याशी किती सहजपणे खेळतात त्यातला धोका त्याच्या बुद्धीला शिवतदेखील नाही, बऱ्याच वेळेला तर त्यात फुशारकीचाच भाग जास्त असतो पण मुलानाच का दोष द्यायचा? मोठेही काही कमी नसतात स्वत च्या सदर्भातला धोका, स्वत.च्या मर्यादा हे सार विसरून मोठेही काही वेळा गाढवपणा करतात आणि प्रसगी ते अगाशीही येऊ शकत आम्ही ७७ सालच्या एप्रिल महिन्यात माथेरानजवळच्या पेब किल्ल्यावर हाइकला गेलो होतो बेंबट्यान त्या दिवशी वात आणला!

कॉलेजमधल्या नाटकी ग्रूपची हाइक ठरली त्या कपूत आम्ही तीन-चार जण 'डोंगरी' असल्यान साहजिकच हाइकची सर्व व्यवस्था, जबाबदारी आमच्यावर, आणि हाइकचा मी लीडर! त्यामुळे मडळीच्या कानीकपाळी ओरडून, बरे बूट, वॉटरबॅग, उन्हासाठी टोपी अशा गोष्टी प्रत्येकाकडे आहेत ना, हे तपासण भाग होत बऱ्याच जणाकडे सॅक्सही (पाठपिशव्या) नसल्यान इतराकडून गोळा कराव्या लागल्या हायकर्सची हाइक आणि अशा नवथर मडळींची हाइक यात फरक असतो पण 'उ, त्यात काय मोठस?' अशा तोऱ्यात मी होतो शेवटच्या कर्जत लोकलमध्ये गप्पा, गाण्याना ऊत आला होता त्या वातावरणात माझ्या डोक्यात असलेल पुसट टेन्शनही विरून गेल नेरळला उतरून, स्टेशनवरील 'चहा' नामक रगीत, कोमट, पाचट पेय पिऊन आम्ही चालायला लागलो

माथेरानच्या डोंगराच्या मधल्या सोंडेवरून एक शॉर्टकट 'जुम्मापट्टी' स्टेशनपाशी रेल्वेमार्गावर पोचतो छोट्या रुळावरून धावणारी मिनी रेल्वे हे माथेरानच खास आकर्षण ट्रॅकमधून चालत आम्ही उत्तरेकडे निघालो स्लीपर्सवरून चालण ही एक शिक्षा असते, पुढच्याच स्लीपरवर पाऊल टाकाव तर छोट पाऊल पडत, एका टागेत एक स्लीपर वगळून पुढल्यावर पाऊल टाकाव तर चालण्याचा ताल बिनसतो एकूण काय, रेल्वेट्रॅकवरून चालण तापदायकच आमचे चालता चालता साहजिकच तीन ग्रूप होऊन थोडे पुढे-मागे झाले होते.

सुमारे दोन कि मी चालल्यावर लक्षात आल की, तिसरा ग्रूप फारच मागे पडतो आहे आम्ही मागचे येण्याची वाट पाहत थाबलो तिसरा ग्रूप जवळ आला बेंबट्या कुणा उच मुलाच्या खाद्यावर हात टाकून जरा विचित्रच चालत होता बेंबट्या हा त्याच्या घराण्यातला सर्वात उच पुरुष पुरेपूर पाच फुटाचा बेबट्या चालताना अडखळला मी चटकन् पुढे झालो "काय रे काय झाल?"

"बेंबट्याची काशी आहे, त्याला धाप लागलीय, श्वास घ्यायलाही त्रास होतोय बहुधा अस्थम्याचा ॲटॅक आहे" - इति कुणीतरी

बेंबट्या जवळच्याच एका दगडावर विसावला पाणी वगैरे दिल धपापणारा श्वास निवल्यावर बेंबट्या म्हणाला, "अरे, मला कधी कधी त्रास होतो आणि आज च्यायला औषधही बरोबर आणायला विसरलो"

मला हा साराच मामला अनपेक्षित होता 'साल्या आधी सागायला काय धाड भरली होती!' जिभेवर आलेली चिडचिड मी मागे परतवली. बेंबट्या पुढे येण अप्रस्तुतच होत सर्वांनीच परत फिरण किंवा कुणीतरी एक-दोघानी बेंबट्याबरोबर थाबून गाडीन परत जाण आणि बाकीच्यानी हाइकला पुढे जाण, असे दोनच पर्याय होते

बेंबट्या आमच्यातल्याच एकाबरोबर 'जुम्मापट्टी' स्टेशनवर थांबला आम्ही पुढे निघालो पॅनोरामा पॉइंटच्या खाली रेल्वे ट्रॅक सोडून वाट पेबच्या खिंडीत उतरते पेबच्या किल्ल्याला पश्चिमेच्या अगान वळसा घालून तटाखालती पोचते इथून किल्ल्याचा माथा जेमतेम चारशे फूटावर आहे पण सुरुवातीचे तीस फूट वाट कठीण आहे; प्रस्तरारोहण कराव लागत

तटापाशी दोर वगैरे काढून आम्ही नवागतासह 'तो' अवघड टप्पा करण्यात गुतलो होतो पहाट होत होती किल्ल्याच्या माथ्यावर पोचेपर्यंत चागलीच हुडहुडी भरली होती पश्चिम कड्यावर असल्यान सूर्यनारायणाच अस्तित्व जाणवत होत पण ऊब नव्हती माथ्यावर पोचताच मात्र सोनेरी झळकणाऱ्या 'मित्रा'न उबदार स्वागत केल उत्तरेकडे चंदेरी, म्हैसमाळचे दोन सुळके धुक्याच्या झिरझिरीत वस्त्रातून डोक वर काढत मोठ्या रुबाबात उभे होते दूरवर पूर्वेला माहुलीचा डोंगर, तर उत्तरकडे नजर वळली की, भीमाशकर-राजमाचीचे दोन बालेकिल्ले नजरेत भरत होते सभोवतालच्या गवतावर अजून दवाची ओल होती प्रसन्न वातावरण होत 'बेंबट्या' प्रकरणाच आम्हालाही एव्हाना विस्मरण झाल होत

सोबत आणलेल्या ब्रेडचा आणि उकडलेल्या अड्याचा आस्वाद घेता घेता नवीन टूम निघाली - "आपण पेब-माथेरानच्या खिंडीत रॅपलिग करून उतरुया !" चार-पाच जण वगळता इतर सारेच उत्साहान तयार झाले दक्षिणेच्या टोकावरून सरळ खाली दोनशे फूटावर खिड आहे इथे दोराच्या सहाय्यानच उतराव लागत लगेच दोर बाधून उतरण्याची तयारी झाली मी अर्ध्यावरील टप्प्यावर जाऊन बसलो, खाली उतरणाऱ्या मडळींना मदत करण्यासाठी एकेक करून उतरायला सुरुवात झाली दर दहा-पधरा मिनिटानी एकजण यायचा, पुढे निघून जायचा मी एकटा आसमत निरखत, कोवळ्या उन्हात निवात बसून होतो डोंगरात अशी वेळ खूपदा येते तस पाहिल तर तुम्ही ग्रूपसमवेत असता, पण म्हटल तर केवळ निसर्गाच्या सान्निध्यात एकटे असता अशा एकाताची खूप मजा असते डोक्यात सहज उलगडत जाणारे विचार, समोर दिसणार सौंदर्य, आणि या साऱ्याला कुठेही तर्काचा, लॉजिकचा पाश असत नाही डोळे मिटून पाठीवर पडून पाण्यात तरगताना जस वाटत ना, तस काहीस वाटत

"हे ऽऽ हो !" दूरवरून येणाऱ्या आरोळ्यानी माझी तद्री भग पावली समोर रेल्वे लाइनीतून आणखी एक ग्रूप पेबकडे उतरत होता मी डोळे ताणून पाहिल, त्याच्यातला एकजण हातवारे करून हाका मारत होता मी आणखी निरखून पाहिल रव्या दोरावरून उतरताना माझ्या शेजारी विसावला होता

"आयला, हा तर बेंबट्या !" आम्ही दोघही एकाच वेळेस बोललो परत गेलेला बेंबट्या पुन्हा कसा अवतरला, अस आश्चर्य करण्यात पुढील अर्धा तसा गेला तोवर आम्ही उतरणारे सारे खिडीत पोचलो होतो नवीन आलेला ग्रूप जवळ पोचला बेंबट्या चागला टुणटुणीत दिसत होता आनदान उड्या मारत बेंबट्या आमच्यापर्यंत पोचला "क्या पब्लिक, कैसा गडाया ?" अस म्हणत महाराज आमच्यात सामील झाले मला हसाव का रडाव, कळेना कशा कुणास ठाऊक, पण काही कळायच्या आत घोंघावत मधमाश्या आल्या

"पब्लिक, एकेक करून तटाखालच्या गुहेत चला घाबरू नका, दगा केला नाही तर माश्या चावणार नाहीत," मी हलक्या आवाजात ओरडलो काही मडळी पुढे निघाली

आम्ही घाईघाईन सामान आवरू लागलो

"आईऽऽ ऽऽ ग!" बेंबट्या किंचाळला माशी कडकडून डसली असावी झाल! पानिपत झाल! माश्या चावायला लागल्या मडळी सैरावैरा धावू लागली एरवी सोडावॉटरच्या बाटलीच्या काचाचा चष्मा लावणारा फातरफेकर, चष्म्याशिवाय खडकावरील घसरड्या वाटेवरून धावताना पाहून माझ्या पोटात गोळाच आला

"फातऱ्या, थाब!" अस ओरडून मी त्याच्याजवळ धावतच पोचलो माश्या चावतच होत्या मी फातरचा हात धरून झपाझप तटापाशी पोचलो. इथ थोड खालच्या अगाला एक टाक आहे. माश्याचे डख असह्य झोंबत होते अगाची आग आग होत होती काही तुरळक माश्या पाठलागावर होत्या आम्ही अलगद टाक्यात उतरलो माश्या हळुहळू पागल्या

एवढ्यात चित्रविचित्र आवाज काढत, किंचाळत बेंबट्या पुढे, आणि मागे, डोक्यावर घोंघावणारा माश्याचा काळसर ढग आमच्यापर्यंत आला

"बेंबट्या, अर्जंट पाण्यात ये" अस म्हणेपर्यंत बेंबट्यान धाडकन पाण्यात उडीदेखील मारली. फासफूस करत, पाणी पीत, डोक काढताना 'अरे, मला पोहता येत नाही!' अस चिरजीव म्हणाले पायाला तळ लागत नव्हता, पाणी खोल होत पाण्याच्या टाक्याच्या खरखरीत कडेवर एका हातान गच्च पकडून, दुसऱ्या हातान बेंबट्याच्या काखेत हात घालून आधार देत मी आणि फातर - बेंबट्याचा भार सहन करत- माश्या निवळण्याची वाट पाहत होतो हाताला रग लागली होती पण डोक मात्र शात झाल होत

मी लीडर म्हणून मला सर्व माहीत असण आवश्यक होत नवीन मडळीना घेऊन निघताना पुरेशी काळजी घेतली नव्हती. माझं मन मला खात होत पेबची तशी साधी हाइक; पण बेंबट्याचा अस्थमा, उठलेल्या मधमाश्या यानी अचानक सारच चित्र पालटल होत आजच्या धामधुमीत आणखी गोंधळ होण, अपघात होण सहज शक्य होत निसर्गान एक सणसणीत चपराक दिली होती हाइकला निघताना स्वत ची पात्रता, उणिवा हे लीडरला सागण जितक आवश्यक, तितकच लीडरन नव्या ग्रूपची सुरक्षिततेच्या सदर्भात नीट माहिती करून घेण अत्यावश्यक


आज आता या डखाचा सलही नाही, खुणाही नाहीत कुणालाच काही फारस झाल नाही पण एक महत्त्वाचा धडा मिळाला आजही ती हाइक आठवली की अस्वस्थ वाटत स्वत.शीच मी पुटपुटतो,

"बर झाल, थोडक्यात निभावल!"

# ए, भाय जरा बचके

सं ध्याकाळच्या लोकलन कर्जतला पोचल्यावर सध्याकाळीच खाडसला चालत निघण्याची कल्पना, आमचे लीडर गुड्या भागवत ह्याची जुलै महिन्यातली पावसाळी हाईक आम्ही निघालो होतो भीमाशकरला पाऊस गेल्या दोन दिवसापासून मुसळधार पडत होता थाबण्याची चिन्ह नव्हतीच आभाळातून एवढ पाणी पडू शकत, यावर विश्वास बसणच अशक्य होत- पाण्याचे थेंब नव्हते, तर धारा होत्या आणि ह्या धाराचा एक अभेद्य पडदा अव्याहत, अथक कोसळत होता रस्ते, शेत असं वेगळं कळतच नव्हत वाहता चहा म्हणजे रस्ता, तर स्तब्ध चहा म्हणजे शेत किंवा खड्डा खरच, लाल माती प्यायलेल पावसाच पाणी कस मस्त चहासारख दिसत, नाही ?

कर्जतहून निघून आम्ही गेले तीन तास चालतच होतो सुरुवातीला गाणी वगैरे म्हणायचा उत्साह, पावसान कधीच भिजवून-सादळवून टाकला होता पावल निर्विकारपणे एकापुढे एक पडत होती अगावरचा प्रत्येक धागा न् धागा गच्च भिजला होता, कपडे आणखी भिजणच अशक्य होत सतत धारा अगावरून निथळत होत्या हटर शूजमधल पाणी पावलाबरोबर चुबुक-चपाक



असा आवाज काढत होत मधेच लक्कन कडाडणाऱ्या विजेचाही अस्मानी अभेद्य कवचाला तडा पाडण्याचा केविलवाणा प्रयत्न चालला होता

आम्ही कशेळ्याजवळ पोचलो पोचण्याआधीच पाण्याच्या ओघाच्या धीरगंभीर आवाजान काळजात धडकी भरली होती समोर काळू नदीच फुसाडत धावणार पात्र दिसत नव्हत पण जाणवत मात्र होत काळूला पूर आला होता आम्ही हताशपणे रस्त्यातच फतकल मारली रस्त्यावरून सहा इंच तरी पाणी वाहत होत खूप थकलो होतो. पुढे जाण्यासारखा रस्ताच वाहून गेला होता मिट्ट काळोख आणि पावसाच कोसळणार संगीत मेंदू बधिर झाला होता थकव्यामुळे त्या पाणथळीतच, कधी कुणास ठाऊक, डुलकी लागली जाग आली तेव्हा पाऊस थाबला होता ढगाची गर्दी विरळ झाली होती अमावास्येच्या आकाशात एक-दोन तारका लुकलुकत होत्या. जाग आल्यावर आता अचानक थंडी वाजू लागली अंग अवघडल होत इतक्यात, समोरच्या झाडान जणू नजर ओरबाडून आपल्याकडे लक्ष वेधून घेतल बेडकाच्या डरॉव संगीतात, लक्षलक्ष चांदण्यानी चमचमणार झाड, मोठ विलक्षण दिसत होत अंधारात ते उजेडाच बेट, जणू अंधाराला वाकुल्या दाखवत होत ते काजव्याच झाड होत पावसाळ्याच्या दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यात हे उजेडाच झाड पाहायला मिळत एवढे सारे काजवे एकाच ठिकाणी झाडावर एकत्र येऊन काय करतात, कोण जाणे ? बहुधा पावसाळी अधिवेशन असाव नदीच्या पाण्यालाही थोडा उतार पडला होता पुलावरून अजूनही गुडघाभर पाणी वाहत होत, पण जोर ओसरला होता. उन्हाळ्यात कोरड्या, वाळक्या, रोडावलेल्या या नद्या, पावसाळा येताच रौद्र रूप धारण करतात आणि त्याच्या या बेभान अवस्थेत मस्ती न केलेलीच बरी या पाण्याचा वेग, ओढ ही कल्पनातीत असू शकते आणि पाय जर निसटला तर मग वाचण्याची आशा जवळजवळ नाहीच अगदी पट्टीचे पोहणारे असलात तरी या पात्रातला दुरून प्रेमळ दिसणारा 'चहा' तुम्हाला कधी गिळकृत करील, याचा नेम नाही !

सह्याद्रीच्या राकट्या रूपाला हिरवा साज चढवणारा वर्षा ऋतू हा तर खरा ऋतुराज साहजिकच, पावसाळ्यात कडेकपारीत भटकण्यासारखा आनद नाही आणि मग ओढे, नाले, नद्या याची गाठ पडणारच खळाळत, फेसाळत, उद्दाम खोंडासारख वाहणार पाणी म्हणजे कधीही जिवाशी खेळ ! या पाण्याचा वेग, ओढ, आणि त्याच्या पोटात दडलेली झाड, झाडाची मुळ, कपारी, हा साराच प्रकार भयकर असू शकतो तरी अस पाणी पार करताना सोबत दोर असण आवश्यक आणि स्थानिक माहिती असल्याशिवाय अशा पाण्यात पोहायला उतरायचा अचरटपणा जिवावर बेतू शकतो

अशाच एका पावसाळी हाइकला आम्ही गोरखगडावरून परतत होतो कशेळे गावापाशीच आम्हाला याच काळू नदीन अडवल होत या वेळेस आम्ही पलीकडल्या काठावर अडकलो होतो नदीच पात्र गेल्या तीन दिवसाच्या पावसामुळे चौपट फुगल होत सकाळपासन पावसान जरा उसत घेतल्यामुळे पाण्याचा जोर कमी झाला होता दोन्ही काठावर, रस्त्यावर, बसगाड्या आणि खाजगी वाहन अडकून पडली होती आम्ही सकाळपासून तसे बसूनच होतो जाम कंटाळा आला होता. अजून पाणी पूर्ण ओसरल नव्हत त्यामुळे बस अजून दोन तास तरी निघण अशक्य होत गप्पा करूनही वेळ जाईना मग कुणाच्या तरी सुपीक मेंदूतन कल्पना

निघाली, "चला, पोहत नदी पार करूया!"

जाड्या राजे, राम्या आपटे आणि मी तयार झालो मात्र नदी खडकाळ नाही एवढी खात्री करून घेतली एवढ्यात प्रसाद म्हणाला, "अरे, मी पण येतो, पण जरा टेन्शन वाटत!"


आमच्यातल्या एकान लगेच दोर काढला प्रसादच्या कमरेला बाधला झाल! प्रसाद सुरक्षा दोर घेऊन आणि आम्ही तिघ सुटे, असे निघालो सुरुवातीला कबरभर चालत आम्ही शेत पार केली पाण्याचा सरकता, सापागत सरपटणारा प्रवाह जवळ येत चालला आमच्यात एक नक्की ठरल होत, एकदा धारेला लागल की प्रत्येकजण स्वतत्रपणे समोरच्या काठाला लागणार!

चालता चालता अलगद पाय निसटले आम्ही धारेला लागलो काठावरून प्रसादला प्रोत्साहन देणाऱ्या आरोळ्या पुसटपणे जाणवल्या. पाण्याला एक आग्रही आवेग होता. सपासप हात मारण हे यात्रिकपणे सुरू झाल मधेच समोरच्या काठाकडे नजर टाकली आणि लक्षात आल की आपण झपाट्यान वाहून जातोय पुन्हा मुकाटपणे मुडी खाली घालून पाण्याशी आवेशात दोन हात करू लागलो हात-पाय जड व्हायला लागले होते आणि अचानक जमिनीला पुन्हा पाय लागले तोल जात होता तसाच धडपडत पाण्याबाहेर पडलो छातीचा भाता ओव्हरटाइम करत होता डोळ्यातल पाणी निपटून आजुबाजूला नजर टाकली जाड्या माझ्याबरोबरच समोरच्या काठावर पोचला होता

प्रसादची मात्र गमत झाली तो धारेला व्यवस्थित लागला, आणि पाणी सपासप कापण्याच्या नादात दिशेच भान सुटल काठावरची मडळी ओरडत होती पण हा पठ्ठ्या जोरात हात-पाय मारत काठाला लागला थोडीशी गडबड झाली होती कारण प्रसाद पलीकडल्याच काठाला थोडा खालच्या अगाला लागला होता

राम्या अर्ध्यावर पोचला "आयला, काय टॉप वाटतय!" इति राम्या महाराज सभोवताल निरखण्यात गुतले पलीकडच्या काठावरून चिअर अप करणाऱ्या ग्रूपमधल्या मुली, लक्ष थोड विचलित झाल! काही कळायच्या आत साहेब पाण्याच्या जबरदस्त ओघात तीन-चार फर्लांग पुढे सरकले भानावर येऊन पुढे पोहायला लागले [illegible] वजी, मलभर पुढ काठाला लागला आणि मग स्वत लाच शिव्या घालत साहेब डुलत, डुलत आमच्याकडे येऊ लागले

त्या दिवशी पुरात पोहताना नक्कीच मजा आली शूरवीर असल्यासारख वाटल. पण आजही त्या पाण्याची ओढ, वेग आठवला की कापर भरत एरवी प्रेमळ वाटणार पाणी, पण त्यातली अमानुष खुनशी ताकद अशा वेळेसच जाणवते. पावसाळ्यात अशाच ओढे, नाल्यानी अनेकाना फसवल आहे, आणि आपल्या कुशीत घेतल आहे आठ-दहा वर्षांपूर्वी अशाच [illegible] कणतजवळच वाहून गेला नतर फक्त एक बूट आणि फाटका शर्ट हाती लागला तेदेखील दोन दिवसानतर पावसाळा आला की हिरवागार ओलसर निसर्ग खुणावू लागतो गच्च धुक्यातून दिमाखात डोक वर काढणारे, पाढऱ्याशुभ्र झऱ्यानी न्हालेले डोंगर साद घालू लागतात हटर्स बेचैन होतात अशा वेळेस घरात बसण अशक्य पण म्हणूनच, हळूच कानात सागावस वाटत, "ए भाय, जरा बचके!"



# आणि चेहरा हरवला

आय आय टी ` मध्ये शिकत असताना एकतर खिशात फारसे पैसे नसायचे, आणि दुसर म्हणजे पायी शॉर्टकटन काजुरमार्गला उतरण हा सर्वप्रिय प्रकार टेकडी उतरायला लागण्यापूर्वी समोर नजर गेली तर समोरच आकाश नेहमीच प्रदूषणाच्या अवाढव्य धुरकट ढगान गिळून टाकल्यासारख दिसायच पण पहिल्या पावसानतर, जणू हा ढग वितळून जायचा अशा वेळेस लाबलाबचे डोंगरही नुकतेच आघोळ केल्यासारखे स्वच्छ दिसतात याच पूर्व क्षितिजावर एखाद्या अगठ्याप्रमाणे नजरेत भरणारा कर्नाळ्याचा काळा सुळका, एकटाच मोठ्या ऐटीत बसलेला दिसायचा

कर्नाळा हा एक देखणा किल्ला, आजुबाजूचे गच्च हिरवे किलबिलणारे अभयारण्य सहज आठवणारा काहीसा उग्र, धगधगीत वासुदेव बळवताचा इतिहास वासुदेव बळवत फडक्याच जन्मगाव शिरढोण पायथ्याशीच आहे एक छोट वस्तुसग्रहालय, स्मारक आजही स्वातत्र्याची किंमत स्वत च्या प्राणापलीकडे मानणाऱ्या एका झपाटलेल्या जिवत पिढीची आठवण करून देत 'साहेबी' ससेमिरा चुकवण्यासाठी वासुदेव बळवताना कर्नाळ्यान बापाच्या मायेन अनेकदा आसरा दिला होता स्वातत्र्योत्तर काळात बरच काही सहज मिळालेल्या माझ्यासारख्याना अशा ज्वलत इतिहासाच्या पुसट खुणादेखील रोमाचकारी वाटतात

आय आय टी तले दिवसच धमाल होते

कदाचित स्वतंत्रपणे प्रथमच होस्टेलला राहण्याचा परिणाम असेल, तेथे मिळणाऱ्या सोयी असतील, पण स्वच्छंदपणे त्या वयातली महत्त्वाची वर्षं मायबाप आय आय.टी त काढता आलो, हो खरोखरच धमाल होती ७२ साली सुरू झालेला माऊटनियरींग क्लब झपाट्यान वाढला, फोफावला दर शनिवारी कुठेतरी हाइक किंवा मुंब्रा-कान्हेरीला रॉक क्लायबिंगसाठी, प्रस्तरारोहणासाठी जाण हा परिपाठ होता एकेका शनिवारी २० ते ७० अशी काहीही गणसख्या असायची डोंगरानी वेड लावलच होत, ते जोपासण्याची अप्रतिम सधी 'माऊट क्लब'न दिली.

७४ सालच्या ऑक्टोबरच्या सुरुवातीची कर्नाळ्याची हाइक लोकल पकडून मुंब्रा, मुंब्रा-पेण एस्टी पकडून पळस्पे फाट्याला वळून कर्नाळ्याच्या पायथ्यास उतरलो वीसएक जण होते, आणि मी या हाइकचा लिडर होतो त्या काळी क्लबमध्ये तुमचा पूर्वानुभव, गिर्यारोहणातील प्रशिक्षण याला मान दिला जायचा कुणीही नवशिका लिडर बनू शकत नसे. पण म्हणूनच लीडर लीडर झाल्यावर एक जबाबदारी असायची ग्रूपमध्ये नेहमीच काही नवखे असतात, त्याना नीट नेण, काही अचरट-उत्साही असतात त्याना साभाळण, काही रडे असतात, त्याना कधी धाकान तर, कधी टिंगल करून रडू न देण, अस बरच काही कराव लागत

जगलातून चढत जाणारी ताबड्या मातीची वाट, हिरव्या गर्द छायेत चिवचिवणारी पाखर, साऱ्या आसमतावर आदल्या रात्रीचा दुलईगत पसरलेला गारवा मोठ प्रसन्न वाटत होतं. रानातून आपण बाहेर पडतो पूर्वेकडच्या सोंडेवर, जी आपल्याला अलगद किल्ल्यात नेऊन सोडते किल्ला एखाद्या पाणबुडीसारखा खालच्या हिरव्यागार समुद्रात पहुडला आहे आणि किल्ल्याच्या मध्यावर कॉनिंग टॉवरसारखा उभारलेला सुमारे अडीचशे फूटी बेलाग काळा सुळका वर जायला वाट नाही, पण थोड प्रस्तरारोहण करत तुम्ही या सुळक्याचा माथा गाठू शकता याच्याच पायथ्याशी, खोदून काढलेल्या गुहामध्ये पाण्याची टाकी आहेत

शेवाळ नुकतच कुठे सुकत होत आमच्यातल्या पाच-सहा अनुभवी मडळीनी सुळका चढण्याचा प्रयत्न आरभला पायथ्याच्या एका झाडावर चढून सुळक्यावर पाय ठेवता येतो नमनालाच माशी शिकली सुळक्यावर चढणारा सजय झाडाच्या वर दहा-बारा फूट सरकला असेल, तोच निसटला अलगद झाडात येऊन थबकला कमरेला दोर होता बूड चागलच शेकल, पण बाकी किरकोळ खरचटण्यापलीकडे काही झाल नव्हत खडक निसरडा होता आम्ही त्या दिवसाकरता सुळक्याचा विचार सोडून दिला

तिथेच पायथ्याशी, टाकीच्या जवळ आम्ही खायला बसलो गप्पा-हास्य-विनोदाला ऊत आला होता ग्रूपमध्ये पाचेक मुलीही होत्या साहजिकच, टिंगलटवाळीला एक विशेष गमत होती दुपारच ऊन तापू लागल होत दोघ-तिघ उघडे बोडके बसलेले होस्टेल-मेसमधील 'अप्रतिम' सकस अन्न ! मडळी मजेत होती

काही लक्षात यायच्या आतच, लाल आग्या माश्या आजुबाजूला घोंगावू लागल्या प्रसगाच गाभीर्य थोड्याच्याच लक्षात आल मी एकेकाला, सावकाश उठून पाण्याच्या टाक्याकडे सरकायला सागितल पाण्यात बुडी मारून बसण हा माश्याच्या डखापासून बचावण्याचा

कदाचित स्वतंत्रपणे प्रथमच होस्टेलला राहण्याचा परिणाम असेल, तेथे मिळणाऱ्या सोयी असतील, पण स्वच्छदपणे त्या वयातली महत्त्वाची वर्षं मायबाप आय आय टी त काढता आली, ही खरोखरच धमाल होती ७२ साली सुरू झालेला माऊटनियरींग क्लब झपाट्यान वाढला, फोफावला दर शनिवारी कुठेतरी हाइक किंवा मुंब्रा-कान्हेरीला रॉक क्लायबिंगसाठी, प्रस्तरारोहणासाठी जाण हा परिपाठ होता एकेका शनिवारी २० ते ७० अशी काहीही गणसख्या असायची डोंगरानी वेड लावलच होत, ते जोपासण्याची अप्रतिम सधी 'माऊट क्लब'न दिली

७४ सालच्या ऑक्टोबरच्या सुरुवातीची कर्नाळ्याची हाइक लोकल पकडून मुंब्रा, मुंब्रा-पेण एस्टी पकडून पळस्पे फाट्याला वळून कर्नाळ्याच्या पायथ्यास उतरलो वीसएक जण होते, आणि मी या हाइकचा लिडर होतो त्या काळी क्लबमध्ये तुमचा पूर्वानुभव, गिर्यारोहणातील प्रशिक्षण याला मान दिला जायचा कुणीही नवशिका लिडर बनू शकत नसे. पण म्हणूनच लीडर लीडर झाल्यावर एक जबाबदारी असायची ग्रूपमध्ये नेहमीच काही नवखे असतात, त्याना नीट नेण, काही अचरट-उत्साही असतात त्याना साभाळण; काही रडे असतात, त्याना कधी धाकान तर, कधी टिंगल करून रडू न देण, अस बरच काही कराव लागत

जगलातून चढत जाणारी ताबड्या मातीची वाट, हिरव्या गर्द छायेत चिवचिवणारी पाखर, साऱ्या आसमतावर आदल्या रात्रीचा दुलईगत पसरलेला गारवा मोठ प्रसन्न वाटत होत रानातून आपण बाहेर पडतो पूर्वेकडच्या सोंडेवर, जी आपल्याला अलगद किल्ल्यात नेऊन सोडते किल्ला एखाद्या पाणबुडीसारखा खालच्या हिरव्यागार समुद्रात पहुडला आहे आणि किल्ल्याच्या मध्यावर कॉनिंग टॉवरसारखा उभारलेला सुमारे अडीचशे फूटी बेलाग काळा सुळका वर जायला वाट नाही, पण थोड प्रस्तरारोहण करत तुम्ही या सुळक्याचा माथा गाठू शकता याच्याच पायथ्याशी, खोदून काढलेल्या गुहामध्ये पाण्याची टाकी आहेत

शेवाळ नुकतच कुठे सुकत होत आमच्यातल्या पाच-सहा अनुभवी मडळींनी सुळका चढण्याचा प्रयत्न आरभला पायथ्याच्या एका झाडावर चढून सुळक्यावर पाय ठेवता येतो नमनालाच माशी शिकली सुळक्यावर चढणारा सजय झाडाच्या वर दहा-बारा फूट सरकला असेल, तोच निसटला अलगद झाडात येऊन थबकला कमरेला दोर होता बूड चागलच शेकल, पण बाकी किरकोळ खरचटण्यापलीकडे काही झाल नव्हत. खडक निसरडा होता आम्ही त्या दिवसाकरता सुळक्याचा विचार सोडून दिला

तिथेच पायथ्याशी, टाकीच्या जवळ आम्ही खायला बसलो गप्पा-हास्य-विनोदाला ऊत आला होता ग्रूपमध्ये पाचेक मुलीही होत्या साहजिकच, टिंगलटवाळीला एक विशेष गमत होती दुपारच ऊन तापू लागल होत दोघ-तिघ उघडे बोडके बसलेले होस्टेल-मेसमधील 'अप्रतिम' सकस अन्न ! मडळी मजेत होती

काही लक्षात यायच्या आतच, लाल आग्या माश्या आजुबाजूला घोंगावू लागल्या प्रसगाच गाभीर्य थोड्याच्याच लक्षात आल मी एकेकाला, सावकाश उठून पाण्याच्या टाक्याकडे सरकायला सागितल पाण्यात बुडी मारून बसण हा माश्याच्या डखापासून बचावण्याचा

एकमेव सुलभ मार्ग होता

'कुणीही पळू नका! डोण्ट पॅनिक!'

सात-आठजण सुखरूप पाण्यात पोचलेदेखील गोऱ्यागोमट्या वदनाच्या चेहऱ्याभोवती एक 'बया' घोंघावू लागली मुलीच्या सहजतेन वदना किंचाळली आणि पळत टाकीकडे सुटली झाल! शेकडो माश्या जणू सिग्नलची वाट पाहात असल्यासारख्या उरलेल्यावर तुटून पडल्या या माश्याच एक वाईट म्हणजे डख मारून नागी आपल्या कातडीत मोडून या खाली पडतात याच्या डखात एक सौम्य विष असत आमच पानिपत झाल! जमेल त्यानी टाकीत उड्या टाकल्या दोघ विरुद्ध दिशेला पळाले तटालगतच्या झाडीत लपले म्हाद्या खालच्या वाटेवर सुसाट सुटला अन्या उघडाबब बसलेला, उठून पळायला लागला, पण माश्यानी त्याच्यावर खास 'प्रेम' केल असह्य होऊन गवतातच पालथा पडला नतर त्याच्या डाव्या हातावरून फक्त सत्तर मोडक्या नाग्या उपटून काढाव्या लागल्या सारेच सैरभैर झाले होते. म्हाद्याने प्रसगावधान राखून खालच्या गावातून एक कामचलाऊ स्ट्रेचर बनवून, पाच-सहा गावकऱ्यासोबत तो परत वर यायला निघाला पधरा-वीस मिनिटात वरच नाटक सपल! हल्ला ओसरला अन्याची अवस्था वाईट होती कोरड्या ओकाऱ्या होत होत्या अफाट अशक्तपणा आणि जळजळीत वेदनेन फुललेली पाठ अन्या तसा बुटका, पण माजलेल्या खोडागत, अवघ्या ६५ किलोचा त्याला पाठुगळी घेऊन आम्ही झपाट्यान खाली निघालो अर्ध्या वाटेतच म्हाद्या भेटला मग स्ट्रेचरमुळे काम सोप होत फर्स्ट एड कीटमधून कॅलेंडुला लोशन अन्याच्या पाठीवर चोपडल होत अन्याला झेपेल तेवढ इलेक्ट्राल पाजत होतो माश्याच्या विषामुळे एक शोष पडतो, त्यावर हा उपाय खाली पोचताच एका जीपमध्ये अन्या आणि इतर तिघाना लिफ्ट मिळाली अन्या हॉस्पिटलच्या वाटेवर होता प्रकार जीवघेणा नसला तरी तातडीन वैद्यकीय मदत अत्यावश्यक


कादा किंवा तत्सम उग्र दर्प, गोंगाट, धूर अशामुळे या माशा उठतात-बिथरतात माझ्याही डोक्यात, तोंडावर मिळून पचवीस माशानी तोंडसुख घेतल होत डोक्यातल्या चाव्यामुळे थोडीशी झिंगल्यागत अवस्था होती चेहराही सुजला असावा अन्या एकदा मार्गी लागल्यावर मी जरा निवात झालो होतो बाकी मडळींबरोबर कसा परतलो ते अधुकच आठवत

ठाण्याला उतरल्यावर नाक्यावर चहा प्यायला गेलो रोजचीच परिचयाची मित्रमडळी विचित्र, अनोळखी नजरेन माझ्याकडे पाहात होती माझ्याशी कुणीच बोलेना हात धुताना चेहरा आरशात दिसला मिचमिचे डोळे, भप्प सुजलेला तो नेपाळी चेहरा माझा नव्हताच तशी या सौम्य हाइकची, चेहरा हरवल्याची बोचक आठवण मात्र आजही ताजी आहे

# सह्याद्री प्रेमळच आहे

मार्चअखेरचे दिवस टिळक बगल्यावरून मी कल्याण दरवाज्याकडे निघालो सकाळचे दहा वाजलेले आताच ऊन वेड्यासारख तापायला लागलेल सिंहगडावर कॅम्प सुरू होता सकाळी ५ वाजल्यापासून खूप धावपळ झाली होती कसा कुणास ठाऊक, वाराही पडला होता असह्य भाजून काढणारी उष्णता होती नाकात जणू कुणी तदूर लावला होता या वर्षी उन्हाळा फारच लवकर सुरू झाला असावा अशा उन्हात, तेही झाडी नसेल तर डोंगरात फिरण फार तापदायक होऊ शकत मला सहजच आठवल, काही दिवसापूर्वीच विचित्र दु खद बातमी आली होती श्रीकृष्ण भिडे हा पुण्याचा एक जुना गिरीप्रेमी, रायगडच्या वाटेवर जलशोषामुळे मरण पावला!

मी भिडेला थोडासा ओळखत होतो सह्याद्रीत पाण्याअभावी मृत्यू ही बातमीच धक्कादायक होती त्यातून भिडे तसा मुरलेला गडी काही दिवसानी या घटनेसबधी आणखी माहिती कळली भिडेचा ग्रूप फडताळेच्या नाळेन रायगडकडे निघालेला सोबतच पाणी सपलेल मध्येच भिडे थोडा धडपडला असावा पाण्याअभावी तलखी होत होती भिडे असबद्ध बोलू लागला होता मग बेशुद्ध पडला, सोबतच्या मडळींनी धावपळ करून, जुजबी स्ट्रेचर बनवून त्याला खालच्या गावात नेल तिथून भिडे महाडच्या इस्पितळात पोचला तिथे त्याला लहानसा पॅरालिसिसचा अॅटॅकही येऊन गेला. येथून पुढे भिडेला पुण्यात हलवण्यात आल



तिथे शेवटी बेशुद्धावस्थेतच त्याच निधन झाल सारा प्रकारच विचित्र भिडेच्या डोक्याला कदाचित इजा झाला असावी मेंदूत रक्तस्त्राव झालेला; त्यातून तापणार ऊन आणि होणारी शुष्क तलखी सारच भयकर

पुण्याच्या वर्तमानपत्रात या घटनेसदर्भात उलटसुलट प्रतिसाद उमटले गिर्यारोहणावर बधन घालावीत, सोबत डॉक्टर असल्याशिवाय गिरीभ्रमणास जाऊच नये, अशा धर्तीची अतिरेकी मतही प्रतिपादण्यात आली, गिरीभ्रमणात-साहसी खेळात कधीही अपघात झाला की आपण हादरून जातो, भाबावून जातो 'बस कोसळून चाळीस ठार' ही बातमी चहाबरोबरच्या खाऱ्या बिस्किटासारखी चघळून आपण विसरूनही जातो पण, 'मोहिमेत दुर्दैवी अत' ही बातमी मात्र आपल्या जिव्हारी लागते दु.ख कराव, रागवाव, चिडाव, की काय कराव? आपला गोंधळ उडतो जाणुनबुजून लोक जिवावर उदार होऊन डोंगरात तडफडायला का जातात? हा प्रश्न आपल्याला भडावून सोडतो डोक थोड शात ठेवून विचार केला तर लक्षात येत की कितीही चिडचिड झाली तरी डोंगरात जाणाऱ्याची सख्या कमी होणार नाही उलट, दिवसेंदिवस गिरीभ्रमण अधिकाधिक लोकप्रिय होत आहे म्हणूनच आणखी शातपणे विचार केला पाहिजे धोके कसे टाळता येतील, सहजपणे वैद्यकीय किंवा प्रथमोपचार मदत कशी मिळेल, असा साकल्याने विचार झाला पाहिजे.

७४ सालच्या उन्हाळ्यात, परीक्षा आटोपून मी आणि रत्नाकर कामत ऊर्फ आर डी , आम्ही रायगड ते राजगड ट्रेकला निघालो होतो रायगडवर दोन रात्री काढून आदल्या रात्री आम्ही लिगण-माचीला पोचलो तिथेच मुक्काम केला सकाळी बोचेघळीन आम्ही शिगणापूरकडे निघालो घळीतली वाट कोरडी, पण घसरडी होती एप्रिलच्या उन्हाचा तडाखा अजून जाणवत नव्हता, पण वाटेत धाप चागलीच लागत होती तहान-तहानही खूप होत होती सोबतच पाणी माथ्याच्या पठारावर पोचेपर्यंत सपून गेल होत कितीही पाणी प्यायल तरी तहान भागल्यासारख वाटत नव्हत

पठारावर थोडी विश्राती घेऊन आम्ही शिगणापूरकडे निघालो मळलेल्या वाटाही रखरखीत जमिनीवर पुसट झाल्या होत्या पाण्यासाठी जिवाची तडफड सुरू झालेली भगभगीत सूर्यप्रकाश समोरचा उचसखल पृष्ठभाग जाळून काढत होता त्या रुक्ष, वैराण आसमतात फसव्या मृगजळापलीकडे सारच नकोस वाटत होत अशा वेळेस येणारा थकवाही अचाट असतो घामाच्या धाराही सुकल्या होत्या साऱ्या अगाची लाहीलाही होत होती

आर डी एव्हाना मागे पडला होता मी कष्टान एकापुढे एक पावल टाकत होतो वाट फरफटत पावलाखालून सरकत होती मध्येच मला चक्कर आल्यासारख झाल मी जिवाच्या आकातान पाणी शोधत होतो मागे वळून पाहिल तर आर डी चाही कुठे पत्ता नव्हता मी समोरच्या कातळावर, एका चुकार खुजट निवडुगाच्या सावलीच्या भासात फतकल मारली तो कातळ, बहुधा वाळक्या ओढ्याचा तळ असावा मी बराच वेळ गुगल्यासारख्या ग्लानीत पडलो होतो आर डी जवळ आला त्यान मला हलवून जाग केल ओढ्यात खालच्या अगाला त्याला शेवाळमिश्रित हिरव पाणी दिसल होत त्याक्षणी मात्र मला ते अमृताहूनही गोड लागल यानतर तासाभरान सुखरूप आम्ही गावात पोचलो, आणि आमचा

पुढचा ट्रेकही छान झाला काही वर्षांनतर थोडी अक्कल, थोडा अनुभव गाठीशी आल्यानतर लक्षात आल की त्या दिवशीची लक्षण 'सन स्ट्रोक'ची होती, आणि लवकरच पाणी-निवारा मिळाला म्हणून बर तस पाहिल तर आम्ही दोघच होतो एकाला काही झाल तर दुसऱ्याची मदतीसाठी तारांबळ झाली असती आमच्याकडे पुरेस पाणी नव्हत ही तशी लहानशीच चूक, पण तिचे परिणाम भयकर असू शकतात

उन्हाळ्यातील कुठल्याही गिरीभ्रमणात प्रत्येकान दिवसामध्ये कमीत कमी चार लिटर पाणी प्यायलच पाहिजे कितीही छोटी हाईक असली, अगदी तुम्ही सकाळी जाऊन दुपारपर्यंत परत येणार असलात तरी सोबत पाणी, टॉर्च, आणि प्रथमोपचाराच साहित्य असण अत्यावश्यक इमर्जन्सी रेशन म्हणून ग्लुकोज बिस्किटचा एक पुडा तरी बरोबर घ्यावा

तुम्ही कठल्याही गिर्यारोहकाला वरील गोष्टी आवश्यक आहेत का, अस विचारा तो अर्थात हो म्हणेल, पण दुर्दैव अस की गिरीभ्रमण करणारी बहुताश मडळी सह्याद्रीत भटकायला जाताना निष्काळजी असतात याची कारण काहीही असतील फाजील आत्मविश्वास, अज्ञान, किंवा शुद्ध निष्काळजीपणा सुरक्षिततेसाठी सोबत न्याव्या लागणाऱ्या गोष्टी तशा सहज उपलब्ध असतात, थोडी आठवण ठेवावी लागते, थोडी स्वत लाच लावलेली शिस्त असायला लागते बस्स! आता या गोष्टींची गरज तशी कदाचित हजारात एकदा लागेल परतु, तरीही ९९९ वेळी या गोष्टी सवयीन बरोबर नेल्याच पाहिजेत एवढी माफक अक्कल असली की पुरे

आल्प्समध्ये साध गिरीभ्रमण हे देखील ब्रिटनमध्ये आज एक शास्त्र म्हणून विकसित झाल आहे या विषयावर अनत पुस्तक, माहितीपट उपलब्ध असतात सर्वांमध्ये 'सेफ्टी' या विषयाला चक्क एक प्रकरणच बहाल केलेल असत या साऱ्याच कारण एक की, त्याच्याकडील बेभरवशाच, अतिशीत हवामान साध्या चुकाही जिवाला तात लावू शकतात सह्याद्रीतील समशीतोष्ण हवामान आम्हाला निष्काळजी बनवत भर थडीत किंवा पावसात उघडे झोपलात तरी न्युमोनिया होण्याची फार शक्यता नाही उन्हाळ्यात कितीही आचरटपणे भटकलात तरी उष्माघाताची शक्यता नाही एरवी कडे-कपारींनी नटलेला उग्र भयकर सह्याद्री हवामानाच्या बाबतीत फारच मवाळ आहे आणि म्हणूनच 'अँ! त्यात काय झाला!' ही प्रवृत्ती आपल्या सुरक्षिततेच्या आड येते याच हवामानामुळे जवळजवळ बाराही महिने सह्याद्रीत मजेत गिरीभ्रमणासाठी, प्रस्तरारोहणासाठी जाता येत सह्याद्री प्रेमळच आहे पण म्हणून आम्ही बेसावध होऊन चालणार नाही गिरीभ्रमणाच्या निखळ आनदाला मग बावळट अपघाताचा गालबोटही लागणार नाही

# मदत नाकारून चालणार नाही

कांचनगगा मोहिमेचे वारे नुकतेच वाहू लागले होते ऑगस्ट-सप्टेंबर ८६ मधली गोष्ट. कामाना नुकता कुठे वेग येत होता दिलीप लागू आमचा एक उपनेता, त्याच मोत्याच दुकान, म्हणून सोमवार त्याला मोकळा असायचा त्या दिवशी नक्की सोमवार होता दिलू आणि मी फोर्टमध्ये दिवसभर धावपळ करत होतो काही कपन्याची ऑफिसेस, सचिवालय अस कित्येक ठिकाणी जाण-भेटण पाच वाजता काम आटोपल्यावर दादरकडे निघालो मध्येच दिलूला आठवल,

"अरे, आज शास्त्री हॉलला 'केव्ह एक्स्प्लोअरर्सवाल्याच डेमो आहे चल, जरा डोकवायच ?"

"चला!" इति मी

मलाही फारशी घाई नव्हती आम्ही शास्त्री हॉलमध्ये पोचलो पाच-सहा टोलेजग इमारती आणि मध्ये मोकळ पटागण खाली पटागणात आणि गच्चीत तूफान गर्दी जमलेली. एकजण भिंतीवरून रॅपलिग करत होता (म्हणजे दोराच्या सहाय्यान कड्यावरून खाली उतरण) तर त्याच्यातलाच एकजण खाली उभा राहून मेगॅफोनच्या मदतीन प्रेक्षकाना माहिती देत होता यानतर चौदाव्या मजल्यावर दोन इमारतींमध्ये ताणून बाधलेल्या दोरावर रिव्हर क्रॉसिगच प्रात्यक्षिक होणार होत प्रात्यक्षिक करताना उपस्थित आरोहक मडळींची सख्या जरा कमी होती त्यामुळे आम्हाला दोघाना पाहाताच,

एकान आम्हाला 'जरा बिले (सुरक्षा दोर) देणार का?' अस विचारून गच्चीत पिटाळल

थोड्याच वेळात माझ्या हातात सुरक्षा दोर होता मी गच्चीतून खाली डोकावत होतो प्रात्यक्षिक करणारा अर्ध्यावर दोरावर लटकलेला, खालून पाहणाऱ्याला तो अधातरी चालल्यागत वाटत असणार मला गर्दीतले विस्फारलेले, अचबित डोळे जाणवत होते मला त्याची गमत वाटत होती त्याचही बरोबर होत बहुतेकाना हा साराच प्रकार नवीन, अफाट साहसी वाटत असणार गिर्यारोहण हे मला अवगत असलेल तत्र होत त्यामुळे मी निवात होतो प्रात्यक्षिक करणारा पलीकडे पोचला मी सुरक्षा दोर सोडून, दिलू कुठे गेला म्हणून शोधू लागलो एक विचित्र परकेपण जाणवत होत आसपासची माणस, एक अचाट साहसी प्रात्यक्षिक करून दाखवणारे आणि तोंडात बोट घालून पाहणारे, हे सारे खूप कुठे तरी लाब असल्यासारख वाटत होत; मेंदूला थोड्या मुग्या आल्यासारख वाटत होत मेंदूच्या एका कोपऱ्यात 'खरच ही प्रात्यक्षिक का करायची?' अशा एका प्रश्नाचा उदीर खुडबुड करत होता प्रस्तरारोहण लोकप्रिय व्हाव, लोकाच्या मनातली भीती पळावी, असे छान उद्देश असू शकतात काहीतरी भव्य-दिव्य करून प्रसिद्धी मिळवण, अस आकर्षणही असू शकत पण अशा प्रात्यक्षिकाचा खरा परिणाम काय होतो? एखाद्या तत्राचा नेत्रदीपक भाग फक्त लोकासमोर ठेवण्यात काही धोके सभवतात कुठेतरी धाडसीपणा, आचरटपणा याना खतपाणी घातल्यासारख होत अशा विविध विचाराची डोक्यात गर्दी झाली होती दादर स्टेशन कधी आल ते कळलच नाही दिलू 'बाय' म्हणून निघूनही गेला मी ठाण्याच्या दिशेन निघालो विचाराच्या तद्रीतच घरी पोचलो.

घराच्या गॅलरीतच आई उभी होती म्हणाली, "दिलीपला अर्जंट फोन कर!"

मी ताड ताड उड्या मारत जिना चढून वर पोचलो "काही तरी गडबड असावी, दिलीप घाबरल्यासारखा वाटत होता," फोनकडे जाता जाता आईचे उद्‌गार कानावर पडले

"दिलीप आहे? काय रे?" मी

"अरे, हॉलिडे हायकर्सचा कुणीतरी बर्वे का भावे म्हणून पोरगा कोकणकड्यावर अडकला आहे" दिलीपन बॉम्ब टाकला

कसा अडकला, कोण कोण होते, तुला कुणी कळवल, अशा माझ्या प्रश्नाची सरबती दिलून कशीबशी सहन केली त्याच्याकडेही तुटपुजी माहिती होती आम्ही लगेच एक निर्णय घेतला, दोघानी फोनाफोनी करत सुटायच, नवीन कळल तर तातडीन एकमेकाना कळवायच नाही तर दर अर्ध्या तासान फोन करायचा त्यावेळी रात्रीचे आठ वाजले होते

बर्वे कोकणकड्यावर कुठे तरी अर्ध्यावर अडकला आहे, ही रविवारची गोष्ट पार्ल्याहून वीस-बावीस जणाची एक तुकडी मदतीसाठी एक मेटॅडोर आणि एक कार घेऊन सध्याकाळी माळशेजला रवाना झाली आहे, ही सोमवारची गोष्ट उदय कोळवणकर हा माहितीतला एक गिर्यारोहक, वॉकीटॉकी मिळवण्यासाठी सोमवार दुपारपासून फोन करत होता आणि मी भेटलो असतो तर कोकण कड्यासदर्भात त्याला माहिती हवी होती खरच फोन ही अद्‌भुत यत्रणा आहे थोड्या कालावधीत काय वाटेल ती माहिती गोळा करता येते! रात्रीचे साडेआठ झाले.

कमलेश ऊर्फ कमल्या देवासारखा माझ्या घरी आला, त्याला मी तसाच ठाण्याच्या ताबे नाक्यावर पिटाळला "कोकण कड्यावर काही तरी ॲक्सीडेंट झाला आहे, जे कोण आपल पब्लिक सापडेल त्याना घेऊन ये!"

ताबे नाका म्हणजे ठाण्याच्या तळ्याच्या काठी ताबे नावाच, एका चहावर तासभर बसू देणार हॉटेल आहे अर्थात, आम्हा डोंगरी मडळीचा तो रोज सध्याकाळचा प्रिय नाका. नव्या चढाया, मोहिमा याचे बेत, अफवा-टवाळ्या याच माहेरघर असेलला हा नाका मला खात्री होतीच, की दोघ-चौघ तरी सापडतील

एक तर्कशुद्ध कयास होता की, मदतीला पुढे गेलेली मडळी बहुधा पायथ्याशी आधी जातील, जे काय दोर कड्यावर बाधलेले असतील (फिक्स रोप) त्याच्या सहाय्यान अडकलेल्या माणसापर्यंत पोचण्याचा आणि मदत देण्याचा प्रयत्न करतील साहजिकच, मदतीचा दुसरा एक उपाय म्हणजे, कोकण कड्याच्या माथ्यावरून दोराच्या सहाय्यान उतरत खाली येण आणि बर्वेची सुटका करण झाल। आमचा बेत नक्की झाला, की शक्य तितक्या लवकर दुसरी मदत तुकडी घेऊन निघायच। लागणाऱ्या साधनसामग्रीची यादी झाली झटपट हे सार साहित्य कुठून पैदा करता येईल, यासाठी डोकी लढू लागली माझ्या घरी पाच-सहा जण एव्हाना जमले होते हालचालींना वेग आला युद्धपातळीवर मडळी कामाला लागली रात्रीचे नऊ वाजले

कुणाचीच कुरकुर नव्हती प्रत्येक जण जमेल ते सार काही करायला स्वेच्छेन तयार होता दिलून दादरमध्ये सुमारे पधरा हजार फूट दोर आणि तीन कुशल आरोहक निघण्यासाठी तयार केले होते एव्हाना सोबत कुणी डॉक्टर येऊ शकेल का, ते पाहायला एक जण गेला होता दिलू स्वत ची गाडी काढणार होता गाडी ठीक आहे ना, हे तपासायला कुणी तरी मेकॅनिककडे गेल कुठलही पूर्वनियोजन नसताना मोठ्या शिस्तीत साऱ्या गोष्टी सुरू होत्या एखाद्या आर्मी ऑपरेशनला लाजवेल अशी सुसूत्रता आणि उत्साह होता कोकण कड्याच्या पहिल्या चढाईला लागली नसेल एवढी इक्विपमेंट जमा झाली होती डोंगरात एका डोंगरवेड्यावर तासाभरात सकट आल होत, मग कोण कुठल्या क्लबचा, आपला काय सबध, हे सारे प्रश्न विरले होते. एक उत्साह, एक चिकाटी, एक जिद्द होती - कुछ भी होने दो। लढेंगे। मदत करेंगे। एव्हाना साडेनऊ वाजले होते

साधनसामग्री नीटपणान चार किट बॅग्जमध्ये पॅक करण्यात आली कमल्यान एक स्कूटरही आणून ठेवली अनेक तर्कवितर्क लढवून अडकलेल्या प्राण्याला काय मदत लागेल हे ठरविण्यात आल त्यानुसार औषध आणि इतर वैद्यकीय साहित्यही पॅक करण्यात आल फोन खणखणला एव्हाना दर मिनिटाला फोन वाजला नाही तर चुकल्याचुकल्यासारख वाटत होत फोनवर दिलू होता

"अरे, काहीतरी मोठा राडा आहे! कड्यावर कुणी अडकल नाही आहे। तो बर्वे कोकण कड्यावरून पडून गेला क्लाइबिंग वगैरे काहीच नव्हत। पार्ल्याची मडळी डेड बॉडी शोधायला गेलीत!"

क्षणभर काही सुचेना सुन्न झालो होतो क्षणार्धात आधीच्या दोन तासाच्या अचाट

प्रयत्नापासून अलिप्त झालो

"दिलू, एक नक्की! आपण रेस्क्यूला जात नाही आहोत पुढे काय करायच ते जरा वेळात ठरवतो आणि फोन टाकतो"- इति मी

कुणी तरी अडकल आहे, जिवत आहे, मदतीची गरज आहे असा फोन होता, तोपर्यंत आम्ही सारेच झपाटल्यासारखे होतो वेळप्रसगी स्वत चा जीव धोक्यात घालून दुसऱ्याचा जीव वाचवण्याची तयारी होती खरच, एखादा जीव जगवण्यासाठी आपण काये वाट्टेल ते करायला तयार असतो! तेच, ती आशा सपताच सार सपल्यासारख होत आधीची सारी धडपड, तगमग कापरागत उडून गेली सर्व तयाऱ्या विस्कटून टाकल्या

घरच्याचा, जमलेल्या मडळींचा प्रचड विरोध, काळजी, थोडासा रोष, हे सार न जुमानता माझी सॅक घेऊन मी कमल्याबरोबर रात्रीच निघालो घरी स्वस्थपणे थाबण अशक्यच होत

रात्रभर खाचखळग्यातून प्रवास करत, पावसात भिजत आम्ही पायथ्याला पोचलो स्कूटर खिरेश्वर गावात ठेवून तसेच तडक गड चढायला लागलो हे सारच मला स्वच्छ आठवतय मी कोकण कड्यावर सकाळी ९ वाजता उभा होतो फारशी सकाळ झाल्यासारख वाटत नव्हत. सारा आसमत ओलसर, धुकट होता समोर कोकण कड्याची कड एखाद्या कढईसारखी भासत होती कढईत असख्य काळे-पाढरे ढग उसळत-उकळत होते उसळणाऱ्या ढगातून मिळालेल्या गवाक्षातून कड्याच्या पायथ्याशी बर्वेच शव दिसत होत

मडळी एका बधिर अवस्थेत परत निघाली. कोकण कड्याच्या एका विचित्र, अनाकलनीय हाकेला बर्वेन ओ दिली होती बर्वे पडला की, आत्महत्या होती, सारेच प्रश्न आता गौण होते. मला ते सारच खूप भूतकाळात घडून गेल्यासारख वाटत होत

आज डोंगरात जाणाऱ्याची सख्या खूप वाढली आहे अपघाताची कारण बहुतेक वेळा आपल्याच चुकात असतात एकीकडे अशा चुका होणार नाहीत, अशी काळजी घेण्याची नितात गरज आहे पण त्याचबरोबर असे अपघात झाल्यास ते निस्तरण्यासाठी काही सुसूत्र यत्रणा असण आवश्यक आहे काही उत्साही क्लब हे अशा वेळेस पोलिसाना सहकार्य करतात, उदाहरणार्थ खोपोलीचा यशवती हायकर्स क्लब काही पोलिसानाही गिर्यारोहण प्रशिक्षण देण्याची गरज निर्माण झाली आहे अवघड वाटावर जपून पावल टाकावीत निसर्गात पडलेल्या वाकड्या पावलाला क्षमा नसेल, पण चूक त्याची होती म्हणून मदत नाकारून चालणार नाही.

# “मी तुमचे आभार कसे मानू ?”

किर्र, किच्चऽऽ खस्ऽ खऽऽ!

“आयला, स्कूटरवाला तडफडला!” रस्त्यावर माझ्या मागून उद्गार आले. मडळी धावत अपघाताच्या जागी निघाली कुणी उत्स्फूर्त मदत करणारे, आणि बरेच बघ्ये. लगेच घोळका जमला स्कूटरन बसचा हळूच मुका घेतला होता चूक स्कूटरवाल्याचीच होती पायाची जखम दिसत होती, पण बाकी फारस लागल नसावं


“अरे, जरा हळद मिळाली तर पाहा!”

“हे बसवाले बापाचा रस्ता असल्यागत चालवतात!”

“आणखी कुठे लागलंय का ? या, जरा बाजूला बसा पाणी हवय ?”

“जखमेला थोडा चुना लावा, लगेच बरी होईल” - जहाल सल्ला

नशीब, कुणी लाल तिखट सुचवलं नाही! धडपडलेला बिचारा, तसाच लगडत, “हो! हो!” म्हणत दुसऱ्या रिक्षात जाऊन बसला. रिक्षा बहुधा डॉक्टरकडे निघाली आणि गर्दी हळुहळू पागू लागली



अशा वेळेस घटनास्थळी डॉक्टर सापडण मुश्किल आणि असला तरी हे अनाहूत सल्ले त्यालाही बाजूला सारतील प्रथमोपचाराच ज्ञान आपल्याकडे अगाध असत आणि प्रथमोपचार तंत्र अवगत असलेला प्राणी अशा वेळेस मिळण हे जवळजवळ अशक्य

खर तर, प्रथमोपचार हा तसा सोपा प्रकार, भारतातही इच्छा असल्यास सहज अवगत होऊ शकणारा पण दाडगा निरुत्साह याच्या आड येतो मग आयत्या वेळेस भीषण उपाय सुचवणारे प्रथमोपचाराऐवजी 'अतिमोपचारच' सुचवतात

मला सहजच आठवण झाली, लडनहून एडिनूबरोकडे जाणाऱ्या 'एम-सिक्स मोटर वे'वर झालेल्या अपघाताची नाताळची सुटी आटपून एडिनूबरोला 'आउटडोअर एज्युकेशन'च्या १९८२च्या कोर्सच्या दुसऱ्या सत्रासाठी, मी आणि कोर्सवरील एक सहाध्यायी कारन परत चाललो होतो सुसाट वेगान धावणाऱ्या गाड्यानी गजबजलेला मऊसूत काळाशार रस्ता अचानक आमच्यासमोरची चौथी आणि पाचवी गाडी याची प्रेमभरे टक्कर झाली कचाकच ब्रेक्स लागत मागच्या दहा-बारा गाड्या मदावल्या गर्दी होईल अस वाटल, पण नाही! जेमतेम पाच गाड्या शिस्तीत एकामागे एक थाबल्या रस्ता, जणू काही झालच नाही अशा थाटात, वाहता राहिला गाड्याची फटाफट दार उघडली आम्हीही बाहेर पडलो, व धावत निघालो

जागी पोचलो तर पुढल्या गाडीला फारस काही झाल नव्हत. पण मागच्या गाडीतल्या चालकाला बरच लागल असाव. छोटासाच, दहा-बारा माणसाचा घोळका होता आम्ही पुढे झालो आणि विचारल,

"इथे कुणी फर्स्ट एडर आहे? अन्यथा आम्ही दोघ आहोत!"

हे ऐकताच लोकानी लगेच आम्हाला वाट करून दिली आणि मग तिथून पुढे जे घडल ते अकल्पनीय होत सभोवतालच्या घोळक्यात काही वयस्कर मडळीही होती, पण लोक आमच निमूटपणे ऐकायला तयार होते आम्हीही शिस्तीत कामाला लागलो आणि नवल म्हणजे अपघात झाल्यापासून चौदाव्या मिनिटाला 'जखमी' ॲम्ब्युलन्समध्ये बसून हॉस्पिटलकडे निघाला होता कुठलेही अनाहूत सल्ले नव्हते. वयापेक्षा ज्ञानाला मान होता

'आऊटडोअर एज्युकेशन'मध्ये विविध साहसी खेळाचा समावेश असल्यान आम्हाला 'फर्स्ट एड' अभ्यासक्रम सक्तीचा होता चौदा दिवसाचा अभ्यासक्रम आणि एक दिवसाची कडक परीक्षा, यातून तावून-सुलाखून मिळालेल प्रशस्तिपत्र त्या दिवशी सार्थकी लागल होत.

पाश्चात्य देशात 'प्रथमोपचार' येण हे सायकल किंवा पोहायला येण्याइतक अत्यावश्यक मानल जात त्यातून गिर्यारोहण, स्कीइग, सेलिग अशा साहसी खेळामध्ये सहभाग घेणाऱ्या प्रत्येकाला 'फर्स्ट एड' याव असा कटाक्ष असतो

१९८३ च्या नोव्हेंबरमधली गोष्ट माझा आय आय टी तला डोंगरी मित्र रात्री बगलोरहून त्याच्या मैत्रिणीसह मुबईला आला होता त्याचा फोन आला

"वीक एण्डला काय करतोयस?"

"काय रे, काय बेत?" इति मी

"रविवारी मुब्ऱ्याला रॉकक्लाइबिंगला, वेस्ट फेसला जाऊ या!" इति राजा

झाल  बेत ठरला  मी, राजा, प्रिया, स्वामीनाथन आणि तिचा भाऊ असे ठरल्यानुसार सकाळी सहाला मुम्ब्र्याला लोकलमधून उतरलो  शिरस्त्यानुसार मुम्ब्रादेवी हॉटेलात गरमागरम इडली आणि शिरा असा नाश्ता करून आम्ही 'वेस्ट फेस'च्या वाटेला लागलो  नूतनच्या बंगल्याच्या मागच्या बाजूस "वेस्ट फेस" हा पश्चिमाभिमुख कडा आहे  प्रस्तरारोहणाचे तीन-चार छान मार्ग या कड्यावर आहेत

राजा आणि प्रियाचा भाऊ एक दोर घेऊन उजवीकडील मार्गावर चढू लागले. मी आणि प्रिया 'सेंटर रूट' ठरवून, विविध आयुध, सामुग्री याची जुळवाजुळव करू लागलो

"मी रूट लिड करू ?" प्रियाचा उत्साही प्रश्न

"सुरुवातीला रूट जरा विचित्र आहे, पण पुढे छान आहे !" मीही 'माहीतगार' सल्ला दिला. पण माझ्या स्त्रीदाक्षिण्यान तिच्या पुढाकाराला सहज समती दिली  माझ्या हातात सुरक्षा दोर होता  मी कड्याकडे पाठ करून मार्गाच्या थोडा बाजूला उभा होतो  प्रियान एकदा दोर, हार्नेस वगैरे तपासल

सरावाचे सवाल-जबाब झाले  बाईसाहेब कड्याला भिडल्या  हालचालीत एक सराईत आत्मविश्वास होता  मला हायस वाटल  माहीत नसलेल्या पार्टनरबरोबर क्लाइंबिंग करताना मला उगाचच एक विचित्र भीती वाटते

प्रिया पहिले बारा-पधरा फूट लीलया चढून गेली  आता एक अवघड जागा होती माझी खालून सूचनाची 'कॉमेंट्री' चालूच होती  या जागी तोल सावरून, डावा हात खूप लाब ताणून एक आधार चिमटीत पकडावा लागतो  खरी कसोटी इथेच होती  मी श्वास रोखून पाहत होतो  आजुबाजूचे आवाज, गारवा, काहीच जाणवत नव्हत  प्रियान तोल सावरत, अलगद डावा हात लाब करून खाचेचा आधार घेतला  आणि आता ती वर सरकू लागली

"अम्माऽऽ !" एक दाक्षिणात्य किंकाळी प्रियाच्या तोंडून निसटली  काय होतय हे कळायच्या आत प्रिया कड्यापासून वेगळी झाली

"थड्ड्ऽऽ !" असा आवाज आसमतात घुमल्यागत वाटला  त्यात प्रियाच्या विव्हळण्याचा स्वर मिसळला. मी भानावर आलो  झट्कन तिच्यापाशी पोचलो

"इटस् ओके, काळजी करू नको !" माझे आश्वासक शब्द  मी राजाला हाक मारली प्रिया कण्हतच होती  मी तिचे हात-पाय हलकेच, सावकाश सरळ केले  प्रिया पाठीवर पडली होती, आदळली होती  मी 'कुठे दुखतय ?' अस विचारून बसलेल्या माराचा अदाज घेतला  जखमा तर नव्हत्या  माझ्या नकळत माझ्यातला 'फर्स्ट एडर' कामाला लागला होता अशा वेळी कण्यास दुखापत झाली असण्याची चागलीच शक्यता होती  जखमीला शक्यतोवर हलवू नये ! हलवायचच असेल तर अतिशय काळजीपूर्वक ! प्रियाला राजा धीर देत होता मी आणि प्रियाचा भाऊ सुसाट खाली निघालो  मुबई-पुणे रस्ता जेमतेम पाऊण किलोमीटरवर आहे  तिथे पाटलाच्या वाडीत जाऊन, बाबू आणि गोणपाटाच कामचलाऊ स्ट्रेचर तयार केल  ते घेऊन एक गडी आणि प्रियाचा भाऊ याना वर पिटाळल  जवळच्याच एका कारखान्यातून ठाण्याला फोन केला  सुन्या हा आमचा डोंगरी मित्र  त्याच तेव्हा दुकान होत आणि त्याच्याकडे एक लाल टेम्पो होता

"सुन्या, वेस्ट फेसला ॲक्सीडेंट झालाय, हेलिकॉप्टर घेऊन अर्जंट पाटलाच्या वाडीपाशी ये।"

हेलिकॉप्टर म्हणजे त्याचा 'खास' लाल टेम्पो बाकी काही सांगण्याची गरजच नव्हती याच कारण अशा वेळेस तमाम डोंगरी मडळीत असणारा एक अलिखित सुसवाद।

पुढील तीन तासात प्रियाला स्ट्रेचरवरून खाली आणून, ठाण्याला माझ्या घरी आम्ही सुखरूप येऊन ठेपलो धामाधूम होत, खूप थकवा घेऊन आम्ही डॉक्टरकडे पोचलो सध्याकाळी सहापर्यंत प्रिया 'अलगद' बॉम्बे हॉस्पिटलमध्ये पोचली होती. तिच माकडहाड दुखावल होत पण बाकी सार ठीक होत। प्रिया कुशल हाताच्या ताब्यात होती, चिंता नव्हती

सध्याकाळी सातला माझ्या घरी फोन खणखणला

"मी कर्नल स्वामीनाथन मिस्टर लिमये, मला 'ऑपरेशन फर्स्ट एड' कळल। यू बॉइज डिड अ वडरफुल जॉब। मी तुमचे आभार कसे मानू?"

एक कडक, खाकी बाप काळजीत होता, पण चितेत नव्हता आणि याच महत्त्वाच श्रेय आम्हाला नव्हत, 'प्रथमोपचारा'ला होत

गिर्यारोहणात धोके असतात, कधीतरी अपघात होण स्वाभाविक आहे पण 'प्रथमोपचार' तत्र अवगत असल तर अपघात होऊनही जिवाला धोका कमी सभवतो हे सार सोप नाही, पण आवश्यक मात्र जरूर आहे या बाबतीतील उदासीनता झटकून प्रत्येक गिर्यारोहकान, गिरीभ्रमण करणाऱ्यान 'फर्स्ट एड' शिकून घेण अत्यावश्यक आहे आणि तरच हे साहसी उपक्रम सुरक्षित होऊ शकतील



# हाच तो स्वर्ग

पूर्वेकडे सूर्याला नुकतीच जाग येत होती तुरळक ढगाच्या कडा उजळवीत महाराजाचे आळोखेपिळोखे चालले असावेत नोव्हेंबरच्या सकाळच कोळ्याच्या जाळ्यासारख विसविशीत धुक हलकेच, उबदार किरणानी वितळत होत पायाखाली फारस दिसत नव्हतच खूप खाली 'दुधा' तलावाच चकाकणार पाणी धुक्याच्या पडद्याच्या उसवत जाणाऱ्या रेषा पायाखाली अधातरी हरवलेला काळा रॉक. पायातल्या बुटातून जाणवणारा खडक ताठरलेल्या, क्षणिक थरथरणाऱ्या पोटऱ्या सतुलनाची टोकदार जाणीव हाताच्या बोटाना जाणवणारा दगडाचा आश्वासक, खरखरीत स्पर्श थडगार खडकालाही जाग येत होती नजर डोक्यावरच्या खडकावर भिरभिर फिरत होती थोड डावीकडे सरकायला हव खोबणी, कगोरे दिसत होते - जाणवत होते स्पर्श त्याना चाचपत-तपासत होता

समजा, पडलो तर ? पार्टनरच्या हातातला दोर वाचवतो आता तर पार्टनरही दिसत नव्हता होता फक्त बोटभर जाडीचा, लालनिळा नायलॉनचा एक दोर आणि माळेसारखी सरक्षक भावना.

समोरचा वीस-पचवीस फूटाचा खडक गुरुत्वाकर्षणाची असीम प्रगल्भ जाणीव शरीराची काट्यावर तोललेली सवेदना तादात्म्य यालाच म्हणत असावेत तो कातळ, माझ मन, बुद्धी, शरीर, हे सार एकात्म होत. समोरचा कातळ उल्लघण्याची जिद्द

पडलो तर खरचटेल, लागेल, अपघातही होईल, ही पुसट भावना एक ब्रह्मानंदी लागलेली टाळी मी दुधा स्लॅबवर (मुब्रचाला) प्रस्तरारोहण करीत होतो

या खडकाच्या देशात, महाराष्ट्र देशात प्रस्तरारोहणासाठी जागा अनेक पावसाळा सपताच मुबईजवळ मुब्रा, कान्हेरी गुफा येथे शनिवार-रविवार प्रस्तरारोहणाच्या सरावासाठी आजकाल चक्क गर्दी असते महाराष्ट्रात, विशेषत· बेसॉल्ट प्रकारचा काळा खडक आढळतो यात भेगा, फटी सापडण कठीण असल्याच तर उथळ असतात काही ठिकाणी या खडकाचा वरचा पापुद्रा ऊन-पावसामुळे ठिसूळ झालेला असतो त्यामुळे आधार घेत असताना जपून घ्यावा लागतो याचा खरखरीतपणा प्रस्तरारोहणासाठी विशेष उपयोगी पृथ्वीच्या लहानपणी, थड होत जाणाऱ्या-पुन्हा उद्रेक पावणाऱ्या लाव्हा रसाच्या लाटानी सह्याद्री घडविला भूगर्भशास्त्रज्ञ याला डेक्कन ट्रॅप अस म्हणतात गुजराथच्या सीमेपासून प्रारभ होऊन, अरबी समुद्रापासून ५०/६० कि मी अतर राखत, सह्याद्री दक्षिणेकडे गोव्यापर्यंत पसरला आहे, व तसाच पुढे तो केरळमध्येही जातो लाव्हा रसाच्या थरानी घडलेला डोंगर, त्याच्या खालच्या उतारावर हिरवा साज, मुरमाची मातकट-पिवळसर मान, तर काळ्या खडकाचा शिरोभाग, अस सह्याद्रीच सामान्यत आढळणार रूप

प्रस्तरारोहण या क्रीडाप्रकाराची सुरुवात पाश्चिमात्य देशात पहिल्या महायुद्धानतर नीटपणान झाली ब्रिटन आणि आल्प्स् पर्वतराजीच्या छायेतील युरोपीय देश, या ठिकाणी दुसऱ्या महायुद्धानतर या खेळाची विशेष वाढ झाली

'रोप क्लाइबिंग ना! हो माहितीय!'

'धर्मेंद्रन त्या बिल्डिगवर काय टॉप क्लाइबिंग केलय!'

असे प्रस्तरारोहणासदर्भात अनेक गैरसमज प्रस्तरारोहण म्हणजे दोराच्या सहाय्यान वर चढण नाही, तर खडकाच्याच अगी असलेल्या खाचाखोचा, कगोरे याच्या आधारान, हातापायाचा उपयोग करीत वर चढण म्हणजे प्रस्तरारोहण दोर हा सुरक्षिततेकरिता वापरला जातो सकृतदर्शनी माकडचेष्टा वाटतात, परतु अचाट, आव्हानकारक, रोमाचक असा हा प्रकार सुरुवातीच्या काळात अवजड चामडी बूट, घायपाताचे जाडजूड - अत्यत ताठर असे दोर, अशा तुटपुंज्या सामुग्रीनिशी प्रस्तरारोहण केल जात असे प्रस्तरारोहणाच्या इतिहासातला, विशेषत ब्रिटनमध्ये, १९५० ते १९६० हा सुवर्णकाल होता त्या काळात केलेल्या चढाया आजही थक्क करणाऱ्या आहेत जो ब्राऊन, डॉन व्हिलन्स, ख्रिस बॉनिंग्टन, रिकार्डो कासिन, वॉल्टर बोनाती, असे अनेक नामवत आरोहक. त्याचे चित्तथरारक अनुभव, रॉक क्लाइबिंगमधील गमती-जमती, अशानी सुरस झालेल्या त्याच्या चरितकहाण्या, हा आपल्या देशातील प्रस्तरारोहणाचा एक प्रमुख प्रेरणास्रोत आहे ही चरित्र आणि या विषयावरील इतर पुस्तक ७३/७४ साली झपाटल्यासारखी वाचून काढली त्यामुळे सदर्भ समृद्ध झाले, तात्रिक बाबी छान माहीत झाल्या, विशेष म्हणजे अवघड चढाया करण्यासाठी एक उत्साह, स्फूर्ती मिळाली

आजकाल प्रस्तरारोहणाच्या सामग्रीत अकल्पनीय क्राती झाली आहे हलक्या वजनाचे, रगीबेरगी नायलॉनचे मऊसूत दोर, विशेष दणकट-चिवट रबरी सोलचे हलके शूज, खिळे,

खिळ्यात अडकवायच्या विविध आकाराच्या कड्या, अस बरच काही आजकाल तर प्रस्तरारोहणावरील गुळगुळीत रगीत परदेशी नियतकालिकातील फोटो पाहताना हे सार परग्रहावरील वाटत भडक रगाच्या चट्टेरीपट्टेरी रॉक क्लाइबिंगच्या तग तुमानी ही सध्याची म्हणे गरमागरम फॅशन आहे स्पीड क्लाइबिंग म्हणजे कृत्रिम भिंतीवरील स्पर्धात्मक चढाई, हा प्रकार युरोपात-अमेरिकेत अफाट लोकप्रिय होत आहे स्पॅनिश ऑलिपिकमध्ये प्रदर्शनीय स्पर्धाही होणार आहेत

बीसेक फूटाच्या खडकावर चढाईचा सराव करण याला बोल्डरिंग म्हणतात प्रस्तरारोहणात सरक्षक हेल्मेट अत्यावश्यक असत, आपल्याकडे याचा खूप वेळा विसर पडतो बोल्डरिंगनतरचा पुढला प्रकार म्हणजे पिच क्लाइबिंग -सुमारे शभर फूटाची चढाई यात कमीत कमी दोघजण असतात पुढचा लीडर तर दुसरा सेकड मॅन लीडर दहा-बारा फूटाची चढाई करतो नतर खडकाच्या भेगेत ठोकलेला खिळा किंवा तत्सम, आधाराला लावलेल्या कड्यात स्वत च्या कमरेला बाधलेला दोर गुतवतो दुसर टोक सेकड मॅनकडे असत लीडर पुनश्च चढाई सुरू करतो या घटकेस लीडर काही चुकीमुळे किंवा अपघातान निसटला-निखळला तर तो दहा फूटावरील कडीवर लटकतो. कारण दोर खालच्याच्या हातात घट्ट असतो आयुष्याची दोरी बळकट असल्याची प्रचीती तेव्हा येते! याच क्रमान शभर फूटाची चढाई पूर्ण होते लीडर वर पोचल्यावर स्वत·ला एखाद्या खबीर आधाराला बाधून घेतो आणि खालच्या पार्टनरला सुरुवात करायला सागतो सेकड मॅन जसजसा वर येत जातो तसतसा लीडर दोर वर खेचून घेतो समजा, सेकड मॅन धडपडला तर त्याच्या कमरेचा दोर लीडरच्या हातात भक्कम असतो. अस हे सुरक्षित तत्र. धोका असतो पण डोळसपणे कमीत कमी प्रमाणात स्वीकारला जातो पण तोही धोका काढला तर त्यातली रोमाचकताच नष्ट होईल मोठे कडे-सुळके चढताना पिच क्लाइंबिंग पद्धतीनच चढतात या चढाईत अनेक 'पिच' होतात अशी ही प्रस्तरारोहणाच्या तत्राची प्राथमिक ओळख

खरखरीत-काळाकभिन्न कातळ, स्तभित करणारे बेलाग दिमाखदार ड्युक्स् नोजसारखे सुळके, भयावह कडे, पायाखाली अनतात नाहीशा होणाऱ्या खोल दऱ्या, खालून वर तरगत येणारे दरीतील ढग, आजुबाजून भिरभिरणारे स्विफ्ट पक्षी, आसपास तरगणारी एखादी चुकार घार, हातापायाची बोट आणि लवचिक कणा याची खडकाशी प्रेमळ सलगी. एक तरल अवस्था स्वर्ग-स्वर्ग म्हणतात तो हाच असावा



# लेकिन बहादूर हो !

उन्हं उतरायला लागली होती दुपारी साडेपाचचा सुमार मे महिन्यातला तळपणारा, भाजून काढणारा सूर्य नुकताच निवळू लागला होता मी वरंध घाटाची चढण चढत होतो या घाटात ट्रॅफिक तसा विरळच तिरकस, सोनेरी किरणानी झाडाच्या पानाना एक हिरवा तजेला, झळाळी दिलेली सध्याकाळची चाहूल लागलेला हा सूर्यप्रकाश मोठा बहारदार असतो बहुतेक वेळा कॅमेरा नसल्याची चुटपूट लावणारा! डोंगराचे उतार, त्याचे सारे कगोरे ऊन-सावलीच्या खेळात रमलेले दूरवरच्या डोंगरानी धूसर जाभळ्या-निळ्या रगात अघोळ केलेली दक्षिणेला सह्याद्रीची मान्यवर शिखर मोठ्या दिमाखात उभी होती घाटमाथा जवळ आला कावळा किल्ल्याच्या बगलेत वाघजईच मदिर, आजुबाजूस चहा-भज्याच्या दोन-चार टपऱ्या साहजिकच, तिथ गाडी थाबून विसावलो

वरध घाटात या ठिकाणी उभ राहून उत्तरेकडे नजर टाकली तर ठसठशीतपणे दिसणारे किल्ले म्हणजे स्थितप्रज्ञ रायगड, बुधला माची मिरवत उभा असलेला तोरणा, आणि बालेकिल्ल्याची काळी, हत्तीसारखी पाठ उभारलेला राजगड

राजगड आणि तोरणा हे याच घाटातून उच, उत्तुग वाटतात, कारण कोकणापासून याच्या माथ्यापर्यंत एकाच दृष्टिक्षेपात हे याच घाटातून छान दिसतात एरवी पायथ्यापासून याची फक्त दोन हजार फूटाचीच उची



दिसते शिवकालातले हे महत्त्वाचे तीन किल्ले तोरणा -स्वराज्याचे तोरण, श्रींच्या राज्याचा हा पहिला मानकरी राजगड -शिवरायानी मोठ्या प्रेमान मुरुंबदेवाच्या डोंगरातून कातून काढलेला हा हिरा, महाराजाची पहिली राजधानी रायगड-मऱ्हाटी राज्याच्या प्रथम राज्याभिषेकाचा हा साक्षीदार, अशा ठिकाणी बाहू फुरफुरतात हेच खर.

'दुरून डोंगर साजरे' हे जरी फारस खर नसल तरी, दुरून दिसणारे डोंगर हे साद घालतात हे खर दुरून डोंगराकडे पाहताना जाणवत ते त्याच भव्यपण, देखणेपण डोंगराकडे पाहताना कवींना काय सुचत कोण जाणे, पण आम्हा डोंगरवेड्याना मात्र समोर दिसणाऱ्या कड्यावर मार्ग कुठून काढता येईल एवढाच विचार सुचू शकतो नव्हे, हाच विचार वेडपिस करतो आणि याला उत्तर एकच असत, की कधी ना कधी त्या कड्याला भिडण मार्ग निघतो का हे पाहत लढत राहण माथ्यावर पोचता आल तर आनद साजरा करण, नाही जमल तर "ठीक है। फिर कभी।"

ऐंशी साली आय आय टी आटोपून मी पहिला जॉब घेतला, दिल्लीला आता तस म्हटल तर दिल्ली, हे एक वेड्यासारख पसरलेल शहर, तेसुद्धा सपाटीवर कटाळा येण्यास हे पुरेस कारण होत एक मात्र खर की इथून हिमालय जवळ आहे पण खर म्हणजे एवढ पुरेस नव्हत समविचाराची, एकाच स्वभावाची डोंगरवेडी मडळी सहज एकत्र होतात मलाही गिर्यारोहण क्लब दिल्लीत सहज सापडला 'क्लाइबर्स अँण्ड एक्स्प्लोअरर्स' अस त्याच नाव लवकरच सवगडीही मिळाले

दिल्लीच्या आसपास काही मोजक्याच जागा आहेत, जिथे रॉक क्लाइंबिंगला जाता येत उदाहरणार्थ धौज दिल्लीपासून जेमतेम ३० कि मी वर हे ठिकाण आहे पण हे आहे मात्र हरयाणात इथे एक छोटा जलाशय आहे आणि चोहोबाजूस काठावर, लालसर पिवळ्या सँडस्टोन कपारीच कोंदण या कपारींची उची असेल जेमतेम सत्तर-ऐंशी फूट पण इथेच प्रस्तरारोहणात खूप गमत आहे

हे ठिकाण दिल्लीच्या एवढ जवळ असून फार वापरल जात नाही त्यामुळे या कपारींवर खूप चढायाही झालेल्या नव्हत्या पाच-सहा रूटसवर फक्त सरावासाठी मंडळी चढाई करायची मी बनीबरोबर प्रथमच या ठिकाणी येत होतो बनी हा सरदारजी, स्वच्छ पगडी, दाढी राखणारा मोठा गमत्या सुरुवातीला दिल्लीत सगळेच सरदारजी सारखे भासायचे पण बनी वेगळा होता दाढीच्या जजाळातून दोन हसरे डोळे लुकलुकत असत. प्रस्तरारोहणासाठी नेहमी उत्साही असलेला गडी त्या दिवशी बनी मला, त्यानी मडळीनी पूर्वी केलेले रूट दाखवत होता माझ लक्ष मात्र डॅमजवळच्या एका लालसर कपारीवर होत त्याच्या नितळ पृष्ठभागावर एक भेग सरळ गेली होती मध्येच वाट चुकल्यागत त्या भेगेला एक टेंगूळ होत मग बापडी पुन्हा माथ्यापर्यंत सरळ गेली होती. मी पाहताच तिच नाव ठेवल. 'पल्स', याने की स्पदन

मी बनीला म्हटल, "वह क्रॅक किसीने ट्राय किया है?"

"नही तो।" बनी

"चलो, फिर हम ट्राय करते है।" इति मी

आम्ही दोर, खिळे इत्यादी सामान सॅकमधून उपसायला सुरुवात केली



# लेकिन बहादूर हो !

उन्ह उतरायला लागली होती दुपारी साडेपाचचा सुमार मे महिन्यातला तळपणारा, भाजून काढणारा सूर्य नुकताच निवळू लागला होता. मी वरध घाटाची चढण चढत होतो या घाटात ट्रॅफिक तसा विरळच. तिरकस, सोनेरी किरणानी झाडाच्या पानाना एक हिरवा तजेला, झळाळी दिलेली सध्याकाळची चाहूल लागलेला हा सूर्यप्रकाश मोठा बहारदार असतो बहुतेक वेळा कॅमेरा नसल्याची चुटपूट लावणारा! डोंगराचे उतार, त्याचे सारे कंगोरे ऊन-सावलीच्या खेळात रमलेले दूरवरच्या डोंगरानी धूसर जाभळ्या-निळ्या रगात अघोळ केलेली दक्षिणेला सह्याद्रीची मान्यवर शिखर मोठ्या दिमाखात उभी होती घाटमाथा जवळ आला. कावळा किल्ल्याच्या बगलेत वाघजईच मदिर, आजुबाजूस चहा-भज्याच्या दोन-चार टपऱ्या साहजिकच, तिथ गाडी थाबून विसावलो

वरध घाटात या ठिकाणी उभ राहून उत्तरेकडे नजर टाकली तर ठसठशीतपणे दिसणारे किल्ले म्हणजे स्थितप्रज्ञ रायगड, बुधला माची मिरवत उभा असलेला तोरणा, आणि बालेकिल्ल्याची काळी, हत्तीसारखी पाठ उभारलेला राजगड

राजगड आणि तोरणा हे याच घाटातून उच, उत्तुग वाटतात, कारण कोकणापासून याच्या माथ्यापर्यंत एकाच दृष्टिक्षेपात हे याच घाटातून छान दिसतात एरवी पायथ्यापासून याची फक्त दोन हजार फूटाचीच उची



दिसते शिवकालातले हे महत्त्वाचे तीन किल्ले तोरणा -स्वराज्याचे तोरण, श्रींच्या राज्याचा हा पहिला मानकरी राजगड -शिवरायानी मोठ्या प्रेमान मुरूबदेवाच्या डोंगरातून कातून काढलेला हा हिरा, महाराजाची पहिली राजधानी रायगड-मऱ्हाटी राज्याच्या प्रथम राज्याभिषेकाचा हा साक्षीदार, अशा ठिकाणी बाहू फुरफुरतात हेच खर

'दुरून डोंगर साजरे' हे जरी फारस खर नसल तरी, दुरून दिसणारे डोंगर हे साद घालतात हे खर दुरून डोंगराकडे पाहताना जाणवत ते त्याच भव्यपण, देखणेपण डोंगराकडे पाहताना कवींना काय सुचत कोण जाणे, पण आम्हा डोंगरवेड्याना मात्र समोर दिसणाऱ्या कड्यावर मार्ग कुठून काढता येईल एवढाच विचार सुचू शकतो नव्हे, हाच विचार वेडपिस करतो आणि याला उत्तर एकच असत, की कधी ना कधी त्या कड्याला भिडण मार्ग निघतो का हे पाहत लढत राहण माथ्यावर पोचता आल तर आनद साजरा करण, नाही जमल तर "ठीक है। फिर कभी।"

ऐंशी साली आय आय टी आटोपून मी पहिला जॉब घेतला, दिल्लीला आता तस म्हटल तर दिल्ली, हे एक वेड्यासारख पसरलेल शहर, तेसुद्धा सपाटीवर कटाळा येण्यास हे पुरेस कारण होत एक मात्र खर की इथून हिमालय जवळ आहे पण खर म्हणजे एवढ पुरेस नव्हत समविचाराची, एकाच स्वभावाची डोंगरवेडी मडळी सहज एकत्र होतात मलाही गिर्यारोहण क्लब दिल्लीत सहज सापडला 'क्लाइंबर्स ॲण्ड एक्स्प्लोअरर्स' अस त्याच नाव लवकरच सवगडीही मिळाले

दिल्लीच्या आसपास काही मोजक्याच जागा आहेत, जिथे रॉक क्लाइंबिंगला जाता येत. उदाहरणार्थ धौज दिल्लीपासून जेमतेम ३० कि.मी वर हे ठिकाण आहे. पण हे आहे मात्र हरयाणात इथे एक छोटा जलाशय आहे आणि चोहोबाजूस काठावर, लालसर पिवळ्या सँडस्टोन कपारीच कोंदण या कपारींची उची असेल जेमतेम सत्तर-ऐंशी फूट पण इथेच प्रस्तरारोहणात खूप गमत आहे

हे ठिकाण दिल्लीच्या एवढ जवळ असून फार वापरल जात नाही त्यामुळे या कपारींवर खूप चढायाही झालेल्या नव्हत्या. पाच-सहा रूटसवर फक्त सरावासाठी मडळी चढाई करायची. मी बनीबरोबर प्रथमच या ठिकाणी येत होतो बनी हा सरदारजी, स्वच्छ पगडी, दाढी राखणारा मोठा गमत्या. सुरुवातीला दिल्लीत सगळेच सरदारजी सारखे भासायचे. पण बनी वेगळा होता दाढीच्या जजाळातून दोन हसरे डोळे लुकलुकत असत प्रस्तरारोहणासाठी नेहमी उत्साही असलेला गडी त्या दिवशी बनी मला, त्यानी मडळीनी पूर्वी केलेले रूट दाखवत होता माझ लक्ष मात्र डॅमजवळच्या एका लालसर कपारीवर होत. त्याच्या नितळ पृष्ठभागावर एक भेग सरळ गेली होती मध्येच वाट चुकल्यागत त्या भेगेला एक टेंगूळ होत मग बापडी पुन्हा माथ्यापर्यंत सरळ गेली होती मी पाहताच तिच नाव ठेवल 'पल्स', याने की स्पदन

मी बनीला म्हटल, "वह क्रॅक किसीने ट्राय किया है?"

"नही तो!" बनी

"चलो, फिर हम ट्राय करते है!" इति मी

आम्ही दोर, खिळे इत्यादी सामान सॅकमधून उपसायला सुरुवात केली

सारा आसमत शांत होता. कपारींच्या वस्तीला सावली होती, पण पाणी मात्र उन्हात चमचम करत तळपत होत. कुठे दूरवर शेतकरी काम करताना दिसत होते. सार कस खूप शात होत.

दोर मोकळे झाले. बनी मला बिले, म्हणजे सुरक्षादोर देणार होता. मी चढाईला सुरुवात केली. लालसर, खरखरीत सॅण्ड स्टोनचा स्पर्श मोठा मजेदार, नवलाईचा होता. (सह्याद्रीत बेसॉल्ट असतो) मी त्या भेगेत लीलया तीस एक फूट सरकलो. आता त्या 'स्पदना'ची सुरुवात होती. भेग उजवीकडे वळून पुन्हा पुढे सरळ होत होती. इथे कौशल्य पणाला लागणार होत. मी खोल श्वास घेतला आणि त्या भेगेशी लढू लागलो. कमरेचा दोर खाली कुठेतरी बनीच्या हाती होता. लाइफ लाइन! मी कणाकणान पुढ सरकत होतो. स्नायू ताणले गेले होते. एक पुसट वेदना होती. पण परकोटीचा आनद होता. खाली कुणी लोकही जमले होते. आपापसात काहीबाही बोलत होते. माझ्यापर्यंत हे सार जणू तरगत पोचत होत, पण लक्षात मात्र येत नव्हत. मी पुढे, वर सरकतच होतो. एका क्षणी अचानक माझ्या लक्षात आल. आपले दोन्ही पाय पूर्णपणे फाकलेले आहेत आणि त्याना कसाबसा आधार आहे. दोन्ही हात पूर्णपणे ताणलेले आहेत. स्नायूच्या शेवटच्या ततूपर्यंत त्या ताणाची तीक्ष्ण जाणीव होती. माझ्या लक्षात आल, आपण इथून पडलो तर आपल काही खर नाही! कमीत कमी हात, पाय मोडेल! खर सागू? तेव्हा ते जाणवल, पण भीती नाही वाटली. एक तन्मयता होती. मला फक्त पुढला लालसर तापलेला कगोरा दिसत होता. तो हाती आला की मी बाजी मारली होती. माझा अर्जुन झाला होता. एक हात अलगद सोडून मी आणखी ताणला, आणखी थोडा! कगोरा हाती आला. पुढल्या एक मिनिटात मी आणखी दहा फूट वर सरकलो होतो. ऊर धपापत होता. मी आता सुरक्षित होतो. हातापायाला सूक्ष्म कप सुटला होता. पण आता सार काही ठीक होत. क्लाइब आता आवाक्यात होता. मी आणखी एक प्रथम चढाई केली होती.

मी खाली कसा आलो, आठवत नाही. पण खाली आल्या आल्या आम्हाला त्या खेडुतानी घेरल. दोन बापे, एक पोरग आणि एक प्रौढ स्त्री.

आम्ही आवराआवर करत होतो. त्याच्यापैकी एकान आम्हाला मस्त 'मकेदी रोटी' आणि 'सरसोंदा साग' दिल; शिवाय वर मलईदार ताक! आमची चगळ होती. गप्पांतून कळल की दोन वर्षांपूर्वी आमच्याच रूटवरून कुणीतरी खाली पडला होता. मला सार काही सर्रकन आठवून गेल. बाई म्हणत होती,

"पढे-लिखे दिखते हो! क्यू जान पर लडते हो? कुछ भी कहो, लेकिन बहादूर हो!"

ती हरयाणवी अनपढ बाई. आम्ही असा अचरटपणा का करतो, हे सहजपणे न उमगणारी तिच्या तोंडच ते सर्टिफिकेट मात्र लाखमोलाच होत. कुठेतरी माझी रॉक क्लाइबिंगची धडपड, ऊर्मी त्या बाईला कळली होती, भावली होती. आजही नाकातल्या चादीच्या वळ्याआडून, खरखरीत आवाजातले ते शब्द, "लेकिन बहादूर हो!", कुठे तरी कानात घुमत राहतात.

# एक कल्पना एक आव्हान

शनिवार, २४ डिसेंबर १९८३

आय.आय.टी कँटीन कॉलेजीय कँटीनचा नेहमीचाच गोंगाट, माउटनियरिंग क्लबची गँग कोपऱ्यातल्या टेबलावर बसली होती मी आत आलो "हाय! हॅलो!" वगैरे झाल गेल्या शनिवारच्या रॉक क्लाइंबिंगच्या गप्पा मडळी मजेत चघळत होती चहाचे काही रिकामे, काही वाफाळते कप

"नान्या, वीकएण्डला काय करतोयस?" इति मी

"काही नाही! फ्री आहे!" नान्या कुर्वे

"मोसा काढतोस?" मी

(मोसा म्हणजे मोटर सायकल शॉर्टफॉर्म करण्याची आयआयटीतली खास सवय!)

"पेट्रोल?" नान्या

"चल, मी घालतो!" मी

आम्ही निघालो होतो मोरोशी गावाला मुरबाड-माळशेज रस्त्यावरील कोकणातल गाव भैरवगडाच्या पायथ्याच, पण आम्ही निघालो होतो वेगळ्याच कारणान इथून हरिश्चंद्रगडाचा पश्चिमकडा दिसतो. तीन हजार फूटाचा बाबाची खास टेलिफोटो लेन्स बरोबर घेतली होती, अर्थात खूप मस्का मारून. विचार धूसर होते पण कोकणकड्याचे नीटपणान फोटो काढावेत, 'कोकणातून कोकणकडा कदाचित चढता येईल' या अचरट कल्पनेतून ही ट्रीप जन्माला आली होती



मोरोशीत मोसा ठेवून आम्ही उत्तरेकडे पाऊण कि मी सरकलो एक हजार मि मि टेलिफोटो लेन्स हे एक अवजड धूड सात-आठ किलो वजन ही लेन्स स्टँडवर लावावी लागते आणि तिच्यामागे बसविलेला कॅमेरा एवढा छोटुसा दिसतो! एखाद्या आईने पाळुगळी घेतलेल्या पोरासारखा या लेन्सच तेव्हाच बारस झाल, तोफ- 'कॅनन', आणि तिच्यातून उमटलेली चित्र अर्थात कॅनन शॉटस्

लेन्सचा रोख कोकणकड्याकडे वळवला फोकस करून कॅमेऱ्याला डोळा लावला सुरुवातीस काय पाहतो आहे ते कळेचना मग नीटपणे हळुहळू लेन्सचा रोख बदलत कडा खालपासून वरपर्यंत निरखला नान्या एकदा 'कस दिसतय' बघून सटकला. तासाभरानतर माझी मान अवघडली होती पण कोकणकडा डोळे भरून पाहून घेतला होता छत्तीस फोटोंचा रोलही सपला होता कड्यावरील खाचा, भेगा, कातळाचे विविध आकार, मधले गवताळ टप्पे, सार नजरेन साठवून घेतल होत एकदर कड्याची उंची, अक्राळविक्राळ तीन हजार फूट असली तरी त्यातील वरचे सतराशे फूट कातळ आहे एवढा मोठा कडा चढता येईल ही शक्यतादेखील, स्वत:च्याच मनाशी कबूल करण हेही धाडसाच वाटत होत

आवराआवर करून आम्ही परत निघालो टाण्याला पोचल्यावर नान्या म्हणाला, "काय रे, काय झाल! गेले दोन-तीन तास, सपूर्ण प्रवासात काहीच बोलला नाहीस?"

"काही नाही, जनरल विचार करत होतो!" अस म्हणून मी वेळ मारून नेली मेंदूचा एक कप्पा मात्र कोकणकड्यान पूर्णपणे बळकावला होता

## शुक्रवार, १२ जुलै १९८५

भरपावसात आम्ही हरिश्चद्रगडावर पोचलो होतो दोन-तीन दिवस फक्त 'पडे रहो' असा कार्यक्रम होता आम्ही आठ जण होतो बड्या, तेव्हाचा माउटनियरिंग सेक्रेटरीही सोबत होता

नाटक, सिनेमा, कविता, कुणाच प्रेमप्रकरण, अशा मोकाट-मस्त गप्पा चालल्या होत्या मी मात्र, विषयाला कशी सुरुवात करावी या कल्पनेन जरा अवघडलो होतो जेवणानतर गोट्यान फर्मास चहा बनवला दोन-तीन मेणबत्त्याचा उजेड बाकी गुहा, व आजुबाजूच सारच काळोखात बाहेर वरुणराजान सूर धरलेला एखाद्या शिवकालीन किल्ल्याच्या तळघरात, खलबतखान्यात बसल्यासारख वाटत होत मी शेवटी धीर करून जरा मोठ्या आवाजात म्हणालो, "जरा शातता! मला महत्त्वाच बोलायचय!"

आसपासचे चेहरे आश्चर्य आवरत नीट सावरून बसले मी खालच्या आवाजात सुरुवात केली, "दोन वर्षांपूर्वी कोकण कड्याचे मी फोटो काढले होते. खालून मोरोशी गावातन परवा ते जुळवत बसलो होतो चढाई खूप मोठी असेल, पण शक्य आहे!"

"अशक्य! पागल है क्या?" असे दोन-तीन आवाज उमटले

"आयला, फडा आयडिया आहे!" बड्या सरसावून बसला पुढच्या तीन तासात पाच चहा झाले जमेल, न जमेल अशा चर्चेतून, किती माणस, काय इक्विपमेंट लागेल, अशा चर्चा झाल्या गेल्या एक-दोन वर्षांत 'गिरीविहार'न खडा पार्सीचा सुळका सर केला होता, तर 'केव्ह एक्स्प्लोअरर्स' या क्लबने ड्युक्स् नोजची आठशे फूटाची चढाई मारली होती

मोठ्या चढाया करण हा प्रकार नुकताच आपल्याकडे सुरू होत होता शिवाय कोकणकड्यावर बऱ्याच जणाचा डोळा आहे, असे विषयही चर्चेत येऊन गेले 'पावसाळा आटोपताच भरपूर सराव करावा लागेल, साधनसामुग्रीच काटेकोर प्लॅनिंग कराव लागेल!' - जवळजवळ निर्णयाच अतिम टोक

वरवर पाहता रुक्ष, खाकी विषय वाटतात पण त्या रात्री त्या खलबतखान्यात वातावरण विद्युतभारित असाव कुणालाही हात लावला तर शॉक बसेल अस वाटत होत सगळेच अचाट चढाईच्या अपूर्व कल्पनेन भारावले होते, झपाटले होते चढाईचा बेत पक्का झाला मडळी हळुहळू जागच्या जागीच झोपाळली मी आणि बड्या मात्र हलक्या आवाजात रात्रभर बोलत होतो

## सोमवार, ५ ऑगस्ट १९८५

हॉस्टेल न ५ चा कॉरीडॉर, सोमवार हा घातवार असायचा आठवड्याच्या परीक्षा सगळ्या सोमवारी असत चहा, खाण आटोपून मडळी हळुहळू मीटिंगसाठी जमत होती गेल्याच आठवड्यात रॅपलिग, म्हणजे दोराच्या सहाय्यान उभ्या कड्यावरून उतरण व जुमारिंग म्हणजे जुमार या साधनाच्या मदतीन, दोरावर उभा कडा चढून जाण - अशा गोष्टींचा सराव, याची सुरुवात झाली होती सतराशे फूटाची चढाई ही काही चेष्टा नव्हे अनत अडचणी, धोके यावर मात करावी लागणार, चढाईच्या कालावधीत कड्यावर खाली-वर कराव लागणार यासाठी तत्राचा सराव इतका घोटलेला हवा की त्या प्रतिक्षिप्त क्रियाच वाटल्या पाहिजेत कारण जमिनीपासून दोन हजार फूटावर लहानशी चूक, म्हणजे यमाला वाकुल्या दाखवण्यासारख


खाण्यापिण्याची तयारी, चढाईच्या साधनसामुग्रीच्या याद्या, कुठून मिळवायची-काय खोटी कारण सागायची? (कारण ही सारी मोहीमच गुप्तपणे आखली जात होती) मीटिंग जोरात सुरू होती

एवढ्यात "जनता! एक्स्पाशन बोल्ट बनाया!" अस बोंबलत आनद आला त्याचा सावळा चेहरा उत्साहान लालसर दिसत होता लगेच ड्रिल-हातोडा घेऊन हॉस्टेलच्या दगडी भितीत तो ठोकण्यात आला दोर लावून बोल्टच्या दणकटपणाची खात्री करण्यात आली

मी गॅलरीतून बोल्टपाशी जमलेला आमचा ग्रूप पहात होतो एक निखळ उत्साह दिसत होता माझ्या डोळ्यासमोर टेलिफोटो लेन्समधून दिसलेला कोकणकडा तरळत होता ही सारी पूर्वतयारी आणि चढाई, वर्तमान आणि भविष्य याच्यातील एक दुवा फक्त कल्पनेतला, एक अनिश्चितता, भीती, आणि कड्याला भिडण्याची एक जबरदस्त ऊर्मी, अस सार जाणवत होत

दोन किलोमीटर लाबीचा, तीन हजार फूट उच अर्धवर्तुळाकार कोकणकडा खालच्या कोकणाकडे पहात उभा होता जणू हात पसरून आलिगनासाठी आव्हान देत होता साराच प्रकार झिग आणणारा होता

# पार्टनर ! बना दिया



शनिवार, २३ नोव्हेंबर १९८५ सेमिस्टरअखेरच्या परीक्षाची धामधूम सुरू होती मी माजी विद्यार्थी साहजिकच, त्या जजाळातून सुटल्यान मजेत होतो आनद पै, जयत कुलकर्णी (जकू), आणखी तिघ, आणि मी, असे ॲडव्हान्स पार्टी म्हणून कोकणकड्याकडे निघालो होतो. काल रात्री उशिरापर्यंत जागून सामानाची बाधाबाध झाली होती दोन हजार फूट दोर, शभर एक्सपाशन बोल्ट, मुद्दाम बनविलेल्या काही गावठी-काही परदेशी पिटॉनस् (खिळे), ताडपत्री खाण-पिण, भाडी-कुडी, अशा साऱ्या सामग्रीची चार पोती, अकरा कीट बॅग, आणि आमच्या रकसॅक्स (पाठपिशव्या) अशा सरजामानिशी पहिली लोकल पकडून कल्याणला पोचलो ओतूरची साडेआठ वाजता सुटणारी गाडी पकडून आम्ही माळशेजच्या दिशेन निघालोदेखील

माळशेज घाटाच्या पायथ्याशी सावर्णे गावाला उतरलो हॉटेलवाला देशमुख आमच्या स्वागताला सज्ज होता आमच्या गुप्ततेच्या करारात तोही सामील होता निरोपाची एक वही त्याच्याच हॉटेलात सोडून, सामानाच्या दोन बैलगाड्याबरोबर आम्ही बेलपाड्याला निघालो. शहरी सुरक्षिततेचा शेवटचा दुवा निखळला

बेलपाड्यापासून ओढ्याच्या काठाकाठान दोन कि मी सपाटीवरलं अतर सपवून, ओढ्याचाच काठ पकडून आम्ही चढायला सुरुवात केली. बाराशे फूटाचा चढ सुरुवातीला झाडाच्या गर्दीतून, मग कारवीच्या

जगलातून होता पाठीवरच्या अवजड सॅक्स, निथळणारा घाम धपापणारा श्वास निवण्यासाठी अधुनमधून थाबत होतो पोटऱ्या-खादे दुखत असावेत, पण जाणवत नव्हते फणा काढलेल्या नागासारखा काळाकभिन्न कोकणकड्याचा विस्तार हळुहळू जवळ येत होता कारवीच रान सपल ओढ्याच्याच कोरड्या पात्रात आम्ही सामान टाकल दोन हजार फुटी अजस्र भिंतीच्या पायथ्याशी मुगीप्रमाणे भासणारे आम्ही डोक्यावरच आव्हान निरखत होतो. आम्ही बेस कॅपला पोचलो होतो

## सोमवार, २५ नोव्हेंबर १९८५

कड्याच्या पायथ्याशी सुरुवातीची शभर फूटाची भित पायथ्याशी असलेल्या खडकाच्या आडोशाला चढाईची साधनसामुग्री व्यवस्थित लावून ठेवली होती आनद तळापासून वीस फूटावर होता नुकत्याच मारलेल्या खिळ्यात त्यानी कमरेचा दोर गुतवला होता पुढच्या मार्गाची टेहळणी चालली होती दुपारचे चार वाजलेले सूर्य कललेला दुपारची दाहकता सपली होती मध्येच हळुवार थंड झुळुकही होती खूप खाली बेलपाड्यातले समिश्र आवाज येत होते चढाईचा पहिला दिवस आसपास जगलातले पक्ष्याचे आवाज. आनद खिळ्यापासून काळजीपूर्वक हलकेच वर सरकला आम्ही माना उचावून तो टेन्स क्षण टिपत होतो एवढ्यात, 'ओ शिट्!' आनद ओरडला

त्याच्या हातातला दगडाचा मोठा ढलपा निखळला हातातल्या ढलप्यासह आनद मागे वळला हातातला ढलपा निसटला आणि खाली पडला आनदाचे पाय भिंतीवरून सुटले, पुन्हा भिंतीवर टेकले, तेव्हा आनद खाली घसरत होता त्यान भितीकडे तोंड वळवून दोर पकडला खाली, आनदच्या आरोळीनतर जकून दोर घट्ट पकडून ठेवला होता आनद घसरता घसरता मधल्या अडथळ्याला थबकून भितीपासून विलग झाला शेवटचे सात-आठ फूट हवेतून हातवारे करीत तळाच्या कारवीच्या झुडपात पाठीवर अवतरला डोक्यावर हेल्मेट होत आणि डोक्याच्या बाजूला दोन इचावर एक अणकुचीदार, ओबड-धोबड खडक होता घसरताना हातात धरलेल्या दोरामुळे हातावर दोन खताळलेले-कापलेले घट्टे उमटले होते. 'ये क्या हुआ?' असा विस्फारलेला भाव डोळ्यात

हे सार निमिषार्धात घडल होत वीस फूटावरून आनद धाडकन् खाली पडला होता शेकलेला पार्श्वभाग आणि जळणारे हात याची वेदना "आईऽऽग!" अशी आनदच्या तोंडून उमटली आनद थोडक्यात बचावला होता नमनालाच कोकणकड्यान 'जरा जपून!' अशी चपराक दिली होती

## बुधवार, २७ नोव्हेंबर १९८५

आदल्या दिवशी जकून शभर फूटाची झकास चढाई मारली होती आनद बेस कॅपवर हातावर फुकर घालत बसला होता आज सकाळी निघताना त्याच्या चेहऱ्यावर 'जलन' स्पष्ट दिसत होती, आजच्या चढाईत भाग घेता येणार नाही म्हणून

आज जकून आणखी पन्नास फूट मारले. जो भाग चढून झाला त्याला आम्ही रूट ओपन झाला अस म्हणतो मग तिथे फिक्स रोप लावून त्या मार्गाचा हायवे केला जातो मग पुढल्या वेळेस चढताना दोराचा आधार घेऊन आदल्या दिवशीचा सर्वोच्च बिंदू गाठण

सोप आणि कमी वेळाच काम असत

जकून दोर हाती घेतला अगा-खाद्यावर चढाईची विविध आयुध लटकावून मी तयार झालो खिळे, कड्या वगैरे गोष्टींच वजन सुमारे सहा-सात किलो असत, आणि हे सार लटाबर घेऊन उभ्या भिंताडावर चढण ही एक कसरतच असते. आम्ही उभे होतो तिथून एका फूटभर रुदीच्या भेगेची सुरुवात होत होती आत जेमतेम पाय कोंबता येईल एवढी रुद पुढे पधरा फूटावर खडकाचाच बाहेर झुकलेला भाग होता याला ओव्हर हँग म्हणतात मी झपझप ओव्हर हँगचा पायथा गाठला आणि मग लढाईला खरी सुरुवात झाली

समोरच्या भेगेत ठोकलेल्या खिळ्यात कमरेचा दोर गुतवलेला, दोराच दुसर टोक जकूच्या हाती घट्ट धरलेल, त्यामुळे मी दोन्ही हात सोडून लटकू शकत होतो समोरचा अगावर येणारा उचवटा माझा तोल मागे ढकलत होता काहीही करून त्या उचवट्याच्या वर पोचायच होत माझे प्रयत्न चालूच होते. काही काळानतर हात जाम दुखायला लागले इतकच काय, हातातली शक्तीच गळून गेल्यासारख वाटत होत मी जकूला सागून दोरावरून पुन्हा जकूपाशी उतरलो

"काय रे ? मी ट्राय करू ?" - जकू

"नको, नको! मी पाच मिनिटात पुन्हा सुटतो" - इति मी

हार मानायला अजिबात तयारी नव्हती प्रश्न स्वत्वाचा होता, स्वाभिमानाचा-स्पर्धेचा नव्हता

दहाच मिनिटात मी पुन्हा ओव्हर हँगशी झटापट करू लागलो. एक एक्सपाशन बोल्ट ठोकला. मी सहा इच वर सरकू शकलो इच इच लढून जिकण्याची जिद्द होती. तळपणाऱ्या सूर्याची शक्ती हळुहळू कमी होत होती पायाच्या बोटावर खूप वेळ तोल सावरून उभ असल्यान पोटऱ्याना मध्ये कप सुटे क्रँप येण्याची भीती आजुबाजूचा अवाढव्य कातळ, तळपत्या सूर्यात मृगजळागत भासणार खालच कोकण, आसपास तरगणार एखाद चुकार गिधाड, मानेच्या स्नायूना लागलेली रग . काहीच जाणवत नव्हत शरीर पूर्ण ताणून उचवट्यावरचा एक कगोरा पकडण एवढा एकच 'पोपटाचा डोळा' दिसत होता ताणलेल्या बोटाना हळूच कगोरा सापडला बोट कगोऱ्यामागे रुतली वेदना होती, पण जबरदस्त आनद होता अलगद हातान वजन पेलल आणि अचानक मी उचवट्याच्या वर होतो! थोडी पसरट जागा होती तिथे धपकन् बसलो छातीचा भाता ओव्हरटाइम करीत होता अचाट थकलो होतो (खाली आल्यावर कळल की एकदर अडीच तास मी झगडत होतो ) खालून जकून विचारल "क्या रे ?"

मी नसलेल बळ एकवटून विलक्षण समाधानान ओरडलो,

"पार्टनर! बना दिया!"

एक महत्त्वाचा ओव्हर हँग सर झाला होता

# क्या भगवानसे मिलोगे ?

शुक्रवार, २९ नोव्हेंबर, १९८५.

कालच विवेक भाड, जेम्स बॉंड आणि जकू यानी मिळून तीनशे फूटावरची 'ए' लेज गाठली होती या चढाईतला सुरुवातीचा महत्त्वाचा टप्पा लेज म्हणजे उभ्या भिंताडावर असणारी चिचोळी सपाट जागा कालच एकदर चढाई चारशे फूटापर्यंत सरकली होती आजपासून हळुहळू चढाईची साधनसामुग्री 'ए' लेजवर हलवण्याचा बेत होता कारण रोज खाली-वर करण्याऐवजी दुसऱ्या दिवशी चढणाऱ्या जोडगोळीन 'ए' लेजवर मुक्काम ठोकावा असा विचार केला होता

सकाळचे ५ वाजलेले बॉंडन मला हलवून जाग केल मी स्लीपिंग बॅगमधून जेमतेम डोक बाहेर काढून डोळे किलकिले केले

"काय रे!" माझे झोपाळलेले शब्द "मी आणि जकू सुटतो" इति बॉंड "आयला! एवढ्यासाठी मला उठवल?" माझी चिडचिड "महाराज, आज 'ए'लेजवर आपण सामान हलवतोय! उठ साल्या घोरत पडलाय!" बॉंड "ओके बाबा, उठतो!" मी स्लीपिंग बॅग सकट उठून बसलो

बॉंड आणि जकू चढाईसाठी निघाले

थडी मस्त होती आमच्या कँपवर सूर्यनारायण ११ वाजता दर्शन द्यायचे. कारण मागे उभा असलेला, पश्चिमेकडे तोंड केलेला कोकणकडा. खालच्या दरीत, पिंजलेल्या कापसाच्या पांढऱ्याशुभ्र लड्याप्रमाणे अस्ताव्यस्त पसरलेल दाट धुकं. पाखराना नुकती कुठे

जाग येत होती समोर, दूरवर साखरझोपेत पहुडलेल कोकण लाबवर बेलपाड्यातील धुराच्या चुकार उभ्या रेषा खूप शात-निवात वाटत होत. मस्त गाढ झोपेतून उठवल्याची चिडचिड कधीच पळाली होती स्लीपिग बॅगमधे गुदगल्या करत शिरणारी थडी आणि सभोवतालची कुरकुरीत खारी बिस्किटासारखी प्रसन्न सकाळ आळस झटकून मी उठलो, आणि चुलीपाशी खुडबुडणाऱ्या गोट्याला चहासाठी मस्का लावायला लागलो

"चौदहवीका चाँद हो ." गोट्या खुल्या आवाजात गुणगुणत होता भलत्या वेळेला भलती गाणी सुचणाऱ्या मडळींच मला नेहमीच कौतुक वाटत! पण गोट्याच्या हातचा फर्मास चहा गोट्याच्या गालावर पडणाऱ्या खळीइतकाच झक्क होता एनॅमलच्या मगन दोन्ही हात शेकत गरमागरम चहाचे घुटके घेण, पाठीला टेकलेल्या दगडाचा खरखरीत स्पर्श, नजरेला उब देणारी रसरसलेली तीन दगडाची चूल, आणि समोर समाधीत दग असलेल्या एखाद्या साधूसारखा करडा महाकाय कोकणकडा खरच निखळ शात आनदाची मला तेव्हा दुसरी कुठलीही व्याख्या सुचत नव्हती ?

**शनिवार, ३० नोव्हेंबर, १९८५**

रात्रीचे ९ वाजलेले देशमुखाच्या हॉटेलात सावर्ण्याला बसलो होतो नुकतीच कल्याण-ओतूर शेवटची एस्. टी. निघून गेली होती मी जाम वैतागलो होतो आज मुद्दाम मी खाली उतरून आलो होतो कारण आमचे पपू (परमपूज्य पिताजी ) बेस-कॅंपला येणार होते वय वर्ष साठ पण उत्साह दाडगा कारण काय तर पोराचा वाढदिवस

पण कुणा गाढवान सागितल, "नाही! वाट फार बिकट आहे तुम्हाला नाही झेपणार" म्हणून बाबा आले नव्हते. मी हिरमुसलो आम्ही लगेचच फिकट चांदण्यात, मस्त गारठ्यात बेसकॅंपकडे कूच केली

बेस-कॅंपला पोचलो तेव्हा ११ वाजून गेलेले ओढ्यातून चढताचढताच बॉंडच्या खणखणीत आवाजात बीटल्सचे 'ओ ब्लडी, ओ ब्लडा लाईफ गोज ऑन, ट्रा लाऽऽ ला लाइफ गोज ऑन' या गाण्याचे सूर ऐकू येत होते कॅंप फायर रग घेत होता सॅक बाजूला टाकून टाळ्या वाजवत आम्ही ताल पकडला आणि सूरात सूर मिसळले

चद्राची कोर डोळे मिचकावत होती, मध्यरात्रीनतरचे कोकणकड्याचे भयाण वारे अजून सुटले नव्हते आजुबाजूचे किर्र रान एक शातता फरफरणारी शेकोटी. तिच्या प्रकाशात लालसर चेहरे उन्मुक्तपणे गाण्यात गुगलेले नित्याच्या काळज्या हजारो मैलावर असल्यासारख्या अतराळातल्या एखाद्या तरगणाऱ्या बेटावर असल्यासारख वाटत होत.

मिहीर सरकारने मस्त बोर्नव्हिटा सगळ्याना दिला चढाईचा ताल आता सापडला होता दिवसा सामानाच्या खेपा, खालून पाणी भरून आणण, आघाडीच्या जोडीन चढाई जारी ठेवण, अस छान सुरू झाल होत थडी मी म्हणत होती एकेक करत मडळी झोपायला सटकू लागली हिमालयातील कुठल्याशा मोहिमेच्या गप्पा रगल्या होत्या मी आणि बॉंड हलक्या आवाजात बोलत होतो रात्रीच्या चादण्यात न्हालेला कोकणकडा विचित्रपणे शात होता दिवसा दिसणार उग्रभीषण सौंदर्य कुठेतरी अधारसावल्यात लोपल होत रोज होणाऱ्या चढाईच्या प्रगतीमुळे कोकणकड्याशी छानच सलगी, मैत्री झाली होती शेकोटीतले निखारे

लाल काळसर होत थड होऊ लागले होते अचानक वार सुटल मागोमाग "हेऽऽ हो! अशी पुसट आरोळी आल्यासारख वाटल "हॅ! भास झाला असेल!" बॉडन काठीवरची राख झटकली आणि आतल्या निखाऱ्यावर सिगरेट पेटवली

पुन्हा भणाणणाऱ्या वाऱ्याची दिशा बदलली, स्पष्ट ऐकू आल

"हेऽऽ हो! जनता, रॉकफॉल!" त्याबरोबरच कुठेतरी प्रचड दगड पडून ठिकऱ्या उडाल्याचा, पोटात खड्डा पाडणारा आवाज त्या काळ्या घुमटाकार कोकणकड्याच्या पोटातून उमटला आहे तसेच सुसाट धावत आम्ही कड्याच्या पायथ्यापाशी निघालो

"बाजवा, फर्स्ट एण्ड कीट लेके भाग!" मी निघता निघता ओरडलो धडपडत, ठेचकाळत, उड्या मारत पायथ्यापाशी पोचलो पोचताच "धाड धुडूम!" असा रक्त, गोठवणारा स्फोटक आवाज पुन्हा घुमला

'ए'लेजवर आज बड्या आणि जकू झोपले होते दगड बहुधा 'ए'लेजवर कोसळले असावेत

वॉकी-टॉकी बाहेर निघाले "हॅलो, 'ए' लेज! बेस-कॅंप! बड्या, काय झाल? ओव्हर" मी

"वरून दगड पडला जगूला लागल आहे! त्याला फिक्स रोपवरून खाली सोडतो! फ्रॅक्चर नसाव! ओव्हर" बड्याच्या धपापणाऱ्या आवाजातून थरथरणारी भीती मनावर ओरखडा उमटवून गेली "जकूला दे! जकू, काय रे? कसा आहेस?" मी

"आय ॲम फाईन! आईऽग! नो प्रॉब्लेम, मी येतो खाली ओव्हर"

वाटणारी भीती, काळजी, यश-अपयश, जकूच्या वेदना, या साऱ्या गोष्टी कळत होत्या पण एक सुन्नपणा होता यांत्रिकपणे हालचाली होत होत्या जकूला अलगद पाठीवरून कॅंपला आणण्यात आल. दगड पडून फुटल्यावर उडालेल्या कपच्यानी जकूच्या कमरेला, माडीला सणसणीत मार बसला होता चढाईच काय होणार? जकूच काय? अशा प्रश्नाची जळमट मनी ठेवून मी अट्टाहासान झोप घेण्याचा प्रयत्न करत होतो पहाटेचे साडेतीन वाजले होते

सकाळचे अकरा मी टेलिस्कोपला डोळा लावून बड्याची पायथ्यापासून सहाशे फूटावर चाललेली चढाई पहात होतो काल अपघातानतर बड्यान अचाट धीरान जकूला खाली आणल होत आणि आता पुन्हा फॅंटम हेडच्या खडकाला तो भिडला होता एका तिरप्या डावीकडे चढत जाणाऱ्या रेषेशी बड्या लढत होता डावा हात पुढे सरकला, पकड घेतली-स्थिरावला हातातील स्नायू ताणावले अलगद डावा पाय अधातरी वर निघाला पायाच्या टोकाना छोटुसा आधार मिळाला अलगद उजवा पाय वर सरकला उजवा हात खालच्या आधारावरून वरच्या आधारावर स्थिरावला बड्या इचा इचाने पण अतिशय आत्मविश्वासान लीलया पुढे सरकत होता उभ्या भिताडावरील हे पदलालित्य स्मिमित करणार होत कालच्या अपघातान बसलेला धक्का विरला होता पराभवाचे काळे ढग कधीच पळाले होते स्वच्छ सूर्यप्रकाशात मी एक 'रॉक बॅले' - उभ्या कातळावरील नृत्य - पहात होतो अपार आनद होता, अभिमान होता, उत्साह होता एक विलक्षण प्रगल्भ महत्वाकांक्षा होती, सहज इदुरी वाक्प्रचार आठवला, "और क्या भगवानसे मिलोगे?"

# 'कोकणकडा सुंदरच आहे'

**सो**मवार, ९ डिसेंबर १९८५

कोकणकड्यावरील चढाईची एकदर प्रगती वाखाणण्यासारखीच होती अपघात, मध्ये येणाऱ्या अडचणी, हे सार जणू इतिहासजमा झाल होत एका अपूर्व साहसी आव्हानाला आम्ही लीलया भिडलो होतो

अकराशे फूटावरील 'बी' लेज नावाच्या टप्प्यानतर, शभर फूटाची, आत अरुद पण बाहेर अक्राळविक्राळ जबडा वासलेली, एक उभी भेग आनदान मस्तच पार केली होती लगेच बारसही झाल, 'आनदा क्रक ८ तारखेस आमचा विश्राती-दिनही झाला, कारण आदल्याच दिवशी आनद आणि जकू यांनी बाराशे फूटावरील 'थँक गॉड' लेज गाठली होती शिवाय बौंडन पुढील दोनशे फूटावरील 'इ' लेजपर्यंत मजल मारली. एकदरीत, चढाई आता आमच्या पूर्णपणे आवाक्यात आली होती एव्हाना, बाहेरच्या जगातही या बातमीन खळबळ उडवली होती ही अकल्पनीय चढाई होते आहे ही बातमीच थरारक होती आमची आय आय.टी मधील सर्व जनता ९ तारखेला गडावर पोचणार होती, अशी खबर मोटरसायकरस्वार शिरीष गुप्ते यान आणली. सर्वानुमते ठरल, चढाईचा शेवटचा टप्पा गडावरील बाल्कनीतील आमच्या प्रेक्षकासमोर 'चक्क प्रीमियर' म्हणून १० तारखेस सकाळी करायचा

आज सकाळीच बौंड, जकू व बड्या हे बेसकॅंपहून 'थँक गॉड' लेजकडे सुटले होते. भागडीकर त्याना पाणी



आणि इक्विपमेंट पोचवायला वर गेला होता मी आणि आनद दुपारी बारालाच निघालो तीनशे फूटावरील 'ए' लेज गाठली आणि भागडीकर खाली यायची वाट पहात बसलो कड्यावर आता एकूण दोन हजार एकशे फूट दोर फिक्स झाला होता 'ए' लेजच्यावर आम्ही 'वनवे ट्रॅफिक' नियम अत्यत काटेकोरपणे पाळायचो कारण एक हजार फूटावरून भिरभिरत आलेला सुपारीएवढा दगडही कपाळमोक्षास पुरेसा असतो साहजिकच, भागडीकर येईपर्यंत आम्हाला निघता येत नव्हत आम्ही वाट पहातच होतो

साडेचार वाजून गेले उन्ह कलू लागली कोकणकड्याच्या अजस्त्र भितीना जणू कुणी सोन्याचा गिलावा दिला होता दरीतील गर्द झाडीतील सावल्या धूसर व्हायला लागल्या. कोकणकड्यावरील कानठळ्या बसवणारे वारे घोंघावू लागले होते शर्टची कॉलरदेखील कानाशी फटफटी वाजवत असे आम्ही तटस्थपणे हरवल्यासारखे 'ए' लेजवर बसूनच होतो वाट पाहत होतो वरून भागडीकरचा आवाज यायला लागला भागडी पोचला श्रमामुळे आणि निथळणाऱ्या घामामुळे असेल, पण भागडीच्या चेहऱ्यावर एक विशेष आनद खुलला होता 'पब्लिक बना दो' अस म्हणून भागडी खाली निघालादेखील उद्या बेसला तो एकटाच थाबणार होता. त्याची त्यामुळे चढाईही हुकणार होती खरच, माणस एखाद्या मोठ्या ध्येयासाठी किती सहज स्वार्थत्याग करू शकतात, नाही!

आनद पुढे निघाला तो पुढल्या दोरावर सरकल्यावर मीही सुटलो एक न सपणारी दोरावरील चढाई, आजुबाजूला कोसळत जाणारी पुसट दरीची जाणीव, समोर तणावलेला दोर आणि त्यावर लटकलेले आपण मी तल्लीन होतो आजुबाजून अधार दाटून येत होता. पण मला त्याची क्षीती नव्हती स्विफ्ट पक्षांचा थवा सपकन् कानाशी घोंघावून जाई तेवढ्यापुरती त्या अचाट नाट्यपूर्ण स्टेजची जाणीव होत होती

'आनदी क्रॅक' मध्ये पन्नास फूट वर सरकलो

'अरे, जरा जल्दी आ!' आनदचा आवाज कित्येक हजार फूटावरून आल्यासारखा वाटला माझ्या पाठीवरची सॅक अमळ जडच होती ती सावरायला गेलो आणि तट्कन सॅकचा एक पट्टा तुटला सॅक हिंदकळत एका खाद्यावर लटकली सॅकमध्ये आज तीन कॅमेरे होते आणि मी जमिनीपासून अडीच हजार फूटावर लटकत होतो पोटात गोळा येण, काळजाच पाणी होण, ब्रह्माड आठवण वगैरे सर्व गोष्टी एकदम होऊन गेल्या लटकताना दोन पायाच्या मधून एक दिवा लुकलुकला मला वाटल, बेसकॅंपच्या पुढे येऊन कुणीतरी टॉर्च दाखवत असावा दोन्ही बाजूला अधारात अस्पष्ट होत जाणाऱ्या कभिन्न भिंती पायाखाली विहिरीच्या अथाग तळाचा काळोख आणि त्यावर उजेडाची टिकली मी निरखून पाहिल उजेड फरफरत होता माझी ट्यूब अचानक पेटली ती बेसकॅंपची शेकोटी होती आज पहिल्यादाच, या चढाईच अगावर येण म्हणजे काय ते उमगल पुढचे शभर फूट मी रेकॉर्ड ब्रेक वेळात पार केले आणि दाटून येणाऱ्या अधारात 'थॅंक गॉड' लेजवर आनदच्या शेजारी छातीचा भाता निवळत विसावलो

**मंगळवार, १० डिसेंबर १९८५**

सुवर्णाक्षरानी लिहिण्यासारखा दिवस भारतातील प्रस्तरारोहणाच्या इतिहासातील एक

मानबिंदू, आज सकाळी १० वाजता सतराशे फूटाचा कडा सर झाला होता प्रचड जल्लोषात बंड्या कोकणकड्याच्या माथ्यावर पोचला, पाठोपाठ आम्ही चौघे आरोहकवर पोचलो जिंकल्याची एक मस्त धुंदी सर्वांनाच होती आमच्यानतर तासाभरात सपोर्ट टीममधले पाच जण वर पोचले. एकच धमाल होती आय आय टी मधून आमचे काही मास्तर, आमचे पिताजी, आणि असख्य मित्रमडळी गडावर हजर होती कड्याच्या माथ्यावरून आमचा मार्ग निरखताना सारच अशक्य, अतर्क्य, स्वप्नवत् वाटत होत

दुपारचे चार वाजलेले चढाईच्या वेषात सुनील गोखले उर्फ वाटाण्या आणि मी असे कोकणकड्यावर पोचलो आम्ही बाकीचे आज गडावरच राहाणार होतो वाटाण्या बेसकँपला भागडीच्या सोबतीसाठी निघाला होता वाटाण्यान सारी साधन तपासली तो निघायला तयार होता

"चल! उद्या दुपारपर्यंत आम्ही बेसला पोचतो" अस म्हणून मी वाटाण्याचा निरोप घेतला आम्ही हस्तादोलन केल वाटाण्या आहे तसा चिमुकला, जाड भिंगाआडून डोकावणारे चमचमणारे डोळे आणि कधीही हसू शकेल अशी जिवणी त्या हस्तादोलनात काय काय तरी होत मोहिमेमुळे जुन्या मैत्रीच घट्ट विणलेल एक अतूट नात मी लीडर असल्यान आज दोन शाबासकी मला जास्त मिळाल्या होत्या, पण ते काही खर नाही हा विजय आम्हा सर्वांचा होता, आमच्या कौशल्याचा, चिकाटीचा आणि एकसघ चमूचा आजचा अमाप आनद, सार सपल्यामुळे येणार रितेपण, एक प्रचड थकवा-शारीरिक आणि मानसिकही, आणि शिवाय अत्यत प्रकर्षान जाणवणारी एक निरपेक्ष-निखळ मैत्री, हे सार त्या हस्तादोलनात होत

मी खूप वेळ कड्यावर तसाच बसून होतो गेल्या दोन-तीन महिन्यातले अनेक प्रसग, अपार कष्ट, अचाट धडपड, सार अत-चक्षूसमोर तरळत होत सूर्याचा लाल गोळा निवत पश्चिम क्षितिजावर विसावला होता कोकणकड्याचा अगम्य विस्तार हळुहळू फिकट काळोखात विरघळत होता आम्ही हा कडा चढून आलो होतो, त्याच कोकणकड्याला काहीच नवल नव्हत त्याच्यात काहीच फरक नव्हता अनादि-अनताच मूर्त रूप घेऊन तो तसाच स्थितप्रज्ञ होता निसर्गाच एक उग्र भीषण अस हे लेण, ज्याला भावभावनाचा स्पर्श नव्हता; पण तरीही त्या निसटत्या लाल किरणात ते सुदरच होत

अशाच एका सध्याकाळी 'हरिश्चद्रा'वर गेलो असता, तशाच लालसर प्रकाशात, एक मैत्रीण इतर ग्रूपपासून काहीशी अलग, एकटी बसली होती डोळ्यात अश्रू होते नतर बोलताना म्हणाली, "ते अफाट निसर्गाच रूप, सौंदर्य पाहून का कुणास ठाऊक, मला रडूच आल!"

खरच, कोकणकड्यावर मिटत जाणाऱ्या सधिप्रकाशात एकट असताना पोटात एक खड्डा पडतो तो निसर्ग, मावळता सूर्य, सूक्ष्म असे तुम्ही यात एक तादात्म्य असत एरवीच्या सौंदर्याच्या कल्पना तिथ तोकड्याच पडतात दाटून येणाऱ्या अधारात हरिश्चद्रेश्वराच्या मदिराकडे परतताना मनाच्या वहीच्या पानात मी साठवणीतल एक [illegible] पान अलगद दडवलेल असत त्यावर लिहिलेल असत

'कोकणकडा सुदरच आहे!'

क्र. ७६५